सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २५४ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प




नि समाजाची नव्याने पुनर्रचना करताना, आपल्याला आपल्या समाजातील कुप्रथांचे उच्चाटन करावे लागेल. नवनवीन संसाधनांचा उपभोग घेतानाच आमच्यातील मानवता, दु:खाप्रति असलेली संवेदना कायम राहील असा समाज आपल्याला घडवायचा आहे, असा विचार स्वयंसेवकाने केला पाहिजे. त्याविषयी प्रयत्नशील असले पाहिजे. असे केल्यानेच आपण पुन्हा एकदा विकसित म्हणून उदयास येऊ.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

## विनम्र अभिवादन



स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांची आज जयंती.



क्रांतिवीर लहुजी साळवे यांची आज जयंती

# ३२ वाहनांनी देश हादरविण्याचा होता कट!

**एनआयएच्या तपासातून माहिती उघड | दिल्लीसह उत्तर भारतातील शहरे होती रडारवर | डीएनए चाचणीतून डॉ. उमरच्या मृतदेहाची ओळख पटली**






दहशतवादी उमर नबीची फोर्ड इकोस्पोर्ट कार खंदावली गावाजवळील एका रिकाम्या प्लॉटवर आढळून आली

◆ **नवी दिल्ली, १३ नोव्हेंबर**

उच्चशिक्षित दहशतवादी मॉड्यूलने ३२ वाहनात स्फोटके पेरून दिल्लीसह उत्तर भारतातील प्रमुख शहरात बॉम्बस्फोट घडविण्याचा कट रचला होता अशी माहिती एनआयच्या प्राथमिक तपासात समोर आली. दहशतवादी मॉड्यूलने आतापर्यंत चार जुन्या कारची खरेदी केली होती. वाहनांच्या खरेदीबरोबरच स्फोटके आणि मानवी बॉम्ब तयार करण्याच्या प्रक्रियेलाही प्रारंभ झाला होता.


एका अधिकाऱ्याने सांगितले की, अनेक ठिकाणी हल्ले करण्यासाठी स्फोटके बसवता येतील अशा ३२ जुन्या वाहनांची खरेदी करण्याची तयारी दहशतवादी मॉड्यूलने सुरू केली होती. त्यांनी आतापर्यंत चार कार खरेदी केल्या होत्या, तर इतर वाहने खरेदी करण्यासाठी त्यांची तयारी सुरू होती. आरोपींनी आय-२० आणि इकोस्पोर्ट वाहनात बदल करण्यास सुरुवात केली होती. बॉम्बस्फोटांची मालिका घडवून आणण्याच्या योजनेचा भाग म्हणून त्यांनी स्फोटके आणि इतर सामुग्रीची व्यवस्था करण्याची तयारी त्यांनी केली होती. ३२ कारची जबाबदारी ६४ जणांवर देण्याची योजना होती. आतापर्यंत आठ लोक त्यांनी तयार केले होते. त्यांच्यावर

चार वेगवेगळ्या ठिकाणी स्फोट घडवण्याची जबाबदारी देण्यात आली होती. आरोपी एकाच वेळी अनेक शहरात स्फोट घडविण्याचा कट त्यांनी आखला होता, त्यासाठी स्फोटके, उपकरणे आणि वाहनांची व्यवस्था केली जात होती. डॉ. उमर आणि डॉ. मुझम्मिल इसिसची एक शाखा असलेल्या अन्सार गजवत-उल-हिंदकडे झुकले होते आणि मौलवी इरफान अहमदने त्यांची ओळख या नेटवर्कशी करून दिली होती.

### चौथी कारही विद्यापीठाच्या पार्किंगमधून जप्त

**फरिदाबाद** : लाल किल्ल्याजवळ झालेल्या भीषण स्फोटानंतर अतिरेक्यांनी वापरलेली चौथी कार तपास यंत्रणांना सापडली आहे. चंदेरी रंगाची मारुती ब्रिझा फरिदाबादेतील अल-फलाह विद्यापीठाच्या पार्किंगमध्ये आढळली. एटीएस आणि एनआयएच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वाहनाची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी बॉम्बशोधक व नाशक पथक तसेच न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या पथकांना बोलवले. त्यांनी या वाहनाची तपासणी केली. ■

### डॉ. उमरनेच घडविला स्फोट



राजधानी दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ स्फोट घडविणारा काश्मीरच्या पुलवामा येथील रहिवासी आणि अल फलाह विद्यापीठाचा डॉक्टर उमर उन नबी असल्याची पुष्टी झाली आहे. तपास यंत्रणांनी डॉ. उमरच्या आईची केलेली डीएनए चाचणी कारमधून मिळालेल्या मानवी अवशेषांशी जुळली. ■

### स्फोटके जप्त होताच डॉ. उमर बेपत्ता

डॉ. उमरचा संबंध फरिदाबाद, लखनौ आणि दक्षिण काश्मीरदरम्यान कार्यरत असलेल्या जैश-ए-मोहम्मद लॉजिस्टिक्स मॉड्यूलशी असल्याचे स्पष्ट झाले. फरिदाबादमध्ये ८ नोव्हेंबर रोजी पोलिसांनी २९०० किलो स्फोटके जप्त केल्याची माहिती मिळाल्यानंतर डॉ. उमर बेपत्ता झाला होता. ◀(वृत्तसंस्था)

# अक्कलकोटचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ नोव्हेंबर-**



तालुक्याचे पोलादी पुरुष माजी आमदार, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि सहकार क्षेत्रातील प्रभावी व्यक्तिमत्त्व सिद्रामप्पा पाटील (वय-८८) यांचे गुरुवारी रात्री ८ वाजून १७ मिनिटांनी सोलापूर येथील आश्विनी रुग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने अक्कलकोट तालुक्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.

त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी तीन वाजता अक्कलकोट तालुक्यातील कुमठे येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, भाजप नेते, तसेच सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी तीव्र शोक व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली.

सिद्रामप्पा पाटील यांनी प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करून अक्कलकोट तालुक्यात भाजपाचा पाया भक्कम केला. संघटनात्मक उभारणी, शेतकरी आणि सहकार क्षेत्रातील कार्य, ग्रामीण विकासासाठी केलेले योगदान मोठे होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी झटणारे, प्रामाणिक आणि तळमळीचे नेतृत्व अशा शब्दांत त्यांचे स्मरण करण्यात येत आहे.

**प्रेरणादायी राजकीय प्रवास** : गावच्या सरपंचपदापासून पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, सोलापूर जिल्हा बँकेचे सलग ३५ वर्षे संचालक, एकवेळ उपाध्यक्ष तसेच श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष, मार्केट कमिटी सभापती, तालुक्याचे आमदार असा सिद्रामप्पा पाटील यांचा कर्तृत्ववान राजकीय प्रवास राहिला आहे. अक्कलकोट तालुक्याच्या सर्वांगीण विकासात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अनेक दिग्गज नेत्यांशी सिद्रामप्पा पाटील यांची जवळीक होती. भाजप नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे ते कट्टर समर्थक मानले जात. वयाच्या ८७ व्या वर्षापर्यंत सिद्रामप्पा पाटील यांचे राजकीय आणि सामाजिक कार्य अखंड सुरु होते. ते पक्षनिष्ठ कार्यकर्ते म्हणून ओळखले जात. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती ठीक नव्हती. उपचारासाठी त्यांना सोलापूरमधील अश्विनी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते; मात्र गुरुवारी रात्री ८ वाजून १७ मिनिटांनी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सिद्रामप्पा पाटील यांच्या जाण्याने अक्कलकोट तालुक्याने एक खंबीर, प्रामाणिक आणि जनहिताची जाण असलेले नेतृत्व गमावले आहे.

# बिहार विधानसभा निवडणूक : आज होणार मतमोजणी

**नवी दिल्ली, १३ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या शुक्रवार १४ नोव्हेंबरला होत आहे. राज्यात रालोआची सत्ता कायम राहणार की, महाआघाडी सत्तेवर येणार याबाबत मोठी उत्सुकता आहे. निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदानानंतर सायंकाळी जाहीर करण्यात आलेल्या एक्झिट पोलमध्ये बिहारमध्ये रालोआला स्पष्ट बहुमत दर्शवल्यामुळे रालोआतील सर्व पक्षांचे मनोबल उंचावले आहे.

सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरु होणार आहे. राज्यातील ३८ जिल्ह्यातील ४६ मतमोजणी केंद्रावर मतमोजणी होणार आहे. २४३ सदस्यीय बिहार विधानसभेसाठी पहिल्या टप्प्यात ६ नोव्हेंबरला तर दुसऱ्या टप्प्यात ११ नोव्हेंबरला मतदान झाले होते. दोन्ही टप्प्यात मिळून ६७.१३ टक्के मतदान झाले, जे १९५१ चे नंतरचे सर्वाधिक मतदान आहे. मतदानासाठी वापरण्यात आलेले ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशिन दुहेरी सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आले. सुरक्षा व्यवस्थेचा पहिला वेढा सेंट्रल आर्म्ड पोलिस फोर्सेस चा आहे, तर दुसरा वेढा बिहार पोलिसांचा आहे.




## महत्त्वाचे

### सलग तेजीनंतर पुन्हा बाजारात घसरण

**मुंबई** : गुरुवारी भारतीय शेअर बाजार घसरणीसह सुरू झाला. शेअर बाजाराच्या सलग तीन दिवसांच्या तेजीला ब्रेक लागला. सकाळी बाजाराची सुरुवातच घसरणीने झाली. तेजीला ब्रेक लागला असला तरी महागाई दरातील घट, जागतिक बाजारातील सकारात्मक संकेत यामुळे बाजारात फार मोठी घसरण टळली. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय निर्यातीवरील अमेरिकन आयात शुल्क कमी करण्याबाबत केलेल्या वक्तव्यामुळे बाजारातील गुंतवणूकदारांचा विश्वास फारसा डळमळीत झाला नाही. ■

## पुण्यात नवले ब्रीजवर भीषण अपघात


# ९ जणांचा मृत्यू, २० जखमी

- कंटेनरचा ब्रेक फेल
- २५ वाहनांची टक्कर
- मृतांच्या कुटुंबियांना ५ लाखांची मदत जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, १३ नोव्हेंबर-**

पुणे येथील नवले पुलावर दोन ते तीन वाहनांनी पेट घेतल्याची एक भीषण अपघात घटना घडली आहे, ज्यात ९ जणांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाल्याचे समजते. या दुर्घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली, तसेच अग्निशमन दलाच्या गाड्याही नवले पुलावर तातडीने पोहोचल्या. अपघातातील सर्व जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, या दुर्घटनेतील मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

साताऱ्याच्या दिशेने पुण्याकडे येणाऱ्या दोन्ही ट्रकचा अपघात झाला आणि यात एक कार अडकली होती. यावेळी दोन्ही ट्रकला आग लागली असून यात मृतांची संख्या देखील वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच या



अपघातामुळे नवले ब्रिजवर मोठी वाहतूक कोंडी झाल्याचे पाहायला मिळत आहे.

अग्निशमन दलाकडून ट्रकला लागलेल्या आग विझवण्याचे प्रयत्न करत असून यावेळी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. नवले पुलावर अनेक अपघात होत असतात, परंतु हा अपघात सर्वात मोठा असल्याचे बोलले जात आहे. दोन ट्रकचा अपघात झाला असून यात मागच्या ट्रकचा चालक अद्यापही ट्रकमध्येच अडकला असल्याचे दिसून येत आहे. तर सध्या या अपघातात अडकलेल्या मृतदेहांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. चारचाकी जी या दोन्ही ट्रकच्या मध्ये अडकली होती, या कारमधील प्रवाशांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

# महिलांना रात्रपाळीच्या कामाची परवानगी

## योगी सरकारचा ऐतिहासिक निर्णय

**लखनौ, १३ नोव्हेंबर**

उत्तरप्रदेशातील महिलांसाठी योगी सरकारने एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. आता महिलांना रात्रीच्या शिफ्टमध्येही काम करण्याची परवानगी मिळणार आहे. कामगार महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले हे मोठे पाऊल मानले जात आहे. मुख्यमंत्र्यांच्या जनसंपर्क पथकाने जारी केलेल्या निवेदनानुसार, महिलांच्या सुरक्षेसाठी घरापासून ते कार्यस्थळापर्यंत प्रत्येक स्तरावर कडक सुरक्षा उपाययोजना करण्यात येणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात 'उत्तर प्रदेश कारखाना सुधारणा विधेयका'ला मंजुरी दिल्यानंतर सरकारने हा निर्णय अधिकृतपणे लागू केला आहे. नवीन तरतुदीनुसार, महिला आता आपली लेखी संमती दिल्यानंतर संध्याकाळी ७ वाजेपासून सकाळी ६ वाजेपर्यंत काम करू शकतील. ही संमती राज्याच्या कामगार विभागाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक राहील. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सरकारने अनेक कठोर उपाययोजना



केल्या आहेत. महिलांसाठी कारखाने आणि धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्याचे नवीन मार्ग खुले झाले आहेत. पूर्वी महिला केवळ १२ धोकादायक उद्योगांमध्येच काम करू शकत होत्या. मात्र, आता त्यांना सर्व २९ धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्याची मुभा मिळाली आहे. औद्योगिक विस्तार, तांत्रिक प्रगती आणि रोजगाराच्या वाढत्या संधी लक्षात घेऊन योगी सरकारने हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले आहे. या पावलामुळे महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### सहा तास ब्रेकशिवाय काम करू शकणार

कारखान्यांमध्ये सुरक्षा, आरोग्य व वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच सीसीटीव्ही देखरेख, महिला सुरक्षा रक्षकांची तैनाती आणि सुरक्षित प्रवासाची हमी दिली जाईल. या निर्णयामुळे महिलांना त्यांच्या इच्छेनुसार सलग सहा तास ब्रेकशिवाय काम करण्याची परवानगी मिळणार आहे.

### ओव्हरटाईच्या मर्यादेत वाढ

महिला कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हक्कांसाठीही सरकारने सकारात्मक बदल केले आहेत. महिलांसाठी ओव्हरटाईमची मर्यादा दर तिमाहीत ७५ तासांवरून वाढवून १४४ तास करण्यात आली आहे, आणि या ओव्हरटाईमसाठी दुप्पट वेतन देण्यात येईल. या निर्णयामुळे महिलांना आपले कौशल्य विकसित करण्याची आणि नव्या क्षेत्रांमध्ये आत्मविश्वासाने काम करण्याची संधी मिळणार आहे..

MIT PUNE
तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर माऊली | राष्ट्रधर्मपूजक कै. दादाराव साधू कराड (डॉ. विश्वनाथ कराड यांचे पूज्य वडील) | तत्त्वज्ञ संत श्री गोपाळ बुवा महाराज | पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड (डॉ. विश्वनाथ कराड यांच्या ज्येष्ठ भगिनी) | जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज

|| सस्नेह निमंत्रण ||
विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व 'मानवतातीर्थ' रामेश्वर-रुई, (ता.जि. लातूर)चे सर्व ग्रामस्थ
यांच्या संयुक्त विद्यमाने
जगातील सर्वात मोठे आणि विस्तीर्ण दालन असलेल्या
|| विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन ||
या वास्तूचा
लोकार्पण सोहळा
विश्वधर्मी मानवतातीर्थ - रामेश्वर (रुई), ता. जि. लातूर ※ शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी, सकाळी ९.१५ वा.

सन्माननीय प्रमुख पाहुणे व उद्घाटक
मा. श्री. सुनील शास्त्री
भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांचे सुपुत्र व माजी खासदार, राज्यसभा

सन्माननीय अध्यक्ष
पद्मभूषण मा. डॉ. विजय भटकर
संत वृत्तीचे थोर शास्त्रज्ञ, जगप्रसिध्द संगणक तज्ञ व माजी कुलपती, नालंदा विद्यापीठ

सन्माननीय प्रमुख पाहुणे
मा. श्री. शिवराज पाटील चाकूरकर
माजी गृहमंत्री, भारत सरकार व माजी सभापती, लोकसभा

शुभाशीर्वाद
मा. डॉ. करण सिंह
माजी केंद्रीय मंत्री, भारत सरकार व जम्मू काश्मीर राजघराण्याचे वारसदार (व्हिडिओद्वारे)

विशेष सन्माननीय पाहुणे
मा. फादर फेलिक्स मचाडो — माजी बिशप रोमन कॅथोलिक चर्च, वसई
मा. डॉ. फिरोज बख्त अहमद — माजी कुलपती, मौलाना आझाद नॅशनल उर्दू युनिव्हर्सिटी व भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचे नातू
मा. श्री. मायकेल गनेल — तत्त्वज्ञ, चिंतक व अभ्यासक, अमेरिका

सन्माननीय पाहुणे
भंते राहुल बोधी — इंटरनॅशनल सर्वोदय बुद्ध विहार, मुंबई
महंत रामदास — तत्त्वज्ञ, चिंतक व अभ्यासक, अयोध्या
योगी अमरनाथ — तत्त्वज्ञ व चिंतक
श्रीमती कमलाताई गवई — ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या
महाराज परमवीर सिंह — दांता स्टेट, गुजरात
डॉ. मेहेर मास्टर मूस — अध्यक्ष, झोरास्ट्रीयन कॉलेज, मुंबई
डॉ. एडिसन सामराज — तत्त्वज्ञ, चिंतक व अभ्यासक, बेंगलुरु
डॉ. प्रकाश महानवार — कुलगुरु, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
डॉ. इझिकेल मळेकर — तत्त्वज्ञ व चिंतक
मौलाना अन्सारी चतुर्वेदी — तत्त्वज्ञ, चिंतक व अभ्यासक
डॉ. बिनी सरीन — ब्रम्हाकुमारी विश्वविद्यालय, माऊंट आबू
डॉ. संजय देशमुख — माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ
डॉ. लेसन आझादी — तत्त्वज्ञ व बहाई धर्माचे अभ्यासक
सौ. पुष्पाताई बोंडे — अध्यक्ष, गुरुकुंज आश्रम, मोझरी
मा. श्रीपाल सबनीस — मा. अध्यक्ष, अ. भा. मराठी साहित्य संमेलन
आचार्य रतनलाल सोनग्रा — सुप्रसिध्द साहित्यिक व लेखक
सरदार मनजितसिंह खालसा — तत्त्वज्ञ, चिंतक व अभ्यासक
श्री. इंद्रजीत भालेराव — सुप्रसिद्ध लेखक व विचारवंत

भारताची विश्वात्मक संस्कृती, परंपरा आणि तत्त्वज्ञानाचा अनुभव देणाऱ्या या दिव्य वास्तूच्या लोकार्पण सोहळ्यास आपण अवश्य उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

आपले नम्र
डॉ. राहुल वि. कराड | डॉ. मंगेश तु. कराड | ह.भ.प. तुळशीराम दा. कराड
डॉ. सुनील का. कराड | डॉ. सुचित्रा उ. कराड-नागरे | प्रा. प्रकाश भा. जोशी
प्रा. स्वाती मु. कराड-चाटे | डॉ. विरेंद्र सु. घैसास | सौ. ज्योती अ. कराड-ढाकणे
ह.भ.प. काशीराम दा. कराड | डॉ. हनुमंत तु. कराड | आ. रमेश का. कराड
सौ. पौर्णिमा आ. कराड-नागरगोजे | राजेश का. कराड
सचिन मा. कराड (सरपंच) व समस्त विश्वधर्मी मानवतातीर्थ-रामेश्वर (रुई) ग्रामस्थ

संकल्पना, संरचना, नियोजन, निर्मिती व शुभाशीर्वाद
विश्वधर्मी
प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड
संस्थापक - अध्यक्ष, माईर्स एमआइटी वर्ल्ड पीस युनिवर्सिटी, पुणे, भारत

## महत्त्वाचे...



### उपजिल्हाधिकारी आरती जाधवचा अण्णासो पाटील शिक्षण संकुलात सत्कार

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नुकत्याच घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत उपजिल्हाधिकारी या पदाकरीता अण्णासाहेब पाटील प्रशालेची माजी विद्यार्थिनी आरती परमेश्वर जाधव हिने महाराष्ट्रातून मुलींमध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला. आरती जाधव हिच्या दैदिप्यम ान यशाबद्दल अण्णासाहेब पाटील शिक्षण संकुलातर्फे जेष्ठ विधिज्ञ ॲड. धनंजय माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष विलासराव देशमुख अध्यक्षपदी होते. यावेळी सचिव बबनराव सावंत यांनी परिचय करून देत प्रास्ताविक केले. यावेळी आरती जाधव हिने शाळेबद्दल आणि सर्व शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच सोशल मिडीयापासून दूर राहण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले. प्रमुख पाहुणे ॲड. माने यांनी विद्यार्थ्यांना ज्ञान हिच खरी संपत्ती असून शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे विचार मांडले. शिक्षक प्रतिनिधी गोडाळे, चव्हाण व कोंढारे यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे पदाधिकारी शिवाजीराव घाडगे, सुर्यवंशी, संदीप क्षिरसागर, विजय सावंत उपस्थित होते. मुख्याध्यापक कट्टे सर, आजी माजी सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. श्रीमती पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. कटकधोंड यांनी आभार मानले.

### महापालिकेतील सहाय्यक आणि कनिष्ठ अभियंत्यांच्या अंतर्गत बदल्या

**सोलापूर** : महापालिकेतील अभियंता संवर्गातील सहाय्यक अभियंता आणि कनिष्ठ अभियंता अशा एकूण ९ कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्याचे आदेश म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज काढले.

आदेशाच्या दिनांकपासून या कर्मचारी व अधिकाऱ्यांना त्या त्या ठिकाणी रुजू होण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये महापालिका झोन आठचे सहाय्यक अभियंता महेश क्षिरसागर यांची नगररचना कार्यालयाकडे, झोन पाचचे सहाय्यक अभियंता सुनीता हिवाळे यांची झोन एकच्या विभागीय अधिकारीपदी, झोन एकचे सहाय्यक अभियंता राघवेंद्र गायधनकर यांची आठच्या विभागीय अधिकारीपदी, आरोग्यचे सहाय्यक अभियंता महिबूब शेख यांची नगर अभियंताकडे, नगररचनातील कनिष्ठ अभियंता इम्रान बागवान नगर अभियंता कार्यालयात, झोन सहाचे कनिष्ठ अभियंता कुलदीप जगदाळे झोन दोन कडे, नगरचनातील भूमापक सलीम पटेल झोन दोनकडे, झोन दोनचे भूमापक लैला नदाफ निवडणूक व जनगणना कार्यालय, झोन दोनकडील कनिष्ठ अभियंता (मानधन) मधुसूदन पवार यांची झोन पाचला बदली करण्यात आल्याचे आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

# जिल्ह्यात नगरपालिका अध्यक्षपदासाठी ३ तर सदस्यासाठी १९७ अर्ज दाखल

## शनिवारी उमेदवारी अर्ज स्वीकारावेत

### राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्हा प्रशासनाला पत्र

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-

राज्यातील २४६ नगर पालिका व ४२ नगरपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून, या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केले जात आहेत. सोलापुरात ११ नगरपालिका आणि १ नगरपरिषदेसाठी ही निवडणूक घेण्यात येत असून, आजतागायत अध्यक्षपदासाठी ३ तर सदस्यपदासाठी १९७ अर्ज दाखल झाले आहेत. तर ऑफलाईनद्वारे २१ अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, रविवारी सुटी असल्याने हे अर्ज घेतले जाणार नाहीत मात्र शनिवार, दि. १५ रोजी (सुटीदिवशी) उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून, या दिवशी उमेदवारी अर्ज स्वीकारावेत... या बाबत राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा प्रशासनाकडे पत्र पाठवून सदर बाब स्पष्ट केली आहे.

राज्यात २४६ नगर पालिका व ४२ नगरपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. एकाकडे राजकिय पक्षांकडून उमेदवार जाहीर करून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या हालचाली सुरु आहेत तर दुसरीकडे उमेदवारी अर्ज दाखल करून घेणे, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, निवडणूक प्रक्रिया व प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया राबविणे यासाठी प्रशासनाकडून युध्दपातळीवर तयारी केली जात आहे.

दरम्यान, या निवडणुकीत ता. १० नोव्हेंबर ते ता. १७ नोव्हेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असल्याचे जाहिर करण्यात आले आहे. तर ता. १८ नोव्हेंबर रोजी छानणी, ता. २१ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेता येणार असल्याचे जाहिर करण्यात आले.

मात्र रविवार, दि. १६ या सुट्टीच्या दिवशी उमेदवारी अर्ज स्विकारले जाणार नाहीत असे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र शनिवारी सुट्टीच्या दिवशी उमेवारी अर्ज दाखल करता येणार किंवा नाही याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडे बहुतांश जिल्हयांतून विचारणा केली जात होती. तर उमेदवारांमधेही याबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने तातडीने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना पत्र पाठविले आहे. यामध्ये शनिवार, दि. १५ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत उमेदवारी अर्ज स्विकारले जावे अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यामुळे आता शनिवारीही उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे.



### बलवडी येथे श्री सिद्धनाथ जन्माष्टमी सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ नोव्हेंबर -**

बलवडी ता.सांगोला येथे श्री सिद्धनाथ जन्माष्टमी सोहळा उत्साहात पार पडला. काल्याच्या कीर्तनात पांडुरंग वारकरी शिक्षण संस्था धामणी ता.तासगाव या संस्थेचे साडेसात हजार स्केअर फुट बांधकाम झाले. याचे मोठे श्रेय बलवडी वाल्यांचे आहे व त्यामुळे या गावास मी विसरू शकणार नाही. जगात चंद्र, सूर्य जोपर्यंत आहे तोपर्यंत बलवडी येथील सिद्धनाथ जन्माष्टमी सोहळा होणार व मी येणारच अशी ग्वाही हभप. आकाश पाटील महाराज यांनी दिली. यावेळी सिद्धनाथ जन्माष्टमी कमिटी व ग्रामस्था यांच्या तर्फे पाटील महाराज, देणगीदार व किर्तन सौजन्यदार यांचा सत्कार करण्यात आला. शेवटी सर्वांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. सप्ताहात नवनाथ ग्रंथ सामुदायिक वाचन सोहळा संपन्न झाला. तसेच सुप्रियाताई बंडगर, हनुमंत पाटील महाराज, झावरे महाराज, माऊली महाराज, अर्पिताताई अमराळे, गणेश महाराज, कैलास महाराज यांची किर्तन रुपी सेवा संपन्न झाली.

### आमदार विजयकुमार देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापुरात आरोग्य सेवेचा महायज्ञ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**



आमदार विजय देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त प्रविण दर्गो पाटील मित्र परिवार यांच्या वतीने १६ नोव्हेंबर रोजी लहानांपासून म ोठ्यांपर्यंत सर्वांसाठी आरोग्यसेवेचा महायज्ञ येथील महावीर मंगल सांस्कृतिक मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांना मोफत उपचार, तपासण्या तसेच मोफत आयुष्यमान कार्ड उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

या शिबिरामध्ये कॅन्सर, हृदयरोग, बालरोग, स्त्रीरोग, डोळ्यांचे आजार, हाडांचे विकार, पोटाचे व मूत्रविकार, दंतचिकित्सा, त्वचारोग, नाक-कान-घसा अशा विविध आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत सल्ला व उपचार दिले जाणार आहेत, अशी माहिती आयोजक प्रविण दर्गोपाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन आमदार विजयकुमार देशमुख माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. आरोग्यदायी समाजासाठी या महायज्ञ सर्वांनी लाभ घ्यावा आणि तो यशस्वी करावा, असे आवाहन आयोजक प्रविण दर्गो पाटील मित्र परिवाराकडून करण्यात आले.

या पत्रकार परिषदेस माजी नगरसेवक अमर पुदाले, गुरुनाथ निंबाळे, सचिन कुलकर्णी,मोहन क्षीरसागर,श्रीशैल सास्तुर, रवि अतनुरे, श्रीनाथ गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

### मनपा निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी आता २० नोव्हेंबरला होणार प्रसिद्ध

- २७ नोव्हेंबरपर्यंतदाखल करता येणार हरकती व सूचना
- ५ डिसेंबरला होणार अंतिम मतदार यादी जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप म तदारयादी जाहीर करण्याच्या कार्यक्रमात बदल करण्यात आला आहे. त्यानुसार प्रारूप मतदारयादी १४ नोव्हेंबरऐवजी आता दि.२० नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या प्रारूप यादीवर २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार आहे. ५ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात येणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने सोलापूर म हापालिकेसह राज्यातील २९ महापालिकांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीसंदर्भात पुन्हा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस विधानसभेच्या मतदार यादी वरून महानगपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूककरीता तयार केलेली प्रारूप मतदार यादी २० नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. याच दिवसापासून हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार आहेत. हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत दि. २७ नोव्हेंबरपर्यंत आहे. प्रारूप मतदार यादीवरून दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रामाणित करून ५ डिसेंबर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदान केंद्राच्या ठिकाणी यादी प्रसिद्ध करण्याची तारीख ८ डिसेंबर आहे तर मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख १२ डिसेंबर ही आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी मतदारयादीतबाबत जाहीर केलेल्या सुधारित कार्यक्रमानुसार महापालिका स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

# महापालिकेच्या चार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची निर्दिष्ट कामासाठी नियुक्ती

- उस्तुरगे, तुपदोळकर, बनसोडे, मननाण यांचा समावेश
- जगन्नाथ बनसोडे यांची अतिक्रमण विभागात पुन्हा एन्ट्री
- सिद्राम तुपदोळकर नगररचना, भूमी व मालमत्ता विभागाकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या चार अधिकाऱ्यांना निर्दिष्ट कामकाजासाठी करार पध्दतीने पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे. यामध्ये सेवानिवृत्त उपअभियंता सिद्रामप्पा उस्तुरगे, सेवानिवृत्त भूमी व अभिलेख उपअधीक्षक सिद्राम तुपदोळकर, सेवानिवृत्त अतिक्रमण प्रतिबंधक विभाग अधिकारी जगन्नाथ बनसोडे आणि सेवानिवृत्त सहाय्यक लेखा अधिकारी सय्यद मननाण यांचा समावेश आहे. चारही अधिकाऱ्यांनी आज पदभार घेतला आहे.

शासकीय, निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित (विशिष्ट) कामासाठी घेण्यासंदर्भातील महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार सोलापूर महापालिकेकडून ही कार्यवाही करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधितांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यानंतर मुलाखती घेण्यात आल्या होत्या. त्यापैकी या चार जणांची निवड करण्यात आली.

शासन निर्णयास अनुसरून काम काजासाठी पॅनल तयार करण्यात आले आहे. अटी व शर्तीस अधीन राहून या चार अधिकाऱ्यांना कामकाज करावयाचे आहे. सहा म हिन्यांच्या कालावधीसाठी ही नियुक्ती आहे. पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर तसेच प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती, कामाबाबत गोपनियता बाळगणेच्या अटीवर ही नियुक्ती अवलंबून राहणार आहे.



सेवानिवृत्त कार्यालय अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांची अतिक्रमण विभागाकडे 'अतिक्रमण प्रतिबंध अधिकारी' यापदावर नियुक्ती करण्यात आली आहे. नियत्रंण अधिकारी व महापालिका आयुक्त यांच्या निर्देशानुसार त्यांना सोलापूर शहरातील अतिक्रमण निष्कासित करण्याचे कामकाज पहावे लागणार आहे.

सेवानिवृत्त भूमी व अभिलेख उपअधीक्षक सिद्राम तुपदोळकर यांची नगररचना विभाग व भूमी व मालमत्ता विभागाकडे नियुक्ती केली आहे. त्यांनी दोन्ही विभागाकडील कामकाजाव्यतिरिक्त नव्याने होणारे उड्डाण पुलाच्या अनुषंगाने कामकाज पाहावयाचे आहे.

सेवानिवृत्त उपअभियंता सिद्रामप्पा उस्तुरगे यांची सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाकडील शहरासाठी होणारे पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने कामकाज पाहण्यासाठी नियुक्ती करण्यात आले आहे. त्यांना सार्वजनिक आरोग्य अभियंता आणि आयुक्त यांच्या निर्दे शानुसार पाणी पुरवठा बाबत कामकाज पाहावे लागणार आहे.

सेवानिवृत्त सहाय्यक लेखा अधिकारी सय्यद मननाण यांची मुख्यलेखापाल विभागाकडे नियुक्ती करण्यात आली. शासनाकडून मुख्यलेखापाल विभागाकडे प्राप्त होणारे सर्व विभागाचे लेखापरिक्षण आक्षेपाच्या अनुषंगाने संबंधित विभागाकडून अहवाल प्राप्त करून ती आक्षेप वगळणेकामी लेखापरिक्षण समि तीकडे सादर करणे, लेखापरिक्षणच्या अनुषंगाने सर्व कामकाज त्यांना पहावयाचे आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे.



### मैंदर्गीत स्थानिक गटाकडून शिवम्मा पोतनवरू उमेदवार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ नोव्हेंबर -**

मैंदर्गी नगरपरिषदेच्या निवडणुकीत स्थानिक गटाकडून नगराध्यक्ष उमेदवार म्हणून शिवम्मा यलप्पा पोतेनवरू यांच्या नावाची घोषणा करण्यात आली असून भाजपाकडून अद्याप उमेदवारी जाहीर केलेली नाही. १७ नोव्हेंबर रोजी शहरातील प्रमुख मार्गावरून शक्तिप्रदर्शन करत दहा प्रभागांतील वीस सदस्यांचे नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यात येणार असल्याची माहिती स्थानिक गटाचे प्रमुख किरण केसुर यांनी दिली.

मैंदर्गीचे मतदार, रहिवाशांनी स्थानिक गटावर मागील ७० वर्षांपासून विश्वास ठेवलेला आहे. नगराध्यक्ष उमेदवार देण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला आहे. मागील दहा दिवसांपासून यासाठी चर्चा, बैठका, विचारविनिमय सुरू होते. अखेर ज्या वर्गासाठी आरक्षण निघाले आहे, त्याच घटकाला देणे आवश्यक आहे. याचा सारासार विचार करून बुधवारी एकमुखी निर्णय घेऊन सर्वानुमते शिवम्मा यलप्पा पोतेनवरू यांच्या नावाची घोषणा केली.

त्या माजी नगरसेवक यलप्पा पोतेनवरू यांची पत्नी आहेत. भाजपविरुद्ध उमेदवारी देताना प्रत्येक घटकाला न्याय मिळेल या उद्देशाने नगरसेवकांना उमेदवारी देण्यात येणार असल्याचे महेश शावारी यांनी सांगितले. मैंदर्गी नगरपालिकेच्या निवडणुकीत स्थानिक गटाचे वर्चस्व कायम राहिले असून, यावेळीही सर्व गट प्रमुखांनी एकत्र येऊन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक गटाची स्थापना केली आहे. आगामी निवडणुकीत स्थानिक गट आणि भाजप यांच्यात थेट लढत होणार आहे. यंदाच्या निवडणुकीत नगराध्यक्षपद अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. या प्रसंगी गटप्रमुख फसले रेहमान शाब्दी, माजी नगराध्यक्ष सुरेश दिवटे, महेश शावरी, उमरशा मकानदार, बसवराज गोब्बूर, नीलकंठ मेंथे, शिवचलप्पा पुजारी, गुरुलिंगप्पा गोब्बूर, मलकण्णा भुरकी, विठ्ठल आरेनवरू, सोमशेखर सवळी, इमरान बांगी, महिबुब दफेदार, जलील लोणी, शरणप्पा केसुर, दरेप्पा जकापुरे आदी उपस्थित होते.

### नगरसेवक पदासाठी दूधनीत तेरा तर अक्कलकोटमध्ये तीन अर्ज दाखल

#### मैंदर्गीत एकही अर्ज दाखल नाही

**अक्कलकोट, दि. १३ नोव्हेंबर -**

दूधनी नगर पालिका नगरसेवक पदासाठी चौथा दिवशी शिवसेना शिंदे गटाकडून तेरा जणांनी उमेदवार अर्ज दाखल केले असून अक्कलकोट येथे नगरसेवक पदासाठी भाजपा कडून तीन अर्ज दाखल केले आहे. अक्कलकोट दुधनी असे एकूण १६ अर्ज दाखल केल्या आहेत. मैंदर्गी येथे आत्ता पर्यंत एकही अर्ज दाखल केले नाहीत. अक्कलकोट नगर पालिका निवडणुकीत भाजपकडून प्रियांका सचिन मडिखांबे या प्रभाग क्र. ११ अ मध्ये, वैशाली रामेश्वर पाटील या प्रभाग क्र. १० अ मध्ये, रामेश्वर रेवाप्पा पाटील या प्रभाग क्र. १० ब मध्ये नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्या आहेत. दूधनी नगरपालिका निवडणुकीत शिवसेना कडून म्हेत्रे मधुमती प्रकाश या प्रभाग क्र. ४ अ मध्ये, म्हेत्रे ऐश्वर्या सुरेश या प्रभाग क्र.२ अ मध्ये, परमशेट्टी सातलिंगप्पा शरणप्पा या प्रभाग क्र. ९ ब मध्ये,परमशेट्टी राजशेखर सातलिंगप्पा या प्रभाग क्र. ९ ब मध्ये, नाकेदार जिलाणी चॉंदसाब या प्रभाग क्र. ५ ब मध्ये,हिप्परगी चॉंद अब्दुल या प्रभाग क्र. ५ ब मध्ये, निंबाळकर रौफ सैपनसो या प्रभाग क्र.६ अ मध्ये,नदाफ इब्राहीम म रफिकया प्रभाग क्र. ६ अ मध्ये,परमशेट्टी बसवराज अण्णारावया प्रभाग क्र. १ब मध्ये,परमशेट्टी किरण कल्याणी या प्रभाग क्र. १ ब मध्ये,माळेकर सरुबाई लक्ष्मीपुत्र या प्रभाग क्र. ३ ब मध्ये,सोळसे स्वाती राहुल या प्रभाग क्र. ८अ मध्ये,गद्दी जगदेवी मलकणा या प्रभाग क्र.९अ मध्ये असे एकूण १३ जणांनी अर्ज दाखल केल्या आहेत.

# बार्शी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक; रणधुमाळीला झाली सुरुवात

## चौथ्या दिवशी नगरसेवकपदासाठी भाजपचा पहिला उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ नोव्हेंबर,**

बार्शी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ला आता खऱ्या अर्थाने रणधुमाळीची सुरुवात झाली आहे. सोमवारपासून नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली होती, मात्र पहिल्या तीन दिवसांत कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल केला नव्हता. अखेर चौथ्या दिवशी गुरुवारी भारतीय जनता पार्टीच्यावतीने पहिला अर्ज दाखल होताच निवडणुकीच्या वातावरणाला चांगलीच रंगत येत आहे.




भाजपकडून रोहित रमेश पाटील यांनी प्रभाग क्र. १८ (अ) मधून ओबीसी पुरुष प्रवर्गातून आपल्या उमेदवारीचा नामनिर्देशन अर्ज दाखल करत या निवडणूक लढतीचा शुभारंभ केला आहे. अवघ्या २४ वर्षांचा हा तरुण उमेदवार, कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय असलेला आणि युवकांम ध्ये प्रभावी संघटन उभं करणारा चेहरा म्हणून ओळखला जातो.

अर्ज दाखल करताना भाजपचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये विजय राऊत, रमेश पाटील, भारत पवार, प्रकाश मोहिते, पी. एम. मनगिरे, संभाजी पाटील, दिगंबर चिंतामणी, विजय पवार, बप्पा मोटे, अजय पाटील, सूर्यकांत देशमुख, पाचू उघडे, रोहित लाकाळ, महादेव देशमुख, संग्राम मोहिते, पप्पू माने यांच्यासह असंख्य युवकांचा उत्साह लक्षणीय होता. कार्यकर्त्यांनी 'बार्शीकरांचा विकास म्हणजे भाजपचा निर्धार', अशी घोषणा देत उमेदवाराचे स्वागत केले.

बार्शी नगरपरिषदेच्या निवडणुकीत आतापर्यंत ाउमेदवारांनी नावनोंदणी प्रक्रियेत थोडीशी शांतता ठेवली होती. मात्र भाजपचा पहिला अर्ज दाखल झाल्यानंतर आता इतर पक्ष आणि अपक्ष इच्छुकांची हालचाल वाढण्याची शक्यता आहे. येत्या काही दिवसांत इतर पक्ष आणि अपक्ष गटांकडूनही उमेदवारी अर्ज दाखल होणार असल्याने निवडणुकीचे वातावरण अधिकच तापण्याचे संकेत आहेत.

आता सर्वांच्या नजरा येत्या काही दिवसांत कोण-कोण आपले अर्ज दाखल करतात याकडे लागल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### ज. रा. चंडक प्रशालेची विमान प्रवासाने शैक्षणिक सहल

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,बाळे,येथील ज. रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयच्या वतीने यंदा प्रथमच विमान प्रवासाचे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीसाठी विद्यार्थ्यांचा ताफा बुधवार, दि.१२ नोव्हेंबर रोजी मार्गस्थ झाला. या सहलीत जालंधर, अमृतसर, वाघा बॉर्डर, चंदीगड, शिमला आणि दिल्ली या विविध ऐतिहासिक व पर्यटनस्थळांना भेट देण्यात येणार आहे. सहलीचे आकर्षण म्हणजे दिल्ली ते मुंबई विमान प्रवास. विद्यार्थ्यांना इंडिगो कंपनीच्या ६ए-६०२२ या विमानाने प्रवास घडविण्यात येणार आहे. सहलीत ९ विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच १ शिक्षिका अशा १० जणांचा सहभाग आहे. संपूर्ण सहलीचे नियोजन प्राचार्य मोहनराव घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. सहलीसाठी संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ, संचालक दत्ता गाजरेंनी विद्यार्थ्यांना, शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.



### प्रभाग क्रमांक २६ मधील ड्रेनेज लाईनचे काम पूर्णत्वास

**सोलापूर, दि.१३ नोव्हेंबर :**

जुळे सोलापूर भागातील प्रभाग क्रमांक २६ मधील हेरिटेज फॉर्म, ज्योती नगर, बँक कॉलनी, बंडप्पा नगर, कोरे वस्ती, उध्दव नगर भाग एक व दोन, अमर नगर सोरेगाव, स्वस्तिक नगर, शितल नगर, रजनीश रेसिडेन्सी, आदित्य रेसिडेन्सी, आर्यश रेसिडेन्सी आदी भागातील ड्रेनेज लाईन पूर्णत्वास आली आहे. याकामी माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांनी पुढाकार घेतला होता. या परिसरात पाण्याची पाईपलाईन नसल्याबाबत नागरिकांनी चव्हाण यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तात्काळ पालकमंत्री जयकुमार गोरे आणि महानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे यांची समक्ष भेट घेवून नागरिकांसमवेत एका निवेदनाद्वारे गाऱ्हाणे मांडले. जनतेच्या हाकेला धावून येणाऱ्या नगरसेविका म्हणून परिचित असलेल्या राजश्री चव्हाण यांनी याकामी पुढाकार घेतल्याबद्दल या भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

### पिकअप जीपचे टायर फुटून पलटी होऊन झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू

**सोलापूर, दि.१३ नोव्हेंबर-**

कामती कोरवली रस्त्यावर पिकअप जीपचे टायर फुटून झालेल्या अपघातात पिकअप पलटी होऊन दोघांचा मृत्यू झाला. गुरुवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली. महावीर वसंत खंदारे वय ४५ राहणार पोखरापूर आणि बाई नागनाथ लिंगरे (वय ५० राहणार पोखरापूर) अशी अपघातात मयत झालेल्यांची नावे आहेत. महावीर खंदारे बाई लिंगरे हे कोरवली ते मोहोळ असे चारचाकी जीप मधून प्रवास करीत होते. त्यावेळी कामती ते कोरवली रोडवरील काम ठीपासून दोन किलोमीटर अंतरावर पिकअप जीपचे पाठीमागचे चाक अचानक फुटून जीप पलटी होऊन अपघात झाला. खंदारे व लिंगरे यांना बेशुद्ध अवस्थेत नातेवाईक आकाश कणसे यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# ११८ ग्रामपंचायतींना लेखापरीक्षणाचा विसर

## ग्रामसेवकांच्या वेतनातून ४ कोटी ९५ लाख रुपये कपात करण्याचे आदेश




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-:**

सोलापूर जिल्ह्यातील ११८ ग्रामपंचायतीने लेखापरीक्षण करण्यास दप्तरच उपलब्ध करून दिले नाही. त्यामुळे या ग्राम पंचायतीमधील ग्रामसेवकांच्या २ वेतनातून प्रत्येकी २५ हजार रुपये असे जवळपास ४ कोटी ९५ लाख रुपये कपात करण्याचे आदेश ग्राम पंचायत विभागाने दिले आहे.

विशेष म्हणजे, ज्या ग्राम पंचायतीने लेखापरीक्षण केले नाही अशा ग्रामसेवकांकडून दंडाची रक्क्म वसुलीचे आदेश यापुर्वी देण्यात आले होते. त्यानुसार ऑक्टोंबर २०२५ अदा नोव्हेंबर २०२५ च्या वेतनातुन दंडाची रक्कम वसुल करुन चलन संबंधित कार्यालयाकडे सादर करणे अपेक्षित होते. परंतु गटविकास अधिकाऱ्यांकडून दंडाची रक्कम वसुली केलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत अधिकारी यांचे नोव्हेंबर २०२५ चे डिसेंबर २०२५ च्या वेतनातून दंडाची रक्कम वसुल करण्याच्या सूचना ग्रामपंचायत विभागाने ज्या त्या तालुक्यातील गटविकास अधिकाऱ्यांना पत्रकाद्वारे कळविले आहे. नोव्हेंबर २०२५ अदा डिसेंबर २०२५ च्या वेतनातून दंडाची रक्कम वसुल करुन चलनाची प्रत देण्याचे आदेश दिले आहेत.

### गोपनीय अहवालात नोंद

दंडाची रक्कम वसुल केल्याशिवाय वेतन देयक सामान्य प्रशासन विभाग सादर करु नये, जर दंडाची रक्कम वसुल न झाल्यास गटविकास अधिकारी यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्याचा इशारा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिला आहे.

### विभागीय आयुक्तांकडे पाठविले पत्र

ज्या ग्रामपंचातयीने लेखापरीक्षण करुन घेतले नाही तेथील गावातील ग्रामसेवकांकडून प्रत्येकी २५ हजार रूपये दंडाची रक्कम वसुलीबाबतचे पत्र विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठविले आहे. त्यामुळे लवकरच ती रक्क्म वसुल केली जाणार आहे, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी सांगितले.

### तालुकानिहाय ग्रामपंचायतींची संख्या

बार्शी २२, अक्कलकोट १६, मोहोळ १०, द.सोलापूर १७, सांगोला ४, पंढरपूर ७, करमाळा २०, माढा ६, मंगळवेढा ५, उत्तर सोलापूर ४, माळशिरस ६

### काही ग्रामसेवक मयत

काही ग्रामपंचायतीने सन २००७ ते २०२१ मधील लेखापरीक्षण न केलेल्या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. तर काही ग्रामसेवक मयत झाल्याने त्या ग्रामसेवकांकडून ही रक्कम वसुली होणे कठीण असल्याचे सांगण्यात येते.

पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल योजना

# जागा घेण्यासाठी ५० हजार नव्हे आता एक लाख रुपये मिळणार

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर :**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्वावलंबी बनवण्यासाठी शासनाने सुरु केलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेतून घरकुल लाभार्थ्यांना जागा घेण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यात येत होती. त्यामध्ये आता वाढ करण्यात आली असून, त्या लाभार्थ्यांना एक लाख रुपये मिळणार आहे. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना फायदा होणार आहे.

या योजनेतून सोलापूर जिल्ह्यात मागील काही वर्षांत हजारो लाभार्थ्यांनी जागा घेवून घरकुलांचे बांधकाम केले आहे. मात्र, ५० हजार रुपयात जागा खरेदी होत नसल्याने त्या रक्कमेत वाढ करावी, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत होती. दरम्यान, काही ठिकाणी रेडीरेकनर दर जास्त असल्याने ५० हजारात जागा घेणे लाभार्थ्यांना शक्य नव्हते. त्यामुळे शासनाने तीत दुप्पट वाढ केली आहे. पंढरपूर येथील पाच लाभार्थ्यांनी स्वतः जमीन खरेदी करून घरकुल बांधले होते. त्यांची साधारणत ५० हजार रुपयांपर्यंत रक्कम प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्यांच्या नावे चेक देण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेकडे अजून चार नवीन प्रस्ताव दाखल झाले आहेत. त्या लाभार्थ्यांना एक लाख रुपयांप्रमाणे अनुदान मिळावे, यासाठी प्रस्ताव आले आहेत. ६६ घरकुल लाभार्थ्यांना गावठाण, गायरानची सरकारी जमीन देण्यास काही ठिकाणी तांत्रिक अडचणी आहेत. ज्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्यासाठी जागा नाही, अशा लाभार्थ्यांनी दीनदयाळ उपाध्याय योजनेतून अनुदान मिळण्यासाठी पंचायत समिती येथे प्रस्ताव दाखल करावा, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी केले.

# बालाजी अमाईन्स लिमिटेडला रोटरी इंडियाकडून 'बेस्ट प्रोजेक्ट' पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

रोटरी इंडियाच्या वतीने देशभरातील उद्योगसमूहांच्या सामाजिक जबाबदारीतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत रोटरी इंडिया नॅशनल CSR अवॉर्ड २०२५ जाहीर करण्यात आले. या प्रतिष्ठित पुरस्कारांमध्ये बालाजी अमाईन्स लिमिटेड, सोलापूर या कंपनीने राष्ट्रीय स्तरावरील मोठ्या उद्योगसमूह (Large Enterprise) या गटात आरोग्य क्षेत्रासाठी बेस्ट प्रोजेक्ट हा पुरस्कार पटकावला आहे.




रोटरी इंटरनॅशनलचे संचालक के. पी. नागेश यांच्या हस्ते बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकिय संचालक डी. राम रेड्डी यांनी पुरस्कार स्वीकारला. हा पुरस्कार वितरण समारंभ माणेकशॉ सेंटर, दिल्ली येथे १३ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडला. या कार्यक्रमास रोटरी इंटरनॅशनलचे अध्यक्ष शरत जैन, सचिव मंजू फडके, रोटरी इंडिया नॅशनल सीएसआर अवॉर्डचे कमिटीचे अध्यक्ष डॉ. शैलेश पालेकर उपस्थित होते.

बालाजी अमाईन्स लिमिटेड ही सोलापुरातील अलिफॅटिक अमईन्स आणि स्पेशालिटी केमिकल्स निर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असून, व्यावसायिक यशासोबतच कंपनीने सामाजिक जबाबदारीच्या क्षेत्रात विशेषत: आरोग्य सेवेच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

कोविड काळापासून कंपनी सातत्याने आरोग्यसेवेच्या बळकटीसाठी काम करत असून, सोलापूर शहरात तीन रुग्णालयांचे नूतनीकरण केले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अत्यल्प किंमतीत किंवा विनामूल्य सेवा या रुग्णालयांच्या माध्यमातून गरजुंना मिळत आहे. या रुग्णालयांमध्ये आता अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, त्या कोणत्याही कॉर्पोरेट रुग्णालयांच्या तोडीस तोड आहेत.

या प्रसंगी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांनी सांगितले की, कंपन्यांवर CSR ची जबाबदारी कायदेशीररीत्या लागू होण्यापूर्वीच, आमच्या व्यवस्थापनाने १९९० च्या दशकात 'बालाजी फाउंडेशन'च्या माध्यमातून समाजसेवा सुरू केली होती. आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, क्रीडा आणि पर्यावरण या क्षेत्रांमध्ये आम्ही सतत कार्यरत आहोत. चेअरमन ए. प्रताप रेड्डी नेहमी सांगतात की ज्या समाजातून आपण कमावतो, त्यालाच काहीतरी परत द्यावे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. आज रोटरी इंडियाकडून राष्ट्रीय स्तरावरील हा सन्मान मिळाल्याचा आम्हाला अभिमान आणि आनंद वाटतो, हा पुरस्कार बालाजी अमईन्स लिमिटेडच्या समाजाभिमुख दृष्टीकोनाचा आणि दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीचा गौरव असून, कंपनीने आरोग्य, शिक्षण आणि समाजकल्याण या क्षेत्रांमध्ये उभारलेले कार्य इतरांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.





## मुख्यमंत्री फडणवीस, उद्योजक श्लोका अंबानींच्या पुढाकाराने

# गडचिरोलीत सोलर शाळा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**गडचिरोली, दि. १३ नोव्हेंबर-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि प्रसिद्ध अंबानी उद्योगसमूहातील सदस्य व रोझी ब्लू फाउंडेशनच्या संचालिका श्रीमती श्लोका अंबानी यांच्या सामाजिक सहकार्यातून नक्षलग्रस्त व दुर्गम गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या सौरऊर्जीकरणाचा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून विशेष कौतुक :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रोझी ब्लू फाऊंडेशन आणि त्यांच्या स्वयंसेवा प्लॅटफॉर्म कनेक्ट फॉरच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांचे विशेष कौतुक केले. कनेक्ट फॉरच्या संस्थापक श्रीमती श्लोका अंबानी आणि सह-संस्थापक श्रीमती मानिती शाह यांनी गडचिरोली जिल्ह्यावर विशेष लक्ष केंद्रित करावे, अशी सूचना स्वतः मुख्यमंत्र्यांनी दिली होती. त्याला अनुसरून देशातील अग्रगण्य अंबानी उद्योग समूहातील सदस्य श्रीमती श्लोका अंबानी यांनी नीती आयोगाने 'आकांक्षित जिल्हा' म्हणून घोषित केलेल्या गडचिरोलीमध्ये शैक्षणिक पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी घेतलेला पुढाकार अत्यंत प्रशंसनीय असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. जिल्हा प्रशासन यांच्या माध्यमातून प्रकल्पाला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### धानोरा तालुक्यातील १० शाळांसाठी सोलर प्रकल्पास मंजुरी

मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर गडचिरोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांनी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सोलर शाळा प्रकल्पाअंतर्गत रोझी ब्लू फाऊंडेशनला काम करण्यास मंजुरी दिली. पहिल्या टप्प्यात फाऊंडेशनने धानोरा तालुक्यातील दहा जिल्हा परिषद शाळांमध्ये सौरऊर्जेवर आधारित युनिट्स उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेतला. यात जि.प. प्राथमिक शाळा धानोरा, मुसक्या, सालेभट्टी, रांगी, निमगाव, दुडमला, मुरूमगाव, बन्धोना, तसेच जि.प. हायस्कूल धानोरा आणि मोहली या शाळांचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे शाळांमधील अध्यापन व डिजिटल शैक्षणिक उपक्रमांना वीजपुरवठ्यावरील अवलंबन कमी होऊन अखंड सुविधा मिळेल व या शाळांमधील सुमारे १,४७० विद्यार्थ्यांना याचा थेट लाभ होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि श्रीमती श्लोका अंबानी यांच्या संयुक्त सहकार्यातून सुरू झालेला 'सोलर शाळा प्रकल्प' हा गडचिरोली जिल्ह्यातील शिक्षणप्रणालीसाठी टिकाऊ, स्वच्छ आणि विश्वसनीय ऊर्जा पुरविणारा आदर्श ठरत आहे.

# राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी चारुशीला कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.१३ नोव्हेंबर -**

राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच निवड झालेल्या कु.चारुशीला कुलकर्णी यांचा पंढरपूर येथील नागेश फाटे संपर्क कार्यालयात उत्साहात सत्कार करण्यात आला. चारुशीला कुलकर्णी यांच्या या महत्वपूर्ण निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी हा खास समारंभ आयोजित करण्यात आला होता.



यावेळी, नागेश फाटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. चारुशीला कुलकर्णी यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना पुढील कामासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी बोलताना नागेश फाटे म्हणाले चारुशीला कुलकर्णी यांनी पक्ष संघटनेसाठी वाढी साठी आज पर्यंत मोठे काम केले आहे. त्यांच्या निवडीमुळे युवतींना अधिक प्रेरणा मिळेल, व पक्ष संघटना अधिक मजबूत होईल असे मत नागेश दादा फाटे यांनी व्यक्त केले.ह्या सत्कार समरंभाला अभिजित कवडे, सुप्रिया अभिजित कवडे, किशोर कवडे आणि अनिता किशोर कवडे, स्वप्नाली घोडके, हर्षा सुतार, संग्राम कापसे, विनय शिंदे आदी उपस्थित होते.

# आता 'देवाभाऊ'च आमचे कुटुंबप्रमुख!

## आ.देवेंद्र कोठेंनी व्यक्त केल्या भावना

**प्रथमेशला घेवून भाजपाचे नेटवर्क, मुख्यमंत्र्यांना दिले अभिवचन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर**

लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी माझ्या भाजप पक्ष प्रवेशाप्रसंगी ना.देवेंद्र फडणवीस यांनी तू काळजी करू नकोस, मी तुझं पालकत्व स्वीकारतो असं म्हटलं होतं. पुढे माझ्याकरिता जागा सोडवून घेणे असो की माझ्या विधानसभा निवडणुकीची यंत्रणा बारकाईने हाताळणे याबाबत त्यांनी आपला शब्द तंतोतंत पाळला. माझ्या विधानसभेच्या विजयानंतर थोड्याच दिवसात आम्हा कोठे कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला.

माझे काका महेश कोठे यांचे प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यात आकस्मिक निधन झाले. या संकटकाळात ना.फडणवीस यांनी कुटुंब प्रमुखाप्रमाणे आमच्या पाठीशी उभे राहिले. त्यामुळे ना.फडणवीस हेच आमचे आता कुटुंबप्रमुख असल्याच्या भावना आ. देवेंद्र कोठे यांनी व्यक्त केल्या. दरम्यान, चुलत भाऊ प्रथमेश कोठेला घेवून सोलापुरात भाजपाचे नेटवर्क वाढविण्याचे अभिवचन आ.देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्र्यांना दिले.





महेश अण्णांच्या निधनानंतर माझ्या छोट्या भावाला म्हणजेच प्रथमेश महेश कोठे यांस सोबतच घ्यावे, एकटे पडू देऊ नये ही माझी इच्छा होती. त्याचबरोबर स्व. महेशअण्णा यांचा प्रभाव असलेल्या विडी घरकुल भागातील आजी-माजी लोकप्रतिनिधींना सोबत घेतल्यास पक्षाला देखील फायदेशीर ठरेल, म्हणून पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षातील वरिष्ठांशी चर्चा केली. त्यानुसार प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथील भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात माझे बंधू तथा माजी नगरसेवक प्रथमेश महेश कोठे यांच्यासह स्थायी समितीचे माजी सभापती विनायक कोंड्याल, माजी नगरसेविका कुमुद अंकाराम, माजी नगरसेवकद्वय विठ्ठल कोटा, शशिकांत कैंची, परिवहन समितीचे माजी सदस्य परशुराम भिसे, संतोष सोमा आदींसह इतर अनेक पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. पक्षप्रवेश केलेल्या सर्वांसोबत मुख्यमंत्री फडणवीस यांचीही वर्षा निवासस्थानी जाऊन भेट घेतली व आगामी काळासाठी आशीर्वाद घेतला. या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी माझे काका स्व. महेश कोठे यांच्या आठवणी शेअर करत उपस्थित आम्हा सर्वांना प्रोत्साहन दिले व आगामी काळात सुध्दा असेच पाठीशी राहणार असल्याबाबत आश्वस्थ केले. या प्रेरणादायी भेटीतून ऊर्जा घेऊन आम्ही सोलापुरात आलो.

दरम्यान, भाजपा परिवार वाढवतानाच माझं पालकत्व स्वीकारलेल्या मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज आमचा कोठे परिवार सुद्धा एकत्र आणला याचा मनस्वी आनंद झाला. ही कृतज्ञता मी शब्दात व्यक्त करु शकत नाही, असाही निर्वाळा आ. कोठे यांनी व्यक्त केला.

# 'लोकमंगल'च्या सामुदायिक विवाह सोहळ्यात जिल्हा पर्यटन थीम राबविणार : आ.सुभाष देशमुख

- रविवार, दि.१६ नोव्हेंबर रोजी सोहळा होणार
- ५२ जोडपी विवाह बंधनात अडकणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर :**

लोकमंगल फाउंडेशनतर्फे रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०८ या गोरज मुहुर्तावर विजापूर रोड येथील शिवाजी अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे विवाह सोहळ्याचे २० वे वर्ष असून, यावेळी ५२ जोडपी विवाहबध्द होणार आहेत.

यंदाच्या विवाह सोहळ्याच्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा पर्यटन थीम राबविण्यात येणार आहे. विवाह सोहळ्याच्या ठिकाणी जिल्ह्यातील विविध गावांची वैशिष्ट्ये, पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची असणारी ठिकाणे, सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा दर्शविणारे फलक प्रदर्शित केली जाणार आहेत, अशी माहिती लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व नववधू-वरांच्या कुटुंबांना दिलासा मिळावा या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. प्रत्येकाच्या धर्माप्रमाणे विवाह लावून दिले जाणार आहेत. यंदा ४९ जोडप्यांमध्ये ३ बौध्द तर ४६ हिंदू जोडपे आहेत. विवाहासाठी आवश्यक सर्व खर्च लोकमंगल फाउंडेशनमार्फत करण्यात येणार आहे. वधू-वरांना गृहोपयोगी साहित्य, कपडे, दिले जाणार आह. वधू वरांची शहरातील प्रमुख मार्गाने रथामधून मिरवणूक काढण्यात येणार आहे.

सोहळ्याचे संपूर्ण स्थळ २५० बाय २०० फूट क्षेत्रफळामध्ये तयार करण्यात येणार असून, भोजन व्यवस्था ९० बाय १५० फूट जागेत असेल. या विवाह सोहळ्यात दोन्हीकडील सुमारे २५ ते ३० हजार वऱ्हाडी मंडळींना भोजनाची सोय करण्यात आले आहे. भोजनात चपाती भाजी, भात व बुंदी याचा समावेश असणार आहे. दरवर्षीप्रमाणे रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. तसेच नवविवाहात जोडप्यांना संसार सुखाचा करण्याबाबत सूचना देणारा समुपदेशनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आले, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला लोकमंगल फाउंडेशनचे संचालक मारुती तोडकर, अभय पटणी, सुजाता सुतार, उत्तम शिंदे, बाळासाहेब घोडके, माजी नगरसेविका अश्विनी चव्हाण आदी उपस्थित होते.

### आतापर्यंत ३ हजार १५३ जोडपी विवाहबध्द

लोकमंगल फाउंडेशनमार्फत एकूण ४६ सामूहिक विवाह सोहळे पार पडले आहेत. आतापर्यंत ३१५३ जोडपी विवाहबध्द झाली असून त्यापैकी हिंदू : २४४३ जोडपी, बौद्ध : ६७८ जोडपी,मुस्लिम : २१ जोडपी, ख्रिश्चन : ०४ जोडपी, जैन : ०७ जोडपी विवाहबध्द झाली आहेत.

# कलाकार मानधन योजनेचा अर्ज ऑफलाईन पध्दतीनेही घ्या : इंगळे महाराज

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर**

कलाकार मानधन योजनासंदर्भात कलाकारांना ऑनलाईन अर्ज भरायचे आहे ते ऑफलाईनही भरता यावा म्हणून ऑनलाईन सोबत ऑफलाईन पध्दतीने अर्ज घ्यावेत, अशी मागणी अखिल भारतीय वारकरी मंडळाचे ह.भ.प.सुधाकर इंगळे यांनी ना.आशिष शेलार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



महाराष्ट्रातील संत परंपरा ही विचार व ज्ञानाची शिदोरी आहे. ते संतांचे अभंग भजनाच्या माध्यमातून समाजमनात रुजवणे ही एक कला आहे. अशा अनेक लोककलांना चालना मिळावी म्हणून महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून कलाकार मानधन योजना सुरु करण्यात आली. मात्र, ऑनलाईन स्वरुपात अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत खूप अडचणी आहेत. तो नियम कलाकारांना त्रासदायक ठरत आहे. ग्रामीण भागातील कलाकारांना हे शक्यच होत नाही. त्यासाठी लागणारी सर्व कागदपत्र पीडीएफ करणे, त्यामध्ये १५ वर्षा पूर्वीपासून कलाकार असलेला पुरावा. कार्यक्रम पत्रिका, कार्यक्रम फोटो, नोंदणी कृत संस्था शिफारस पत्र, प्रमाण पत्र, रहिवाशी दाखला, वयाचा दाखला, रहिवाशी दाखला म्हणून आधार कार्ड किंवा मतदान कार्ड आणि रेशन कार्ड ग्राह्य धरावे, इ. अनेक कागदपत्र आवश्यक आहेत. त्यामुळे ऑफलाईन व ऑनलाईन दोन्ही पद्धतीने अर्ज घ्यावेत.

१० वर्षा पूर्वीचा पुरावा ग्राह्य धरावा. ऑनलाईन लिंक फक्त जुलै एक महिनाच असते. ती वर्षभर असावी व तपासणी कालावधीसाठी काल मर्यादा निश्चित करावी. अशा अनेक मागणीचे निवेदन देण्यात आल्यामुळे त्यासंबंधी मंत्रालयात दि. १२ नोव्हेंबर ला दु. २.०० वा. बैठक लावण्यात आली होती. अधिकारी व आपण प्रत्यक्ष चर्चा करून हे सर्व विषय मार्गी लावू असे आशिष शेलार म्हणाले होते म्हणून बैठक लावली होती . परंतु ही सध्या बैठक पुढे गेली आहे, असे संस्कृतीक विभागाकडून इंगळे महाराज यांना पत्राद्वारे कळवण्यात आले आहे.

## अग्रलेख...

# ‘हे’ मरतात आणि ‘ते’ घोरतात!

मेळघाटात लहानगी बालके, गर्भवती आणि स्तनदा माता मरतात. पश्चिम विदर्भात शेतकरी मृत्यूला कवटाळतात. तरीही आपण समजायचे की, महाराष्ट्रात सारे आबादीआबाद आहे! नेते भाषणे देतात, उद्घाटने, भूमिपूजने करतात, सत्कार स्वीकारतात आणि नोकरशाही तिच्या साऱ्याच बाशिंद्यांसह थेट घोरत असते. शेतकऱ्यांचे आणि कुपोषित बालकांचे मृत्यू इतके ‘नॉर्मल’ झाले आहेत की, त्याची कुणालाच लाज वाटत नाही आणि कुणाला साधी खंतही नाही. मेळघाटात गेल्या जूनपासून ६५ बालके कुपोषणामुळे मेली. त्यांचे वय सहा महिन्यांच्या आत. त्यावर उच्च न्यायालयाने पुन्हा सरकारला सुनावले. पण, सरकारी यंत्रणांचे कान बहिरे झाले आहेत. दोनेक दशकांपासून न्यायालय आदेश देत आहे. पण, शासन नुसत्या समित्या नेमत आहे. निधी मंजूर होतो, परंतु मेळघाटातला हा प्रश्न सोडविण्यासाठी काहीही चांगले घडत नाही. शेतकऱ्यांचीही तीच परिस्थिती. हे पॅकेज, ते पॅकेज, कर्जमाफी वगैरेचे आश्वासन. पण, त्यांनाही शेवटी मृत्यूशीच दोस्ती करावी लागते. इतके लाख किंवा हजार कोटींची गुंतवणूक आली, कृत्रिम बुद्धिमत्तेचे इतके प्रकल्प आले, इतके हजार रोजगार निर्माण होत आहेत. महाराष्ट्रात सर्व आबादीआबाद होणार आहे, अशा बातम्या रोज आपण वाचतच असतो. त्याच महाराष्ट्रात यवतमाळ जिल्हा आहे. त्याच महाराष्ट्रात मेळघाट आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे रोज अश्रूंचे पाट वाहत आहेत आणि दुसरीकडे कोवळ्या जिवांच्या मृत्यूचा आर्त आक्रांत आहे. मेळघाट हा जंगलांनी वेढलेला, निसर्गाने समृद्ध, पण उपेक्षित असलेल्या जिवांचा प्रदेश. या भागात आजही बालकाचा जन्म म्हणजे एका धोकादायक प्रवासाची सुरुवात असते. कुपोषण, अन्नटंचाई, आरोग्यसेवेचा अभाव, पाण्याची कमतरता आणि ढिसाळ सरकारी यंत्रणा या साऱ्यांनी मिळून साकारलेले नवजातांचे थडगे म्हणजे मेळघाट. विदर्भात शेतकरी आत्महत्यांची तर आपल्या साऱ्यांना सवयच झाली आहे. शेतकऱ्यांचे मरण आता दुःखद किंवा चिंताजनक ‘घटने’त मोजले जात नाही, तर दिनक्रमात मोजले जाते.

गेल्या १० महिन्यांत पश्चिम विदर्भात सुमारे ९०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. ऐन दिवाळीत तब्बल ८७ शेतकऱ्यांनी मरण पत्करले. १ जानेवारी २००१ पासून आजपर्यंत २२ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. म्हणजे दर आठ तासांनी एक शेतकरी स्वतःचे जीवन संपवतो आहे; तरीही महाराष्ट्रात सारे काही आबादीआबाद आहे! आरोग्य विभाग बालमृत्यू रोखण्यात अपयशी. कारण तो स्वतःच आजारी आहे. महिला व बालकल्याण विभागाला त्यांच्या नावातील ‘कल्याण’ या शब्दाचा अर्थही माहिती नाही. आदिवासी विकास विभागाला ‘विकास’ कशाशी खातात हे ठाऊक नाही. महसूल विभागाला कामे खूप, पण निष्पन्न शून्य. ग्रामीण विकास विभाग फक्त नावापुरता ‘ग्रामीण’ आहे. या साऱ्यांतून मेळघाट घडत असते. कुपोषित बालकांचे जीव वाचवण्यासाठी पोषण आहार योजना सुरू झाली. पण बालकांच्या-मातांच्या पोषणाच्या ऐवजी भ्रष्टाचार वाढला. पोषक अन्नाच्या डब्यातून ठेकेदारांना मोठे घबाड गवसले. शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आल्या, येत असतात. तिथेही ठेकेदारांचे, अधिकाऱ्यांचे खिसे भरले जातात. मेळघाटात अजूनही जवळपास ४० टक्क्यांहून अधिक बालके कुपोषित आहेत. मातांच्या मृत्यूचा दर अजूनही राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. तज्ज्ञांचे म्हणणे असे की, बालकाच्या जीवनातील आरंभीचे एक हजार दिवस फार महत्त्वाचे असतात. म्हणजे एक सशक्त बाळ आकाराला येण्यासाठी ते किमान तीन वर्षे स्वस्थ स्वरूपात जगले पाहिजे. दोन वर्षांच्या वयापर्यंत बालकाच्या मेंदूचा सुमारे ८० टक्के विकास होतो. पण, तेवढा काळ ते स्वस्थ स्वरूपात जगले तर ना! मेंदूच्या विकासात त्याच्या पुढच्या आयुष्याची पायाभरणी होते. त्यामुळे बालकांना सुरुवातीच्या काळातच चांगले पोषण, आरोग्य सेवा आणि चांगले वातावरण मिळाले पाहिजे. एका संशोधनात असे आढळले होते की, भारतातील पाच वर्षांच्या आतील सुमारे १४ कोटी मुलांपैकी ३५ टक्क्यांहून जास्त मुलांचे वजन अपेक्षेपेक्षा कमी आहे. यात मेळघाटातील बालके असणारच. शेतकरी आत्महत्यांच्या बाबतीत महाराष्ट्र गेल्या अनेक वर्षांपासून देशात पहिल्या क्रमांकावर आहे. केंद्र आणि राज्य सरकार हजारो कोटींचा निधी खर्च केल्याचा दावा करतात. पण त्याचा प्रत्यक्ष परिणाम कुठे दिसतो? शेतकऱ्यांचा कर्जबोजा कमी झाला का? मेळघाटातील बालकांचे मृत्यू थांबले काय? मग एवढा पैसा गेला कुठे? सरकारी यंत्रणा निष्क्रिय आणि उदासीन आहे. समाजही तितकाच असंवेदनशील झालाय. आत्महत्या किंवा कुपोषणाची बातमी सामोरी आली की आपण पुढच्या पानाकडे वळतो. शेतकरी-बालके तडफडत मरतात. यावरचे उपाय साऱ्यांना माहिती आहेत. त्यांची उजळणी कित्येकदा झालेली आहे. फक्त ते करायचे कुणी, हा प्रश्न अजून शिल्लक आहे. दरवेळी कुठल्या तरी पुढाऱ्याच्या किंवा महात्म्याच्या नावाने एखादी योजना जाहीर होते. अभियानाची घोषणा होते. त्याची घोषवाक्ये बनतात. गुळगुळीत बॅनर्स, पोस्टर्स तयार होतात. कार्यक्रम होतात. सत्कार आणि हारतुरे होतात. पण, सुदूर आदिवासीबहुल भागातले नवजात बालक पोषणासाठी तडफडत असते. शेतकरी हवालदिल झालेले असतात. त्यांच्यापर्यंत कुणीही पोहोचत नाही. सत्तेत बसलेली सारीच शेतकऱ्यांची मुले आहेत म्हणे. सारीच कधी तरी बालक स्वरूपात जन्माला आली होती. तरीही त्यांच्याकडे संवेदना नाहीत. न्यायालयाला दरवेळी सरकारी यंत्रणांच्या संवेदना जाग्या करण्याचा प्रयत्न करावा लागतो. मुख्य सचिव आणि सचिवांना बत्ती द्यावी लागते. आता ही धाटणी बदलली पाहिजे. शेतकरी आत्महत्या करीत राहतील आणि कुपोषित बालके मरत असतील तर त्याची जबाबदारी सरकारी यंत्रणेतील प्रत्येक संबंधित पदाधिकारी-अधिकारी-कर्मचाऱ्यावर टाकली गेली पाहिजे. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांसह समस्त यंत्रणेला अशा एकेका मृत्यूसाठी जबाबदार धरले पाहिजे. चौकशा लावून त्यांना दंडित केले पाहिजे. बाकीचे उपाय कामाला येत नसतील तर आता सरकारी यंत्रणेला अशाप्रकारे जबाबदार ठरविणे हाच पर्याय उरतो. कारण त्यांची ढिसाळ कार्यपद्धती महाराष्ट्रासाठी अजिबात भूषणावह राहिलेली नाही. महाराष्ट्र हे समृद्ध राज्य आहे, असे म्हणतात. ते प्रगतिशील आहे, असेही म्हणतात. मग त्याच महाराष्ट्राला शेतकऱ्यांच्या आणि कोवळ्या जिवांच्या मृत्यूची सवय होते, याला काय म्हणायचे? शेतकरी आणि कुपोषित बालके मरत असतात आणि सरकारी यंत्रणेतले सारे घटक घोरत असतात, यावर कोणता उपाय करायचा? महाराष्ट्र प्रगतिपथावर असेल तर आत्महत्येला कवटाळणाऱ्या शेतकऱ्यांचा आणि कुपोषणाने मरत असलेल्या कोवळ्या जिवांचा या प्रगतीवर हक्क नाही काय? त्यांना जगावेसे वाटत नसेल काय? प्रश्न अनेक आहेत. पण, कुणालाच या प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी सवड नाही. ज्या समाजात मृत्यूंच्या बातम्या ‘रूटीन’ समजल्या जातात, त्या समाजात जगण्याचे महत्त्व कमी-कमी होत जाते. शेतकरी आणि बालके यांच्या मृत्यूंची पृष्ठभूमी एकच असली, तरी त्याची कारणे सरकारी यंत्रणेच्या उदासीनतेत, नाकर्तेपणातच दडलेली आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांना फक्त वेतन आयोगांचे फायदे हवेत. भत्ते हवेत, सोयी-सवलती हव्यात. जबाबदारी कोणतीच नको. ज्यांनी त्यांच्यावर जबाबदारी टाकायची किंवा त्यांना जबाबदार ठरवायचे किंवा कामाचा हिशेब मागायचा, ते स्वतःच्या विश्वात मश्गूल आहेत. आम्ही निधी दिला म्हणजे इतिकर्तव्य पूर्ण झाले, हाच या साऱ्यांचा आविर्भाव असतो. पैशाने सगळे प्रश्न सुटले असते तर मेळघाटात एकही मूल मरण्याचे कारण शिल्लक राहिले नसते. पॅकेजने शेतकऱ्यांची स्थिती सुधारायची असती तर एव्हाना आत्महत्यांचे सत्र थांबून गेले असते. आजही मेळघाटात एखादं बाळ तडफडत असेल आणि यवतमाळ जिल्ह्यात एखादा शेतकरी शेवटचे पत्र लिहीत असेल तर दोष कुणाला द्यायचा? ‘आमच्यासाठी काहीतरी करा’ अशी दोघांचीही आर्त हाक असते. त्याला खऱ्या अर्थाचा प्रतिसाद देणारे मात्र कुणीही नाही. कारण त्यांच्या कोरड्या प्रतिसादात ‘आम्ही निधी दिला, आम्ही प्रयत्न करतोय’ यापलीकडे सांगण्यासारखे काहीही नाही. हे इकडे मरत असतात आणि ते तिकडे घोरत असतात...! कुठवर? ▮▮

## तंत्रवेध

# क्रिकेटमध्ये आधुनिक तंत्रज्ञान

**डॉ. दीपक शिकारपूर**

क्रिकेट हा खेळ प्राचीन काळापासून खेळला जात असून, कालौघात त्यामध्ये अनेक बदल झाले आहेत. एकीकडे खेळाची गती वाढली, तशीच प्रेक्षकांची अपेक्षा आणि निर्णायकतेबाबतची अचूकताही वाढली. या बदलत्या गरजांमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर क्रिकेटमध्ये वाढू लागला. आजच्या घडीला, क्रिकेट सामन्यांमध्ये तंत्रज्ञानाची भूमिका इतकी महत्त्वाची झाली आहे की त्याविना अचूक निर्णय, विश्लेषण किंवा प्रेक्षकांना उच्च दर्जाची अनुभूती देणे अशक्यप्राय झाले आहे. क्रिकेटमध्ये १९९० च्या दशकात तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला, परंतु त्याचा खरा प्रभाव २००० नंतर दिसून आला. सुरुवातीला हा बदल फक्त थोड्या प्रमाणावर रिप्ले दाखवणे, स्कोअरकार्ड इलेक्ट्रॉनिक करणे इतपत मर्यादित होता. परंतु टीव्ही प्रक्षेपण व्यावसायिक होत गेले, तसे डीआरएस, हॉक-आय, अल्ट्रा एज, बॉल ट्रॅकिंग यांसारख्या प्रगत प्रणाली क्रिकेटचा अविभाज्य भाग बनल्या. आता त्यापुढची पायरी म्हणजे कुकाबुरा स्मार्ट बॉल. आजचे क्रिकेट ‘डेटा-ड्रिव्हन’ झाले आहे. बॉलचा वेग, स्विंग, बाऊन्स, स्पिन हे सर्व डेटा रूपात संकलित करून विश्लेषण केले जाते. याच पृष्ठभूमीवर ‘कुकाबुरा स्मार्ट बॉल’ हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि क्रांतिकारी तंत्रज्ञान समोर आले आहे. या बॉलने क्रिकेटमध्ये अचूक मोजमाप, फिटनेस मोजणी आणि डेटा ॲनालिटिक्सला नव्या उंचीवर नेले आहे. हल्ली सामन्याप्रसंगी चढाओढ इतकी वाढते की एक एक चेंडू आणि एक एक धाव निर्णायक ठरते. त्यासंदर्भातील निर्णयात थोडीशी चूक झाली तरी चांगले अंपायरिंग झाले नाही किंवा पक्षपातीपणा झाल्याच्या तक्रारी चाहत्यांकडून सहज केल्या जातात.

खेळात कटुतेला स्थान नसावे आणि खेळीचे, नियमांचे चोख मूल्यमापन व्हावे या दृष्टीने काही नवी तंत्रे आकाराला येत असल्यास स्वागतच व्हायला हवे. त्या दृष्टीने पाहता कुकाबुरा स्मार्ट बॉल हे तंत्रज्ञानाने क्रिकेटच्या जगात टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे म्हणता येते. हे एक खास तंत्रज्ञान आहे. पारंपरिक खेळाला आधुनिक डेटा ॲनालिटिक्सची जोड देऊन या बॉलने खेळाडूंच्या प्रशिक्षणाची पद्धत, प्रेक्षकांचा सामना पाहण्याचा, रसग्रहण करण्याचा अनुभव आणि सामन्यांच्या निर्णयाचे स्वरूप पूर्णपणे बदलण्याची क्षमता दाखवली आहे. कुकाबुरा स्मार्ट बॉल हा एक विशेष बॉल आहे, ज्यामध्ये अत्याधुनिक सेन्सर टेक्नॉलॉजी वापरली आहे. पारंपरिक बॉलप्रमाणे दिसणारा हा बॉल आतून अत्यंत तंत्रसमृद्ध आणि बुद्धिमान आहे. या बॉलमध्ये स्मार्ट चिप्स आणि सेन्सर बसवलेले असतात, जे बॉलच्या प्रत्येक हालचालीची माहिती संकलित करतात. हे तंत्र कुकाबुरा कंपनी आणि स्पोर्टकोर नावाच्या ऑस्ट्रेलियन स्टार्टअपच्या संयुक्त प्रयत्नातून विकसित झाले आहे. बॉलच्या आतमध्ये लपवलेले हे सेन्सर बॉलच्या वेगापासून बॉलिंग ॲक्शनपर्यंत अनेक गोष्टी मोजतात. अशा या कुकाबोरा स्मार्ट बॉलमध्ये नेमके काय असते, याचा वेध घेऊ. त्यात सर्वांत महत्त्वाचे असते ते मायक्रो सेन्सर युनिट. बॉलच्या कोअरमध्ये बसवलेले हे युनिट बॉलचा वेग, गती, फिरकी, बाऊन्स यांसारख्या क्रियांचा डेटा संकलित करते. त्याखेरीज असते ते ब्लूटूथ टान्समीटर. हा ट्रान्समीटर बॉलमधून संकलित झालेला डेटा जवळील डिव्हाईस (स्मार्टफोन, टॅबलेट, संगणक)ला वायरलेस पद्धतीने पाठवतो.

या तांत्रिक सक्षमतेमुळे खेळाच्या अनेक टप्प्यांमध्ये नेमकी खेळी तपासून, उलगडून पाहायला मदत होते. याखेरीज यात एक लहान बॅटरी असते, जी बॉल अनेक तास वापरला, तरी टिकते. ही बॅटरी बदलता येते किंवा रिचार्ज करता येते. गंमत म्हणजे हा बॉल मोबाईल ॲपशी संलग्न असू शकतो. कुकाबुरा स्मार्ट बॉलसाठी खास ॲप उपलब्ध आहे. यामध्ये बॉलिंग आणि गोलंदाजांची पूर्ण माहिती रिअल-टाईममध्ये दिसते. त्याचे काही प्रमुख फायदे लक्षात घ्यायला हवेत. पहिला महत्त्वाचा फायदा म्हणजे रिअल टाईम डेटा आणि अचूक विश्लेषण उपलब्ध होणे. पारंपरिक बॉलमध्ये फक्त निरीक्षणावर आणि वेगाची मोजणी करू शकणाऱ्या साधनांवर अवलंबून राहावे लागत होते; पण स्मार्ट बॉलमुळे वेगाच्या प्रत्येक टप्प्यावर, फिरकीचे प्रमाण, सीमची स्थिती, बाऊन्स आणि बॉलवरील पॉवर यावर अचूक, डेटा क्षणार्धात मिळतो. प्रशिक्षणात विज्ञानाधारित सुधारणा पाहायला मिळते. प्रशिक्षक आणि खेळाडूंना बॉल रिलिज, सीम, स्पिन, बाऊन्स आदी तांत्रिक बारीकसारीक गोष्टी उलगडून पाहता येतात. त्यामुळे खेळीमधील त्रुटी ओळखणे, प्रशिक्षण पद्धती वैयक्तिककृत करणे आणि प्रगतीचा मागोवा ठेवणे सोपे जाते. यामुळे कौशल्य सुधारणा साध्य होते. गोलंदाजाला त्याच्या फिरकीचा वेग, गतीतील अचूक फरक आणि चेंडू सोडतानाचा सीमचा कोन लगेच कळतो. यामुळे आपल्या तंत्रात लगेच सुधारणा करता येते. परिणामी, लाईव्ह ब्रॉडकास्टवेळी प्रेक्षकांना खेळातल्या अचूक विश्लेषणाचा अधिक समृद्ध अनुभव मिळतो.

या तंत्राने सज्ज होणारी खेळी अचूक माहितीसह समोर येते. किंबहुना, फक्त डोळ्याला दिसणारा सामना पाहण्यापलीकडे जाऊन खेळाची वैशिष्ट्ये, गोलंदाजाची नेमकी कामगिरी आणि एखाद्या खेळाडूने दाखवलेले कसब अनुभवायला मिळते. लाईव्ह सामना पाहताना, बॉलवरून मिळणारी प्रत्येक माहिती, जसे की स्पीड, स्पिन, बाऊन्स थेट स्क्रीनवर दिसते. त्यामुळे प्रेक्षकांना सामन्यातील बारकावे आणि खेळाडूचे कौशल्य उत्तम समजते. यामुळे उच्च दर्जाचे अंपायरिंग आणि डीआरएस निर्णय आकाराला येऊ शकतो. इन-बॉल सेन्सर्समुळे माहिती घेण्याच्या प्रक्रियेमध्ये अधिक अचूकता येऊन विश्वासार्हता प्राप्त होते. पायचित, कॅच किंवा सीमसंबंधित अगदी बारीक विवादांमध्ये बॉलचा ट्रॅक, बाऊन्स वगैरे माहिती अचूक करता येते. हा तपशील विकास आणि तंत्रज्ञानाचा अभूतपूर्व समन्वय ठरतो. डेटा स्टोरेज आणि एआय बेस्ड विश्लेषणाने क्रिकेटमधील विविध संशोधन आणि निर्णय प्रक्रियेत मदत होते. खेळाच्या भूतकाळातील, वर्तमानातील आणि भविष्यकालीन ट्रेंड एकत्र करता येतात. अनेकदा खेळाडू अन्याय झाला (पंचांनी चुकीचा निर्णय दिला) म्हणून हताश होतो. आता असे होणार नाही. दिला गेलेला निर्णय शंभर टक्के बरोबरच असेल. पंचांना याचा मोठा फायदा मिळू शकेल. वेस्ट इंडीज प्रीमियर लीगसारख्या स्पर्धांमध्ये त्याचा यशस्वी वापर झाला आहे आणि लवकरच हे तंत्र आयपीएल आणि इतर मोठ्या लीगमध्ये अधिक नियमितपणे दिसू शकते. कुकाबुरा स्मार्ट बॉलचा उपयोग केल्याने क्रिकेट सामन्याच्या प्रत्येक पातळीवर - प्रशिक्षण, सामना, निवड, ब्रॉडकास्ट आणि निर्णय ढाच्यात एक प्रगत, डेटा आधारित आणि विज्ञानाधारित युगाची सुरुवात होईल.

आज अनेक खेळांच्या लीग सुरू झाल्या आहेत. त्यांचे स्वरूप स्थानिक राहिलेले नाही, तर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचले आहे. क्रिकेटसारख्या खेळात तर प्रचंड पैसा गुंतलेला असतो. या खेळांच्या आयोजनात, सादरीकरणामध्ये येत असलेली व्यावसायिकता खास महत्त्वाची आहे. आज प्रेक्षकाकडून काही हजार रुपये वसूल केले जातात. ठरावीक सामन्याची उत्सुकता माध्यमांच्या मदतीने प्रचंड प्रमाणात वाढवली जाते. अगदी टीव्हीवर सामना पाहायचा झाला तरी ॲक्शन रिप्ले आणि हायलाईट्सच्या माध्यमातून सामन्याचा टर्निंग पॉईंट किंवा विशेष क्षणचित्रे खास पद्धतीने उलगडून दाखवली जातात. यातूनच मग कधी तरी नेटकेपणाने न घेतला गेलेला कॅच, गोलंदाजाने फेकल्यानंतर बॉलने घेतलेला स्विंग किंवा खेळाडूने कॅच घेताना किंवा थ्रो अडवताना सीमारेषेला केलेला- न केलेला स्पर्श याची अचूक माहिती मिळू शकते. या दृष्टीने क्रिकेटमध्ये येत असलेले नवतंत्रज्ञान महत्त्वाचे आणि लक्षवेधी आहे. कुकाबुरा बॉलमधील नवतंत्राने या संदर्भातील नवा अध्याय लिहायला घेतला आहे. ▮▮

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**रेवती जोशी–अंधारे**

# ट्रेंड भजन क्लबिंगचा!

आपण भारतीय पिढ्यान्‌पिढ्या संगीत आणि कलाप्रेमी आहोत. जन्मापासून मरणापर्यंतचा आपला प्रत्येक सोहळा गीत-संगीतबद्ध असतो. मात्र, टाळ-मृदुंगाच्या लयबद्ध ठेक्यावर ‘राम कृष्ण हरी’ म्हणत रंगणारे भजन आता, गिटार-ड्रमच्या फास्ट बिट्सवर वाजवले आणि गायले जात आहे. जेन झीने ‘भजन क्लबिंग’ असं ट्रेंडी नाव या भजन प्रकाराला दिले असून ही एक प्रकारची सांस्कृतिक पार्टी आहे. भजन क्लबिंग म्हणजे ‘भजन संध्या’ नाहीच; ‘नाईट क्लब’ही नाही. या दोन टोकाचे सामूहिक एकत्रीकरण म्हणजे फ्यूजन नव्या पिढीने तयार केले आणि सध्या त्याचा छान ट्रेंड आला आहे. अगदी अलिकडेपर्यंत गाजलेल्या बॉलिवूड गाण्यांच्या चालींवर देवीचा जगराता, विविध आरत्या, मंत्र-स्तोत्रे आणि भक्तिगीते गाण्याचा ट्रेंड होता. आता या भजन-श्लोकांचाही रिमेक झाला आहे आणि तो सकारात्मक आहे.



हाय एनर्जी आणि ठेका धरायला बाध्य करणारे इलेक्ट्रॉनिक बिट्स म्हणजे ‘भजन क्लबिंग’ची ‘जान’ आहे. कल्पना करा, वीकेण्डच्या पार्टीजमधला मंद प्रकाश, आरशासारख्या चमकदार भिंती आणि सोबत डिजेवर ‘हरे रामा हरे कृष्णा’ची धून! नामसंकीर्तनात भक्त नाचतात हे आपण जाणतोच; पण क्लबमधल्या या वातावरणात आपली जेन झी फेर धरून, अगदी वेडावून नाचत आहेत. ही कमाल आध्यात्मिक शब्द पण लेटेस्ट म्युझिक वाद्यांमुळे होते आहे. कोणतेही मादक पदार्थ, मद्य न घेता चढलेली ही झिंग प्रभुनामाची आहे, हे अनुभवातूनच समजते. आपल्या संस्कृतीसोबतची नाळ अधिक घट्ट करण्याचा हा अफलातून प्रयोग ‘कूल’ ठरतो आहे. भजन क्लबिंग कोण्या एका व्यक्तीने किंवा क्लबने सुरू केलेली संकल्पना नाही तर भारतीय युवावर्गाच्या बदलत्या प्राथमिकता त्यातून स्पष्ट दिसतात. आपली सांस्कृतिक ओळख, अध्यात्माचा वारसा जपण्याचा प्रयत्न करणारी जेन झी! परंपरा आणि आधुनिक विचारांना जोडणारा पूल म्हणजे भजन क्लबिंग! वरवर पाहता कोरडी, असंवेदनशील वाटणाऱ्या पिढीसमोर फास्ट फॅशन आणि सांस्कृतिक बदलांमधून जाण्याचे तणावपूर्ण आव्हान आहे. हातात भरपूर पैसा असला, तरी स्पर्धेत टिकण्याचा ‘स्ट्रेस’ आहे. जगभरातील मैत्रीची साधनं असली, तरी ‘पिअर प्रेशर’ आहे. संयुक्त कुटुंबाचे आदर्श केवळ ऐकलेल्या या पिढीपुढे ‘कल्चरल हसल’ आहे. नातेसंबंधांच्या वेगळ्या अडचणी आणि समाजाकडून अपेक्षा आहेत, ज्या जेन झीच्या पचनी पडत नाहीत. प्रत्येक विचार बुद्धीच्या कसोटीवर तपासून पाहणारी ही पिढी, या नव्या मार्गाने तणावमुक्ती साधण्याचा प्रयत्न करतेय. तणावातून मुक्तीसाठी अमली पदार्थांना स्वयंस्फूर्तीने नकार देणारं हे युवावर्गाचे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. अशा ताणतणावाला तोंड देताना, ठेक्यावर गायली जाणारी भजनं, त्यांना एक आश्वासक ‘ऑल इज वेल’चा अनुभव देत आहेत. क्लबसोबतच कॉलेज कॅंटीन, हॉस्टेल्स, कॉफी शॉप्स, लाऊंज, सोसायटीचे पार्क किंवा जिमसारख्या ठिकाणी, अगदी लहान हॉल बुक करून, युवकांचे ग्रुप्स आधुनिक वाद्यांच्या ठेक्यावर ईशनाम घेत, भक्तीत लीन होताना दिसत आहेत. हनुमान चालीसा, शिवतांडव आणि राधाकृष्णाच्या गीतांसह विविध श्लोक-मंत्र गात नाचणाऱ्या युवकांचे व्हिडीओज सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ‘भजन आणि भोजन करताना संकोच करायचा नाही’ या संकल्पनेवर धुंद होऊन भजन करणारी जेन झी, जीवन आणि अध्यात्माची सांगड घालून खरा आनंद घेते आहे. उपासनेचे हे माध्यम नवीन असले, तरी ईशभक्तीकडे नेणारेच आहे. यात नव्या पिढीसोबतच ‘मिलेनियल्स’ म्हणून ओळखली जाणारी मागच्या शतकातील पिढीही त्याच उत्साहाने सहभागी होते आहे. या नव्या माध्यमातून युवा पिढी अध्यात्माशी आपले नाते टिकवून आहे. माध्यम बदलले; मात्र त्यामागची भावना, श्रद्धा आणि भक्ती सकारात्मकता प्रदान करणारीच ठरावी. ▮▮

९८५०३३९२४०

## विशेष

# मुंबईचा महापौर कुणी खान झाला तर?

**मोरेश्वर बडगे**

सध्या महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे वारे वाहात आहेत. नगर परिषद निवडणुकांसाठी अर्ज भरण्याची धावपळ सुरू आहे. मतदार याद्या सदोष असल्याने निवडणुका पुढे ढकला म्हणणारेही मैदानात उतरत आहेत. पुढच्या टप्प्यात जिल्हा परिषद आणि सर्वात शेवटी महापालिका निवडणुका आहेत. विचित्र समीकरणे यावेळी दिसू शकतात. शरद पवार आणि अजित पवार हे पवार कुटुंब एकत्र दिसू शकते. काहीही होऊ शकते. निवडणुकीच्या या हवेत दिल्लीत लाल किल्ल्याजवळ मोठा बॉम्बस्फोट झाला. १३ लोक मेले आणि जवळपास तेवढेच जखमी झाले. स्फोट दिल्लीचा आहे, पण त्याने महाराष्ट्रातील मतदारांना सावध केले आहे. तुम्ही कोणाला सत्तेत बसवणार याचे भान राखा, याची आठवण करून दिली आहे. अशीच आठवण चार महिन्यांपूर्वी मुंबई भाजपाचे अध्यक्ष अमित साटम यांनी भाजपाच्या एका मेळाव्यात करून दिली होती. ‘मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत परत एकदा उद्धव ठाकरे बहुमत आणू शकले तर कुणी खान महापौर होऊ शकतो’ असे अमित साटम म्हणाले होते. त्यावरून बरेच वादळ उठले होते. साटम किती नेमके बोलले होते, त्याची प्रचीती दिल्लीच्या बॉम्बस्फोटाने आली आहे. चुकीच्या व्यक्तीच्या हाती मुंबईची सूत्रे दिली तर जिहादींना मोकळे रान मिळू शकते. हे अनेकदा दिसून आले आहे.

कधीकाळी भिवंडीचे नगराध्यक्ष आपल्या गाडीतून दोन मारेकरी घेऊन जे. जे. हॉस्पिटलमध्ये आले होते, हे विसरता येणार नाही. शरद पवार संरक्षण मंत्री होते तेव्हाची गोष्ट आहे. संरक्षण खात्याच्या विमानातून पवारांनी दाऊदच्या शार्प शूटर्सना उत्तर प्रदेशातून मुंबईला आणले होते. चुकीच्या व्यक्तीच्या हाती शहराची सूत्रे गेली तर गुन्हेगारीला मोकळे रान मिळायला वेळ लागत नाही. प्रत्येक मुसलमान अतिरेकी असतोच असे नाही. बहुसंख्य मुसलमान सुखासमाधानाने या देशात जगत आहेत. पण अतिरेकी म्हणून पकडले जातात ते मुसलमानच असतात, हेही कटू वास्तव आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या उबाठाला मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत बहुमत मिळाले तर त्याचे गांभीर्य लक्षात घ्या. महापौराला विशेष अधिकार नसतात. पण शहराचा पहिला नागरिक म्हणून त्याला आदराने वागवले जाते. त्याच्याकडे पाहण्याचा पोलिसांचा दृष्टिकोन बदलतो, हे नाकारता येणार नाही. त्यामुळे महापौरांच्या गाडीला कुठेही सहज जाऊ दिले जाते. १९९२-९३ दंगलीत शिवसेनेने मुंबई वाचवली. तेव्हा शिवसेना अखंड होती.



आज दहशतवाद्यांनी मुंबईत दंगल पेटवली तर उद्धव ठाकरे कोणाच्या बाजूने उभे राहतील? गेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरेंची भूमिका आठवा. कोणत्या व्होट बँकेसाठी उद्धव धडपडत होते? महापौरांसाठीच्या सुविधा दहशतवाद्यांच्या बुरख्यात उभ्या महापौराला उपलब्ध झाल्या तर काय परिस्थिती उद्भवेल, याची कल्पनाच करवत नाही. १० वर्षांपूर्वी आपल्याकडे सारखे बॉम्बस्फोट व्हायचे. तेव्हा मनमोहन सिंग पंतप्रधान होते, काँग्रेसचे सरकार असायचे. पण पाकिस्तानला धडा शिकवण्याची भाषा सिंग करू शकत नव्हते. २०१४ मध्ये देशाची सत्ता नरेंद्र मोदी यांच्या हाती आली तेव्हापासून चित्र पालटले. गेल्या निवडणुकीत भाजपाची बहुमताची उडी थोडी कमी पडली. दोन मित्रपक्षांना घेऊन मोदींचे सरकार सध्या उभे आहे. एकेकाळचे पाशवी बहुमत घटल्यानंतर आता काय काय घडतंय ते तुमच्या लक्षात आलं असेल. तब्बल १२ वर्षांनंतर दिल्लीत घुसून बॉम्बस्फोट करण्याचे धाडस दहशतवादी दाखवत आहेत. पाकिस्तानमधून निघून पहलगामपर्यंत अतिरेकी पोहोचले. धर्म विचारून त्यांनी एकेकाला गोळ्या घातल्या. आता लाल किल्ल्यावर कारने येऊन बॉम्बस्फोट घडवले. मोदी सरकार कधीही पडू शकते, असा प्रचार विरोधकांनी चालवला आहे. त्यामुळे घातपात्यांची हिंमत वाढली आहे. फरिदाबादमध्ये २९०० किलो स्फोटके जप्त होतात, याचा अर्थ लक्षात घ्या. कलकत्त्याचा महापौर तृणमूल काँग्रेसचा कुणी हकीम आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी त्याला रोखू शकत नाहीत. त्याला पकडण्याची पोलिसांची हिंमत नाही. उद्धव ठाकरे त्याच वळणावर आहेत. या साऱ्या पृष्ठभूमीवर आगामी महापालिका निवडणुकीकडे गंभीरपणे पाहिले पाहिजे. ठाकरे ब्रँड, मराठी अस्मिता या प्रचारात वाहून जाऊ नका. हा केवळ मुंबईचा विषय नाही. प्रत्येक मोठ्या शहरापुढे हे संकट आहे. अतिरेक्यांना गोंजारणारा महापौर पाहिजे की ठेचणारा महापौर पाहिजे, हे लोकांना या निवडणुकीत ठरवायचे आहे. निवडणुका जिंकण्यासाठी देशाला संकटात टाकू नका. निवडणुका जिंकून देश हरला तर तो धोका ओळखा. म्हणून हिंदू म्हणून प्रत्येकाला जगावे लागेल, सावध राहावे लागेल. तीन हजार किलो विस्फोटक कशाला म्हणतात? त्यांचा स्फोट घडवला असता तर प्रलय झाला असता. तो डाव उधळून लावला यासाठी आपल्या गुप्तचर पोलिसांचे कौतुक करायला पाहिजे.

एक लक्षात घ्या. ही लढाई केवळ आतंकवादाविरुद्ध नाही. ‘पॉलिटिकल इस्लाम’ची लढाई आहे. भारताला इस्लामी देश बनवणे हे दहशतवाद्यांचे टार्गेट आहे. ‘सब का साथ, सब का विकास’ ही घोषणा ऐकायला कर्णप्रिय आहे. काश्मीर खोऱ्यातील लोक ती समजून घेण्याच्या मानसिकतेत आहेत का? एकेकाळी आपल्या पोलिसांना दगड फेकून मारणारी कोवळी मुलं आज कुठे आहेत? ती दहशतवादी बनली आहेत, संधीची वाट पाहत आहेत. त्यांना ठेचले पाहिजे. ‘ऑपरेशन सिंदूर’ होऊन सहा महिने झाले. आपल्या सैन्याने सर्जिकल स्ट्राईक केला, एअर स्ट्राईक केला, ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवले. त्याने तात्पुरता फायदा मिळाला. स्थायी उत्तर शोधले पाहिजे. खोड्या केल्या तर आपली खैर नाही अशी भीती पाकिस्तानला वाटली पाहिजे. भारतात घुसू पाहणाऱ्या एखाद-दुसऱ्या दहशतवाद्याला आपले सैनिक टिपून मारतात. पण त्याने पाकिस्तानला फरक पडत नाही. त्यांच्याकडे मरायला खूप धर्मवेडे आहेत. विदेशातून शस्त्रं फुकट मिळतात. पैसेही मिळतात. त्यामुळे जोपर्यंत पाकिस्तानला भीती वाटत नाही तोपर्यंत परिस्थिती बदलणार नाही. आपल्या घरातल्या सापांचाही इलाज करावा लागेल. घुसखोरांना देशातूनच ताकद मिळते. आता तर त्यांनी रूपही बदलले आहे. अतिरेक्यांच्या स्वरूपात डॉक्टरांना उभे केले जात आहे. दहशतवादाचा हा ‘व्हाईट कॉलर’ चेहरा प्रथमच पुढे आला आहे. अतिरेक्यांना कोर्टात लढायला वकील कसे मिळतात? या ‘वकिलांचा’ सरकारला काही वेगळा बंदोबस्त करावा लागेल. कठोर हाताने आपण नक्षलवाद मोडून काढला. तसा हा दहशतवादही मोडायचा असेल तर आपल्या सरकारला कठोर कारवाई हाच एक इलाज आहे. आठ-दहा हल्ले करून पाकिस्तान वठणीवर येणार नाही. त्याचे कंबरडे मोडायचे असेल तर पाकिस्तानवर मोठा हल्ला हेच उत्तर आहे. मुंबईत हल्ला झाला तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी भूतानमध्ये होते. ‘दोषींना सोडणार नाही’ असे मोदींनी तिथून ठणकावले. मोदींनी म्हटले म्हणजे पाकिस्तानवर हल्ला होणार हे नक्की. ‘ऑपरेशन सिंदूर-२’ केव्हाही घडू शकते. हे युद्धच असेल. मोदी शत्रूला चुका करण्याची संधी देतात. पण त्याच त्याच चुका सारख्या झाल्या तर मोदी तिसरा डोळा उघडतात. देशाला या तिसऱ्या डोळ्याची प्रतीक्षा आहे. ▮▮

९८२२२६२७३५

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-४२

शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५

### एकता आज्ञांकिता हा मंत्र अमुचे अंतरी

एकता आज्ञांकिता हा मंत्र अमुचे अंतरी
श्वासनिश्वासातुनी निष्ठा असे नेत्यावरी ।।धृ.।।

अम्हीच स्वेच्छेने केले अधीन जीवन राष्ट्राच्या
दिली खंडणी कर्तृत्वाची एकमुखाने संघाच्या
या प्राणावर निज नेत्याची केवळ इच्छा अधिकारी ।।१।।

युक्तिबुद्धिने सहजपणे दूर करावी जनभ्रांती
संघटनेची स्थिती पहाया रोज जमावे एकांती
महत्कार्य यातून घडावे वाजु लागता रणभेरी ।।२।।

स्नेह जमवुनी ईर्ष्येने, अणूअणूतुनि राष्ट्राच्या
अखंड लावू दीपमालिका ज्वलंत अंत:करणांच्या
संकेताची वाट पाहतिल अनंत ज्योती घरोघरी ।।३।।

स्फुल्लिंगातुन वायूने अलोट उठती दावाग्नी
जलबिंदूंच्या प्रचंड धारा सृष्टि बुडविती लाटांनी
शक्तिसंचयातून पूर्तता सामर्थ्याची भयकारी ।।४।।

उपासना सामर्थ्याची चिरंतनपणे चालावी
इतिहासाच्या पानोपानी रोमहर्षता नटवावी
निधडी छाती दृश्य रंगविल भवितव्याचे सुखकारी ।।५।।

ध्येयपूर्तता करताना, चमकुनि विद्युत्वेगाने
अदृष्टाच्या पायतळी वा चुरडुनि जाता दैवाने
नसे तमा आम्हांस ऐकता हिंदुत्वाची ललकारी ।।६।।

### दहशतवादाचे मूळ स्थान पाकिस्तान

सोमवारी सायंकाळी लाल किल्ल्यासमोर हरयाणा पासिंगच्या आय-२० कारमध्ये झालेला तीव्र क्षमतेचा स्फोट हा दहशतवादी हल्लाच होता, यावर केंद्रीय तपास यंत्रणा आणि दिल्ली पोलिसांनी शिक्कामोर्तब केले आहे. केंद्रीय यंत्रणांच्या माहितीनुसार, गुजरात एटीएस, जम्मू-काश्मीर पोलिस, फरिदाबाद पोलिस आणि दिल्ली पोलिसांनी अटक केलेल्या पाकिस्तानी दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्यांच्या चौकशीतून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या दहशतवाद्यांचे मोबाईल कॉल डिटेल्स आणि सीसीटीव्ही फुटेजच्या तपासणीतून तपास यंत्रणा मोठ्या प्रमाणावर अंतिम निष्कर्षापर्यंत पोहोचल्या आहेत. जैश मॉड्यूलचा पर्दाफाश करताना आतापर्यंत पाच डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी ही व्हाईट कोट टेरर इको-सिस्टिम शोधून काढली. यातील सर्व जण शैक्षणिक आणि व्यावसायिक नेटवर्कच्या नावाखाली काम करणारे कट्टरपंथी व्यावसायिक आहेत. तपास जस जसा पुढे सरकत आहे तस तसे पुन्हा एकदा दहशतवादाचे मूळस्थान असलेल्या पाकिस्तानवरील संशय गडद होत आहे. वारंवार आक्रमणे करणाऱ्या दहशतवाद्यांचा प्राण असलेले पाकिस्तान नष्ट करण्याचेच ध्येय आता सरकारने ठेवले पाहिजे!

**अपर्णा जगताप** /नागपूर

## वाचक पत्रे

### आजचे बदलते करीअर विश्व....

आजचा काळ हा वेगवान बदलांचा काळ आहे. आता करीअर म्हणजे फक्त एक नोकरी नव्हे, तर सतत शिकत राहण्याची आणि स्वतःला अपडेट करत राहण्याची प्रक्रिया बनली आहे. अलिकडेपर्यंत डॉक्टर, इंजिनीअर, शिक्षक, वकील हीच मोठी करीअर पर्याय मानली जात. पण आता डेटा सायंटिस्ट, डिझायनर, यूट्यूबर, एआय इंजिनीअर डिजिटल मार्केटर, सायबर सुरक्षा विश्लेषक हे सगळे जग खऱ्या अर्थाने करीअर बनले आहे. कोडिंग, डाटा, एआय/एमएल , क्लाऊड, सायबर सिक्युरिटी यांसारख्या कौशल्यांना मोठी मागणी आहे. एकच करीअर आयुष्यभर पुरत नाही. लोक चार-पाच वर्षांनी क्षेत्र बदलतात किंवा कौशल्ये बदलतात. कौशल्य जिज्ञासा अपडेट राहणे यावर उभं आहे. कोणते क्षेत्र निवडले, यापेक्षा आपण ते क्षेत्र बदलाना कसे जुळवतो हे जास्त महत्त्वाचे. म्हणूनच आजच्या पिढीने आपल्या करीअरविषयी पारंपरिक चौकट सोडून लवचीकता आणि सतत शिकणे हे तीन शब्द मनात ठेवणे गरजेचे आहे. या बदलत्या करीअर विश्वात विविधता आणि लवचीकता ही वाढती महत्त्वाची घटक बनली आहेत. त्यामुळे उद्योगांना अधिक ताणतणावमुक्त, सर्जनशील आणि टिकाऊ बनण्यास मदत होते. बदलत्या करीअर विश्वात आपले स्थान निर्माण करायचे असल्यास, आपली तयारी, जिद्द आणि नवकल्पना आवश्यक आहे. या बदलांमध्येच नव्या आशा आणि संधी दडलेल्या आहेत. त्यामुळे सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे महत्त्वाचे आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

●● ●●

### वाढती सायबर फसवणूक

देशात वाढती सायबर फसवणूक पोलिसांपुढे आव्हान बनत चालली आहे. पोलिस यंत्रणा वाढत्या सायबर फसवणुकीपुढे तोकडी पडत असल्याचे दिसत आहे. वर्ष २०२४ मध्ये देशात सायबर गुन्हेगारी घटनामध्ये गतवर्षीच्या तुलनेत मोठी वाढ झाली तर या २०२५ वर्षात आतापर्यंत ती दुपटीने वाढली आहे. या वाढत्या गुन्हेगारीमुळे भारतातील नागरिक, व्यावसायिक संस्था, बँका आणि सरकारी यंत्रणा हादरून गेल्या आहेत. ज्येष्ठ नागरिक, पेन्शनधारक सायबर गुन्हेगारीचे बळीचे बकरे ठरत आहेत. केंद्र व राज्य सरकारने यावर आळा घालण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा अंमलात आणावी व पोलिस यंत्रणा अधिक सक्षम व सतर्क करावी व देशातील नागरिकांची होत असलेली फसवणूक थांबवावी. ▮▮

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## १२ वर्षाच्या विद्यार्थीनींवर लैंगिक अत्याचारप्रकरणी

# शिक्षकास मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर -**

१२ वर्षीय शाळकरी विद्यार्थीनीच्या लैंगिक अत्याचारप्रकरणी नराधम शिक्षकास जिल्हा व सत्र न्यायाधीश डी एन सुरवसे यांनी मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

धनाजी सोपान इंगळे (वय ४८, रा. पाटकूल, ता. मोहोळ) असे शिक्षा झालेल्या शिक्षकाचे नाव आहे. याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

१४ एप्रिल २०२३ रोजी यातील पिडीता ही शाळेत गेल्यावर तिला शिकविणारे शिक्षक आरोपी धनाजी इंगळे हे अगोदरच वर्गात हजर होते. त्यांनी पिडीतेला वर्गात थांबवून घेऊन इतर विद्यार्थ्यांना बाहेर थांबण्यास सांगून, वर्गामध्येच १२ वर्षाच्या पिडीतेवर शारीरीक लैंगिक अत्याचार केले. ही घटना शाळेशेजारी शेतात काम करण्या-या शेतक-याने पाहिली व त्याला सदरची बाब संशयास्पद वाटल्याने त्याने २-३ दिवस अगोदरपासून शाळेवर व संबंधित शिक्षकांवर लक्ष ठेवले होते. त्यानंतर १५ एप्रिल २०२३ रोजी त्याच्या भावाच्या मदतीने शेतक-याने त्या वर्गामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावला. १५ एप्रिल २०२३ ची सकाळची घटना त्या कॅमे-यामध्ये चित्रीत झाली. सदरची घटना त्या शेतक-याच्या भावाच्या मोबाईलमध्ये ध्वनीमुद्रित झाली होती. ते चित्रीकरण घेवून, त्या शाळेत जावून मुख्याध्यापकांसमक्ष सर्व शिक्षकांना व काही पालकांना बोलावून त्यांचे समक्ष शेतक-याने कोणाकडून काही गुन्हा घडला असेल तर सर्वांसमक्ष त्याने कबूल करावा असे विचारणा केली असता प्रथमतः कोणीही समोर येण्यास तयार नव्हते परंतु माझ्याकडे चित्रीकरण आहे असे सांगितले असता आरोपी इंगळे याने स्वतः हून समोर आला व माझ्याकडून चूक झाली मला माफ करा असे बोलला.

त्यानंतर ज्या पिडीतेला १४ एपिल्र २०२३ रोजी ज्या शेतक-याने पाहिले होते, तिच्या वडीलांना सदरबाबत सांगितले. तेव्हा त्यांनी पिडीतेकडे चौकशी केली असता, त्या बालिकेने घाबरुन ४-५ दिवसानंतर शिक्षकाचे दुष्कृत्याबाबत बाबत माहिती दिली व असा प्रकार त्या नराधमाने ३-४ पिडीतांसोबत ३-४ वेळा केल्याचे सांगितले. तद्नंतर पिडीतेच्या वडीलांनी मोहोळ पालिस स्टेशन येथे रितसर फिर्याद दाखल केली.

या गुन्ह्याचा तपास पोलिस



निरीक्षक विनोद घुगे, पोलिस हवालदार राजू पवार यांनी केला. परंतू, तपासादरम्यान आरोपीच्या दहशतीमुळे इतर पिडीता तसेच चित्रिकरणामध्ये दिसत असणारी पिडीता ही जबाबाचे वेळी आली नाही. परंतु तिने व तिच्या पालकांनी आम्हाला काहीही जबाब दयावयाचा नाही असे लिहून दिले. तपास पूर्ण झाल्यावर पोलिसांनी सोलापूर येथील विशेष न्यायालयात दोषारोप-पत्र दाखल झाले.

या खटल्याच्या सुनावणी दरम्यान फिर्यादी, पिडीता, शेतकरी, त्याचा भाऊ ज्याने चित्रीकरण केले होते तो, डॉक्टर यांची साक्ष महत्त्वाची ठरली. इतर पिडीता जरी न्यायालयासमोर अथवा जबाबासाठी आल्या नाही, तरीही १ पिडीता, तसेच चित्रीकरणामध्ये दिसणारी पिडीता, चित्रीकरणाबाबतचा आलेला तपासणी अहवाल यावरुन सदरच्या आरोपीनेच हा गुन्हा केलेला आहे. तसेच सरकारी पक्षाने दिलेले सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे आणि सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राहय धरुन न्यायाधीश सुरवसे यांनी आरोपीस भा. दं. वि. कलम ३५४ अ व ३५४ ब प्रमाणे एक वर्ष सक्त मजूरी तसेच बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ६ प्रमाणे आरोपीस त्याच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत जन्मठेप व ५० हजार रुपये दंड व सदरचा दंड पिडीतेस नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश दिला. याप्रकरणात सरकारच्यावतीने अॅड. शीतल डोके यांनी तर आरोपीच्यावतीने अॅड. धनंजय माने यांनी काम पाहिले.

## मलबार गोल्ड अँड डायमंड्सतर्फे आर्टिस्ट्री शो प्रदर्शन आजपासून

**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

मलबार गोल्ड अँड डायमंडस तर्फे कलात्मकता परंपरा आणि आधुनिक यांचा संगम दर्शविणाऱ्या आर्टिस्टी शो या दागिन्यांच्या विशेष प्रदर्शनाचे आयोजन १४ ते १७ नोव्हेंबर या कालावधीत व्हीआयपी रोड, रेल्वे लाइन्स येथील दालनात होईल, अशी माहिती उपव्यवस्थापक सागर जक्का यांनी दिली.

यात सोन्याचे, हिऱ्याचे पारंपरिक तसेच आधुनिक ज्वेलरी पाहायला मिळणार आहे. दक्षिण भारतीय टेंपल ज्वेलरीचे सुंदर आणि दमदार नक्षीकाम असलेले नमुने या प्रदर्शनात प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. फक्त नववधुसाठी त्यांचा लुक पाहण्यासाठी वेडींग लॉज तयार करण्यात आलेले आहे. त्यामध्ये ते ड्रेस, मेकअप, दागिने, परिधान करून फोटोशूट घेऊ शकतात. याचे उद्घाटन १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता होईल.

**CHANGE IN NAME**

I Hereby Declare that My Old Name **RAHMAT BI** has been changed to **REHMATBI ABDUL MATEEN MANSOOR**

Resi. - 339, Siddheshwar Nagar-2, Majrewadi, Solapur

**Kindly Note the same**

**मध्य रेल्वे**

**विद्युत विभाग**

**विद्युत काम**

**ई-निविदा सूचना**

मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता जनरल, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वे ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांकः SUR/L/T/2025/23 कामाचे नावः SUR विभागातील सुरक्षा व्यवस्था सुधारून एलटी प्रणाली मजबूत करण्यासाठी इलेक्ट्रिकल जनरल सेवा भाग. अंदाजे खर्चः- 2,25,76,469.26/-, बोली सुरक्षाः- रू. 2,62,900.00/- पूर्ण कालावधी:-12 महिने, ऑफरची वैधता:- 60 दिवस, वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:- 05/12/2025 दुपारी 15:00 वाजता. www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे बोली सुरक्षा खर्च कमी केला जाईल.

**- वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)**

SUN 84

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**

**सोलापूर विभाग**

**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहे. निविदा सूचना क्रमांक 30-2025-Sr/DEN, कामाचे नाव 01. ADEN/W/SUR-सोलापूर यार्ड, सोलापूर स्टेशनसमोर, सी अँड डब्ल्यू कोचिंग कॉम्प्लेक्स (पिटलाइन) जुने चांगले शेड क्षेत्र, जुने पिटलाइन, डीआरएम ऑफिस कॅम्पस आणि विविध वसाहती आणि सोलापूर येथे सेवा इमारत यांत्रिक स्वच्छता यंत्रांद्वारे साफ करणे. 02. ADEN-KLBG उपविभाग अंतर्गत केयूआय, वाडी विभागात मॅनहोल आणि भूमिगत ड्रेनेजची यांत्रिक स्वच्छता, विद्यमान मॅनहोलची दुरुस्ती आणि वसाहती आणि सेवा इमारतीमध्ये ड्रेनेज कव्हरची तरतूद. . कामाची अंदाजे किंमत रु. 1,92,00,201.37/-, बकाया रक्कम - रु. 2,46,000.00/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी 24 महिने, देखभाल कालावधी - 06 महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ 27/11/2025 रोजी दुपारी 3:00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ - 27/11/2025 रोजी दुपारी 3:30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइटः www.ireps.gov.in.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर**

SUN 86

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**

**सोलापूर विभाग**

**ई-निविदा सूचना**

**निविदा सूचना क्रमांक GEM/2025/B/6862206**

**दिनांक - 10.11.2025**

डीआरएम (एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे.:- कामाचे नाव आणि त्याचे परिसरः सोलापूर विभागातील सोलापूर आणि कलबुर्गी कोचिंग डेपोच्या राखीव वर्ग कोच प्राथमिक देखभाल केलेल्या गाड्यांमध्ये जीईएम द्वारे मनुष्यबळ आधारावर २८ महिन्यांच्या कालावधीसाठी ऑन बोर्ड हाऊसकीपिंग सेवा प्रदान करण्याचे कंत्राट काम. निविदा प्रणाली - दोन पॅकेट प्रणाली., कामाची अंदाजे किंमत - रु.9,08,47,596.19/-, निविदा फॉर्मची किंमत - शून्य, निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता - डीआरएम(एम) चे कार्यालय, सेंट्रल रेल्वे, सोलापूर, जमा करावयाची बयाणा रक्कम - रु. 6,04,238/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी - काम सुरू झाल्यापासून दोन वर्षे. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ 02.12.2025 सकाळी 9.00 वाजता, निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ 02.12.2025 सकाळी 9.30 वाजता. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक ठिकाण जिथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल. www.gem.gov.in

SUN 85 **Sr. DME/Solapur**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूरातील तमाम लोकांना, विशेषतः सोरेगांव हद्दीतील आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व रहिवाशांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन डि व सब डि. सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे सोरेगांव हद्दीतील गट नं.२०/१ यासी क्षेत्र ६.७८ हे. आर चौ.मी. खुलीजागा. सदर जागेची चतुःसिमा पुढील प्रमाणे :

पूर्वेस : गट नं.२०/२ व २०/३, दक्षिणेस गट नं.२०/१ पैकी गीता गोविंद बाकळे यांची जागा व इतर यांची जमीन, पश्चिमेस : गट नं.२१ व २९, उत्तरेस- गट नं.१९

सदर मिळकत ही **१) बुद्धव्वा यल्लप्पा कर्णीक २) महानंद बलभिम खडाखडे ३) यशवंत महादेव कोळी ४) अंबुबाई राठू रामपुरे ५) निर्मला शरणप्पा कोळी ६) सुनिता चंद्रकांत माने** यांच्या मालकी, कब्जे, वहिवाटीची असून सदर मिळकत ही आमचे अशिल **१) श्री. दत्तात्रय सिद्राम जाधव २) श्री. रविकांत सिद्राम कांबळे** यांना कायम खूशखरेदी देण्याचे ठरवून दिनांक १३/११/२०२५ रोजी तोंडी कायमखूष खरेदी देण्याचे ठरले आहे. इसारपोटी काही रक्कम स्विकारली आहे.

सबब वर नमूद मिळकती विषयी कोणाचा वाद, वहिवाट, करार, मार्गेज, इसारा, कर्ज व इतर कोणत्याही प्रकारचे हित संबंध असतील तर खालील नमूद वकीलाकडे योग्य त्या कागदपत्रानिशी/पुराव्यानिशी ७ दिवसाच्या आत समक्ष भेटून लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर वर नमूद मिळकती निर्वेध व निजोखमी आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सबंधितानी नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली दिनांक १४/११/२०२५

**सही/-**
**अशिलांचे नांव**
**१) श्री. दत्तात्रय सिद्राम जाधव**
**मो.नं.९५९५९०९००७**

**सही/-**
**२) श्री. रविकांत सिद्राम कांबळे**
**मो.नं.९६२३४१२२४८**

**सही/-**
**अॅड. सहदेव रघुनाथ भडकुंबे**
बी. कॉम, एलएलबी, अॅडव्होकेट
मो.नं.९०२८९६६३१३
पत्ताः ऑफिस नं. सोलापूर डिस्ट्रीक कोर्टाजवळ, फाईव्ह स्टार हॉटेल शेजारी, सोलापूर निवासी पत्ता: ५६, दयानंद कॉलेज जवळ, गुजरवस्ती, रविवार पेठ, सोलापूर-२

## कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड,

**नोंदणीकृत कार्यालय, कटारे कॉम्पलेक्स, १४/३०, रविवार पेठ, बी.विंग तळमजला गांधीनगर अक्कलकोट रोड सोलापूर - ४१३००६**

**CINL17119PN1980PLC022962 ई-मेल katarespinningmills@gmail.com**

**३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही/सहामाही अखेरकरिता अलेखापरिक्षीत स्थायी वितीय निष्कर्षाचा अहवाल (रु. लाखांत)**

| अ. क्र. | विवरण | तिमाही समाप्त / 30 सप्टेंबर 2025 (अलेखापरिक्षित) | वर्ष ते तारीख आकडे/मागील वर्ष समाप्त 30 सप्टेंबर 2024 (अलेखापरिक्षत) | मागील वर्षात संबधित 31 मार्च 2025 (लेखापरिक्षत) |
|---|---|---|---|---|
| 1 | एकूण उत्पन्न | 15.37 | 511.98 | 84.18 |
| 2 | कालावधीकरिता निव्वळ नफा(तोटा) (कर,अतिरिक्त व / वा अविविषेश बाबीपूर्व) | (32.33) | (201.55) | (47.23) |
| 3 | निव्वळ नफा / (तोटा) कर अतिरिक्त व / वा अविविषेश बाबीपश्चात | (32.33) | (201.05) | (47.23) |
| 4 | कर पूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा(तोटा) (कर अतिरिक्त व / वा अविविषेश बाबीपश्चात) | (32.33) | (173.04) | (47.23) |
| 5 | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/तोटा समाविष्ट (कर पश्चात) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) | (32.33) | (173.04) | (47.23) |
| 6 | इक्विटी भाग भांडवल (दर्शनी मुल्य रु.१० प्रति शेअर) | 285.00 | 285.00 | 285.00 |
| 7 | राखीव (मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे पुनर्मुल्यांकन राखीव वगळून ) | -- | -- | |
| 8 | उत्पन्न प्रति शेअर<br>१. मुळ<br>२. सौम्य | (1.13)<br>(1.13) | (6.07)<br>(6.07) | (1.66)<br>(1.66) |

**टीप.**

अ) उपरोक्त हे SEBI च्या नियमन ३३ (दायित्व आणि प्रकटीकरण आवश्यकतांची सूची) विनियम, २०१५ च्या अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजमध्ये ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीच्या आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. २०१५ समाप्त झालेल्या तिमाहीचे निकाल ३० सप्टेंबर २०२५ www.bseindia.com च्या वेबसाइटवर आणि कंपनीच्या www.katarespinningmillslimited.com वर उपलब्ध आहेत.

ब) वरील आर्थिक परिणामांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाने १३ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.

**ठिकाण : सोलापूर**
**तारीख : 13/11/2025**

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड, करिता**
**सही /- किशोर ति. कटारे**
**डिन क्रमांक - 00645013**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

फोन ०२१७-२८२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे**

### फेरजाहीर लिलाव व विक्री नोटीस

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक १८/०५/२०२२ रोजी मागणी नोटीस कर्जदार लक्ष्मीरमण असोसिएटस प्रोप्रा. बालकिसन विष्णुदास मंत्री रा. ६. महावीर मार्केट, फलटण गल्ली, सोलापूर व जामीनदार १. लक्ष्मीकांत विष्णुदास मंत्री रा.६. महावीर मार्केट, फलटण गल्ली, सोलापूर २. प्रकाश विष्णुदास मंत्री रा. ६, महावीर मार्केट, फलटण गल्ली, सोलापूर यांना पाठवून रक्कम रुपये २,३९,८३,९५९/- या वर दिनांक ०१/०५/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कम ची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

| अ. नं. | कर्जदार नांव व पत्ता | डि.सब डि. सोलापुर तालुका दक्षिण सोलापूर येथील मौजे मुस्ती येथील बालकिसन विष्णुदास मंत्री यांच्या मालकी वहिवाटीच्या खालील मिळकती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **मिळकतीचे वर्णन** | **पूर्वेस** | **दक्षिणेस** | **पश्चिमेस** | **उत्तरेस** | **राखीव किंमत** |
| १ | कर्जदार - लक्ष्मीरमण असोसिएटस प्रोप्रा. बालकिसन विष्णुदास मंत्री | गट नं.२२५/१, क्षेत्र ०.३४.०० हे.आर.चौ. मी., आकार ०.१३ | **उपलब्ध नाही.** | | | | रु २,५५,०००/- |
| | | २२५/४, क्षेत्र ०.८२.०० हे.आर. चौ.मी., आकार ०.३५ | गट नं. २२७ ची शेतजमीन | गट नं. २२३ पैकी ची शेतजमीन | गट नं.२२५ पैकी ची शेतजमीन | गट नं.२२६ पैकी ची शेतजमीन | रु. ६,१५,०००/- |
| | | २२५/५, क्षेत्र ०.८२.०० हे.आर. चौ.मी., आकार ०.३५ | गट नं. २२५/६ ची शेतजमीन | गट नं. २२३ पैकी ची शेतजमीन | गट नं.२२५/४ पैकी ची शेतजमीन | गट नं.२२५/२ पैकी ची शेतजमीन | रु. ६,१५,०००/- |
| | | २२५/६, क्षेत्र ०.८२.०० हे.आर. चौ.मी., आकार ०.३५ | गट नं. २२७ ची शेतजमीन | गट नं. २२३ पैकी ची शेतजमीन | गट नं.२२५/५ पैकी ची शेतजमीन | गट नं.२२५/२ पैकी ची शेतजमीन | रु. ६,१५,०००/- |
| | लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर<br>६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२<br>**बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक-१६/१२/२०२५**<br>वेळ - सकाळी ११ ते दुपारी ५ वाजेपर्यंत<br>निविदा उघडण्याची तारीख व वेळ दि.१७/१२/२०२५ सायं. ५:३० वा. | | | | | |
| | ३१.०३.२०२५ अखेर येणेबाकी | रु.३,७१,७४,५६६/- व त्यापुढे होणारे व्याज, दंड व्याज, सरचार्ज व इतर खर्च | | | | | |

टिप-

१. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. बयाणा रक्कम दि.१५/१२/२०२५ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट/आर.टी.जी.एस. अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी.
२. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक : १३/११/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर**

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**

**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय आक्कलकोट यांच्या न्यायालयात ४१३२१६**

**संकलन अभिलेख कक्ष**

दुरध्वनी नं.-९४२१९६९५१६ Email-tahakkalkot@gmail.com

जा.क्र. २०२५/अभिलेख/कावि/६४/२०२५ दि. १२/११/२०२५

### -: जाहिर प्रसिध्दीकरण:-

प्रति,

**श्रीम. सुगलाबाई बसप्पा हरवाळकर**

रा. अक्कलकोट ता. अक्कलकोट -- अर्जदार

**विरुध्द**

जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय

नगर परिषद, अक्कलकोट ता अक्कलकोट -- सामनेवाला

ज्याअर्थी, यातील श्रीम. सुगलाबाई बसप्पा हरवाळकर यांनी त्यांची आई कै. गंगाबाई बसप्पा हरवाळकर यांचा मृत्यू दि. १८/०८/२०१२ रोजी मौजे अक्कलकोट ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतू त्यांच्या मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे सुगलाबाई बसप्पा हरवाळकर यांनी त्याच्या आईच्या मृत्यूची नोंद करुन घेवून मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म मुत्यू नोंदणी (दुरुस्ती अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०८/०१/२०२५ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या आईच्या यांचे नावे गंगाबाई बसप्पा हरवाळकर यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल,

हे आज दि. १२/११/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**(विनायक मगर)**
तहसीलदार अक्कलकोट

## SHRI MAHAVIR URBAN CO. OP BANK LTD., SOLAPUR

Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002
PH: (0217) 2622933/44

### DEMAND NOTICE UNDER SECTION 13(2) OF SARFAESI ACT 2002

Whereas you the below mentioned Borrower, Guarantor's and Mortgagors have availed loan from Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur, by mortgaging your immovable properties. Consequent to default committed by you all, your loan account has been classified as Non Performing Asset, whereas Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur being a secured creditor under the Act, and in exercise of the powers conferred under section 13(2) of the said Act read with rule 2 of Security Interest (Enforcement) Rules 2002, issued Demand Notice calling upon the Borrowers/Guarantor's/Mortgagors as mentioned in column No.2 to repay the amount mentioned in the notices with future interest thereon within 60 days from the date of the notice, but the notices issued to the Guarantor No. 1 listed under Sr. No. 1 in Column No. 2 as well as the notices issued to the Guarantor No. 1 listed under Sr. No. 2 in Column No. 2, have been returned unserved due to certain reasons. Accordingly, this public notice is being issued as follows:

| Sr. No | Name of Borrower/ Guarantor/ Mortgagor | Loan Account No. & Loan Amount | Details of the Security to be enforced | Date of NPA & Demand Notice date | Amount Due in Rs. as on 30/09/2025 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Borrower:** 1) Aman steel and Pastic Center Prop: Mahamad Kasimsab Sarwad R/o: 53, Mehatab Nager, Shelgi, solapur 413006. **Guarantor:** **1)** Isamil Roshan Shaikh **R/o:** 101, Adarsh Nagar, Mitra Nagar, Near Hande Pitachi Girani , Shelgi, Solapur 413006. **2)** Mainoddin Kasim Patel **R/o** : Plot No. 17, House No. 455, Shastri Nagar, Near Volleyball Ground, North Sadar Bazar, Solapur 413003 | Loan Account No. 0050032170000027 Loan Amount (Rs.) 21,00,000/- (Rs. Twenty One Lakh Only) | All that pieces of land situated Within District and Sub district Solapur, Taluka North Solapur, within limits of exended area of solapur municipal Corporation at mouje Shelagi, area known as Basaveshwar Nagar, bearing Gat No. 19/1/B, out of it Plot No. 48 having City Survey No. 513485, boundary East West 40 feet & South-North 25 feet and its Total Admeasuting Area 92.93 Sq. Mt. or 1000 Sq. Ft. the said property is bounded by as follows : East plot No.49 West : Road North : plot No. 46 South: Plot No. 50 | **Date of NPA** : 30/06/2025 **Demand Notice Date :** 29/10/2025 | Rs. **14,06,473/-** ( Rs. Fourteen Lakh Six Thousand Four Hundred and Seventy Three Only) Plus future interest and other expenses thereon |
| 2 | **Borrower**: Aman Steel and Plastic Center Prop: Mahamad Kasimsab Sarwad **R/o** : 53, Mehatab Nagar, Shelgi, solapur 413006 **Guarantor:** **1) Isamil Roshan Shaikh** R/o: 101, Adarsh Nagar, Mitra Nagar, Near Hande Pitachi Girani , Shelgi, Solapur 413006. **2) Mainoddin Kasim Patel** **R/o** : Plot No. 17, House No. 455, Shastri Nagar, Near Volleyball Ground, North Sadar Bazar, Solapur 413003 **3) Amiroddin Mahamad Sarwad** **R/o:** 46, Basaweshwar Nagar, Shelgi, Solapur 413006 | **Loan Account No.** 0050032170000031 **Loan Amount (Rs)** 11,00,000/- (Rs. Eleven Lakh Only) | All that pieces of land situated within District and Sub district Solapur, Taluka North Solapur, within limits of extended area of solapur Muncipal Corporation, at mouje shelgi, area known as Basaveshwar Nagar, bearing Gat No. 19/1/B, out of it plot No. 48, having city survey No. 513485, boundary East-West 40 feet & South-North 25 feet and its Total admeasuring area 92.93 Sq. Mt. or 1000 sq. Ft. the said property is bounded by as follows **East**: plot No. 49 **West:** Road **North:** Plot No. 46 **South:** plot No.50 | **Date of NPA :** 30/06/2025 **Demand Notice Date :** 29/10/2025 | **Rs.7,90.863/-** (Rs. Seven Lakh Ninety Thousand Eight Hundred and Sixty Thee Only) Plus future interest and other expenses thereon |

Notice is therefore given to the Borrower/Guarantor & Mortgagor as mentioned in Column No.2, calling upon them to make payment of the aggregate amount as shown in column No.6, against the respective Borrower within 60 days of Publication of this notice as the said amount is found payable in relation to the respective loan account as on the date shown in Column No.6. It is made clear that if the aggregate amount together with future interest and other amounts which may become payable till the date of payment is not paid, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd. Solapur shall be constrained to take appropriate action for enforcement of security interest upon properties as described in Column No.4. Please note that this publication is made without prejudice to such rights and remedies as are available to Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur against the Borrower/ Guarantor's/Mortgagors of the said financials under the law, you are further requested to note that as per section 13(13) of the said act, you are restrained/prohibited from disposing of or dealing with the above security or transferring by way of sale, lease or otherwise of the secured asset without prior consent of Secured Creditor.

**Date: 13/11/2025**
**Place: Solapur**

SEAL

**Sd/-**
**Authorised Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महत्त्वाचे

## जॅनिक सिनर उपांत्य फेरीत

**तुरिन** : गतविजेता जॅनिक सिनरने आपल्या इटलीच्या चाहत्यांसमोर ॲलेक्झांडर इव्हेरेव्हवर ६-४, ६-३ असा विजय मिळवत एटीपी फायनल्समध्ये उपांत्य फेरीत प्रवेश केला. सिनरने इनडोअर हार्ड कोर्टवर २८ सामन्यांपर्यंत विजयी मालिका वाढवली. दोन वर्षांपूर्वी या स्पर्धेच्या अंतिम फेरीत नोवाक जोकोविचकडून झालेल्या पराभवानंतर सिनरचा इव्हेरेव्हवर हा सलग पाचवा विजय होता, यात या वर्षीच्या ऑस्ट्रेलियन ओपन फायनल आणि व्हिएन्ना व पॅरिसमधील अलिकडच्या लढतींचा समावेश आहे. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या सिनरला अजूनही अव्वल क्रमांकावर पोहोचण्याची संधी आहे, पण त्याला स्पर्धा जिंकावी लागेल आणि कार्लोस अल्काराज आणखी एक सामना जिंकू नये अशी आशा आहे. प्रत्येक गटातील दोन अव्वल खेळाडू उपांत्य फेरीत पोहोचतात.

## अनुराधा अभियांत्रिकीच्या गौरी अंबुसकरचा देशात डंका



गौरी अंबुसकरचा सत्कार करताना व प्रमाणपत्र दर्शविताना संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राहुल बोंद्रे.सोबत उपस्थित मान्यवर

**चिखली** : अनुराधा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या गौरी रवी अंबुसकर हिने १३ व्या राष्ट्रीय गतका मार्शल आर्ट (मुले व मुली) अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावले असून, आता तिची निवड आंतरराष्ट्रीय गतका चॅम्पियनशिप २०२५, मलेशिया साठी भारत संघात झाली आहे. तिच्या निवडीने महाविद्यालयाच्या व जिल्ह्याच्या शिरपेचात मनाचा तुरा रोवला असून, देशभरातून तिचे कौतुक होत आहे. गौरी अंबुसकर ही इलेक्ट्रॉनिक्स ॲंड टेलिकम्युनिकेशन शाखेची चौथ्या वर्षाची विद्यार्थिनी असून तिने २२ वर्षा आतील गर्ल्स फझाई-सोटी या टीम इव्हेंटमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. ही राष्ट्रीय स्पर्धा १० ते १२ ऑक्टोबर दरम्यान गुरुनानक इंग्लिश सीनियर सेकंडरी स्कूल, भिलाई, जिल्हा दुर्ग (छत्तीसगड) येथे पार पडली. देशभरातील विविध राज्यांमधील खेळाडूंनी यात सहभाग घेतला होता. गौरीच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राहुल बोंद्रे, डॉ व्ही. आर. यादव, ॲड.वृषाली बोंद्रे, सिद्धेश्वर वानेरे, आत्माराम देशमाने, वर्धमान डहाळे, अथरोद्दिन , डॉ.एम.ए. अली, प्राचार्य डॉ.अरुण नन्हई यांनी तिचे कौतुक केले आहे.

**आंतरराष्ट्रीय स्पर्धेत गौरी तिरंगा फडकवेल : राहुल बोंद्रे**

गौरी अंबुसकर हिचे हे यश संपूर्ण अनुराधा परिवारासाठी अभिमानास्पद आहे. ती केवळ आपल्या कौशल्यानेच नाही, तर जिद्द, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी इथपर्यंत पोहोचली आहे.ती मलेशियातील आंतरराष्ट्रीय स्पर्धेतही तिरंगा फडकवेल असा विश्वास असल्याचे राहुल बोंद्रे म्हणाले.

## भारताच्या ज्योतीने जिंकले सुवर्णपदक

**ढाका** : अनुभवी तिरंदाज ज्योती सुरेखा वेन्नमच्या नेतृत्वाखालील भारतीय कम्पाऊंड तिरंदाजांनी गुरुवारी येथे झालेल्या आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत तीन सुवर्ण व एक रौप्यपदक जिंकून शानदार कामगिरी केली. ज्योतीने महिला वैयक्तिक आणि सांघिक जेतेपदे मिळवून आजचा दिवस साजरा केला. तिने प्रथम दीपशिखा आणि प्रितिका प्रदीप यांच्यासोबत मिळून कम्पाऊंड महिला संघाच्या अंतिम फेरीत कोरियावर २३६-२३४ असा रोमांचक विजय नोंदवला. त्यानंतर आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेत्याने अखिल भारतीय अंतिम सामन्यात १७ वर्षीय प्रितिकावर १४७-१४५ असा संघर्षपूर्ण विजय मिळवत कम्पाऊंड महिला वैयक्तिक किताब जिंकला. कम्पाऊंड मिश्र संघाच्या अंतिम फेरीत, अभिषेक वर्मा व दीपशिखाने उत्कृष्ट कामगिरी करत बांगलादेशचा १५३-१५१ असा पराभव केला आणि भारतासाठी आणखी एक सुवर्णपदक मिळवले.

## ऑस्ट्रेलियाचा शेन वॉटसन केकेआर सपोर्ट स्टाफमध्ये

**कोलकाता** : कोलकाता नाईट रायडर्सने गुरुवारी आगामी आयपीएल २०२६ साठी माजी ऑस्ट्रेलियन अष्टपैलू शेन वॉटसनची सहायक प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली. वॉटसनने ५९ कसोटी, १९० एकदिवसीय आणि ५८ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले, १०,००० हून अधिक आंतरराष्ट्रीय धावा केल्या आणि सर्व फॉरमॅटमध्ये २८० हून अधिक बळी टिपल्या. कोलकात्याला आणखी एक जेतेपद मिळवून देण्यासाठी मी प्रशिक्षण चमू व खेळाडूंसोबत जवळून काम करण्यास उत्सुक आहे, असे वॉटसन म्हणाला. वॉटसन ऑस्ट्रेलियाच्या २००७ आणि २०१५ च्या आयसीसी विश्वचषक विजेत्या संघांचा अविभाज्य भाग होता आणि जगभरातील अनेक मालिका विजयांमध्ये त्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

# भारत फिरकीच्या धोक्यापासून सावध

◆ **कोलकाता, १३ नोव्हेंबर**

ईडन गार्डन्सवर शुक्रवारपासून भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यानच्या दोन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना खेळला जाणार आहे. तेव्हा भारतीय फलंदाजांना दक्षिण आफ्रिकेच्या फिरकी गोलंदाजांच्या कसोटीला सामोरे जावे लागणार आहे. फिरकी गोलंदाजांच्या धोक्यापासून बचावासाठी भारतीय संघाला सावधगिरीने खेळ करावा लागणार आहे.



गौतम गंभीर व शुभमन गिल

गत वर्षी न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या मैदानावर झालेल्या पराभवाच्या भूतांनी भारताला पछाडले असेल, तेव्हा न्यूझीलंडचे फिरकी गोलंदाज अजाज पटेल, मिशेल सॅण्टनर व ग्लेन फिलिप्सने तीन कसोटी सामन्यात ३६ बळी घेऊन अभूतपूर्व ०-३ असा व्हाईटवॉश केला होता.

विश्वविजेता दक्षिण आफ्रिका संघ हा ऐतिहासिकदृष्ट्या आक्रमक वेगवान गोलंदाजांसाठी ओळखला जातो, परंतु सध्या त्यांच्याकडे जागतिक क्रिकेटमधील सर्वात प्रभावी फिरकी गोलंदाजांपैकी एक आहे.

पाकिस्तानविरुद्धच्या १-१ अशा बरोबरीच्या मालिकेनंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ भारतात दाखल झाला आहे, त्यांनी ही कामगिरी प्रेरणादायी कर्णधार टेम्बा बावुमाच्या अनुपस्थितीत केली होती. दक्षिण आफ्रिकेच्या केशव महाराज, सायमन हार्मर आणि सेनुरन मुथुसामी या फिरकी त्रिकुटाने मालिकेत पडलेल्या ३९ बळींपैकी ३५ बळी घेतले. त्यांनी पाकिस्तानच्या नोमान अली, साजिद खान आणि सलमान आघा या संथ गतीच्या गोलंदाजी विभागावर मात केली. पाकिस्तानच्या या गोलंदाजांनी एकत्रितपणे २१ बळी घेतले.

प्रतिस्पर्धी दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजी संघाला 'उपखंड-शैलीचा हल्ला' असे भारताचे सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोइशेटे यांनी म्हटले आहे. दक्षिण आफ्रिकेकडे चार फिरकीपटू आहेत व बहुधा ते तीन खेळवतील. हे उपखंडातील संघाविरुद्ध खेळण्यासारखे आहे. आम्ही सुरुवातीलाच यावर लक्ष केंद्रित केले आहे, असेही ते म्हणाले.

**सायमन हार्मर धोकादायक**

१००० प्रथम श्रेणी बळी टिपणारा ३६ वर्षीय सायमन हार्मर भारतीय परिस्थितीशी अनोळखी नाही. २०१५ च्या हाशिम अमलाच्या नेतृत्वाखालील दौऱ्यात तो २६ वर्षांचा होता. मोहाली आणि नागपूर येथे झालेल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये त्याने चेतेश्वर पुजारा, रोहित शर्मा व ऋद्धिमान साहा सारख्या मौल्यवान गोलंदाजांना बाद केले होते.

एक दशकानंतरही, हार्मर तितकाच चतुर आहे. गत महिन्यात रावळपिंडी येथे झालेल्या आठ बळींच्या सामन्यानंतर तो कोलकात्यात पोहोचला. त्याचे नियंत्रण, वेग आणि वेगवान बदल यामुळे तो महाराजांच्या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजांसाठी एक आदर्श खेळाडू ठरता. तो आधुनिक खेळातील सर्वात अचूक आणि आक्रमक फिरकी गोलंदाजांपैकी एक आहे.

ईडन गार्डन्सची खेळपट्टी 'रँक टर्नर' असणार नाही, असे आश्वासन बंगाल क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष सौरव गांगुली यांनी दिले आहे. भारतीय संघाचे फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक व कर्णधार शुभमन गिलने अनेक वेळा या खेळपट्टीची तपासणी केली आहे. जसप्रीत बुमराह मात्र खूश असेल, कारण तो उशिरा रिव्हर्स स्विंग देणाऱ्या खेळपट्टीवर भारताचा हुकमी खेळाडू ठरू शकतो. भारत दोन वेगवान गोलंदाजांसह मैदानात उतरण्याचा प्रयत्न करेल. स्थानिक खेळाडू आकाश दीपला परिस्थितीची माहिती असल्याने त्याला फायदा होईल.

भारतासाठी, फिरकी गोलंदाजीविरुद्ध वापर व संयमावर लक्ष केंद्रित केले जाईल. ऋषभ पंत पुन्हा तंदुरुस्त झाल्यामुळे आणि फॉर्ममध्ये असलेला ध्रुव जुरेल एक विशेषज्ञ फलंदाज म्हणून खेळण्यासाठी सज्ज झाल्यामुळे, मधली फळी अधिक स्थिर दिसते. न्यूझीलंड मालिकेत १६ बळींसह भारताच्या फिरकी गोलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानावर असलेला वॉशिंग्टन सुंदर धिक प्रभावी कामगिरी करण्यास उत्सुक आहे.

ही केवळ दोन सामन्यांची मालिका असल्यामुळे चुकांची शक्यता कमी आहे. गुवाहाटीतील शेवटच्या कसोटीत अपरिचित परिस्थिती त्यांची भूमिका बजावत असताना, लवकर मागे पडणे घातक ठरू शकते. गुवाहाटी हे कसोटी स्थळ म्हणून पदार्पण करणार आहे. भारतासाठी, मोठी फलंदाजी करणे आणि प्रतिस्पर्ध्यावर दबाव आणणे हे गत वर्षीच्या पराभवाचे भूत काढून टाकण्याची गुरुकिल्ली असेल.

**भारत- दक्षिण आफ्रिका पहिला कसोटी सामना**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : सकाळी ९.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

**प्रतिस्पर्धी संघ -**

भारत : शुभमन गिल (कर्णधार), के. एल. राहुल, यशस्वी जयस्वाल, साई सुदर्शन, ऋषभ पंत (यष्टिरक्षक व उपकर्णधार), ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, आकाश दीप, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि देवदत्त पडिक्कल.

दक्षिण आफ्रिका : टेम्बा बावुमा (कर्णधार), एडन मार्कराम, रायन रिकेल्टन, ट्रिस्टन स्टब्स, काईल वेरेन, डेव्हाल्ड ब्रेविस, झुबेर हामझा, टोनी डी झोर्झी, कॉर्बिन बॉश, विआन मुल्डर, मार्को जॅनसन, केशव महाराज, सेनुरान मुथुसामी, कॅगिसो रबाडा, सायमन हार्मर. (वृत्तसंस्था)

# लक्ष्य सेन उपांत्यपूर्व फेरीत

## जपान मास्टर्स बॅडमिंटन ● प्रणॉय बाहेर



◆ **कुमामोटो, १३ नोव्हेंबर**

भारताचा स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने गुरुवारी येथे सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेहवर सरळ गेममध्ये विजय मिळवत जपानच्या कुमामोटो मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

३३ वर्षीय एच. एस. प्रणॉयला ४६ मिनिटांच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात डेन्मार्कच्या रासमुस गेमकेकडून १८-२१, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला.

२०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेत व येथे सातव्या मानांकित लक्ष्य सेनने जागतिक क्रमवारीत २० व्या स्थानावर असलेल्या तेहवर ३९ मिनिटांच्या आणखी एका सामन्यात २१-१३, २१-११ असा विजय मिळवला. जागतिक क्रमवारीत १५ व्या स्थानावर असलेला लक्ष्य सेन उपांत्यपूर्व फेरीत सिंगापूरच्या माजी विश्वविजेत्या लोह कीन यूशी झुंजेल.

लक्ष्यने सामन्यात सुरुवातीला ८-५ अशी आघाडी घेतली. ब्रेकपर्यंत भारतीय खेळाडूने पुढे जाण्यापूर्वी तेहने काही काळासाठी १०-९ अशी आघाडी घेतली. लक्ष्यने सलग सात गुणांसह पुढे जाईपर्यंत दोघांनी १४-१३ पर्यंत जोरदार झुंज दिली.

सामन्याच्या शेवटी झालेल्या बदलानंतर भारतीय खेळाडूने अधिक प्रभावी खेळ केला. त्याने ११-३ अशी झेप घेत प्रतिस्पर्ध्याच्या आशा धुळीस मिळवल्या. लक्ष्यने स्थिर राहून सामना आरामात जिंकला. दिवसाच्या शेवटी एच.एस. प्रणॉयचा सामना डेन्मार्कच्या रासमुस गेमकेशी होईल. (वृत्तसंस्था)

# संगमेश्वर कॉलेजच्या तनिष्का पवारला राज्य तायक्वांदो स्पर्धेत रौप्य



**विभागीय कराटे स्पर्धेत यादवला सुवर्ण, वालीकरला कांस्य**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

शालेय राज्य तायक्वांदो स्पर्धेत तनिष्का पवार हिने रौप्य पटकाविले. पुणे विभागीय कराटे स्पर्धेमध्ये आर्या यादव हिने सुवर्ण व श्रवण वालीकर याने कांस्य पटकावले. यातून आर्याची यादव शालेय राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ.आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते , प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.



# शालेय टेनिक्काईट स्पर्धेत सिद्धेश्वर कन्या प्रशाला उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर झालेल्या शालेय शहर टेनिक्काईट स्पर्धेत सिद्धेश्वर कन्या प्रशालेने १४ वर्षाखालील गटात उपविजेतेपद संपादिले. १७ वर्षाखालील गटात त्यांनी पाचवे स्थान मिळविले.

त्यांना क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर, प्रचिता जोगदंडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, भीमाशंकरजी पटणे, गुरुराज माळगे, डॉ. राजशेखर येळीकर, ॲड. रेवणसिद्ध पाटील, चनबसप्पा नाडगौडा, प्रभुराज मैंदर्गीकर, विलास कारभारी, पशुपतिनाथ माशाळ, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापिका संगीता गोटे, पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले.

**यशस्वी संघ : १४ वर्षांखालील** : काव्या शिंदे, तन्वी कांबळे, नंदिनी घोडके,समृद्धी कामशेट्टी,प्रणाली कांदे, अनुष्का सुलगडले.

**१७ वर्षांखालील** : लक्ष्मी चिवडशेट्टी, प्रांजल कलशेट्टी, शिवानी रच्चा,हर्षदा पवार, सुदिक्षा पटणे,समृद्धी अचलेरे.

# सिद्धेश्वर, एसव्हीसीएस, श्राविका, काडादीची सलामी

**शालेय शहर टेनिक्काईट स्पर्धा**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

शालेय शहर टेनिक्काईट स्पर्धेत मुलींच्या गटात सिद्धेश्वर कन्या प्रशाला, एस. व्ही. सी. एस, उमाबाई श्राविका व काडादी प्रशालेने प्रतिस्पर्धा संघावत मात करीत पुढील फेरीत प्रवेश केला.

राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर या स्पर्धेचे उदघाटन सुवर्ण स्पोर्टस् अकॅडेमीचे संस्थापक चन्नेश इंडी यांच्या हस्ते झाले. यावेळी असोसिएशनचे सचिव योगेश इंडी, प्रमुख पंच शुभम शेटे, ओम गदगे, बिराजदार, अजित पाटील, सुहास छंचुरे आदी उपस्थित होते. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींच्या ४० संघांनी सहभाग नोंदविला.

# ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयास विजेतेपद

**डॉ.आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या सोलापूर विभागीय टेबल टेनिस स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ नोव्हेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या सोलापूर विभागीय आंतरमहाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने विजेतेपद पटकाविले. यातून आंतर विभागीय स्पर्धेसाठी पूर्वा लिगाडे, साक्षी पाटील, ओंकार पवार, अजिंक्य कांबळे, चंद्रकांत हन्नूरे यांची निवड झाली आहे. संघास क्रीडा संचालक प्रा. शिवशरण कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्था अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव शिवानंद पाटील, कॅम्पस डायरेक्ट डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी अभिनंदन केले.



# स.हि.ने. प्रशालेस दुहेरी मुकुट

**शालेय शहर बॉलबॅडमिंटन स्पर्धेतील कामगिरी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

शालेय शहर बॉलबॅडमिंटन स्पर्धेत श्री सरस्वती मंदिर संस्था संचलित सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेने १४ व १९ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. सतरा वर्षाखालील मुलींच्या गटात त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

१९ वर्षाखालील मुलींच्या गटात स.हि.ने प्रशालेने अंतिम सामन्यात पी एस हायस्कूलचा १५-८, १५-१३ असा पराभव केला. १४ वर्षांखालील मुलींच्या गटात त्यांनी काडादी प्रशालेचा १५-४, १५-१३ अशी मात केली.



१७ वर्षे खालील मुलींच्या गटात अंतिम फेरीत दमाणी प्रशालेकडून १५-१३, १५-१७, १५-१२ अशा कडव्या लढतीनंतर उपविजेतेपद संपादिले.

संघास क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे संस्थेचे अध्यक्ष ॲड पांडुरंग देशमुख, सचिव रोहिणी तडवळकर, उपाध्यक्ष रेवती कुलकर्णी, खजिनदार सुधीर देव, माजी अध्यक्ष ॲड रघुनाथ दामले, सदस्य प्रशांत, बडवे, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी अभिनंदन केले.

# खुल्या गटात सौरव साहू अजिंक्य

**आमदार चषक बुद्धिबळ : १३ वर्षाखालील गटात आयुष्य जानगवळी अजिंक्य**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

आमदार चषक बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात सौरव साहूने तर १३ वर्षाखालील गटात आयुष्य जानगवळीने अजिंक्यपद पटकाविले.

अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त जगदीश मंगल कार्यालय येथे ही स्पर्धा संपन्न झाली. बक्षीस वितरण मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष प्रशांत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा.सोमनाथ फुलारी, किरण सुतार, नवनाथ कदम, वर्षा स्वयंरोजगार संस्था विकास कदम, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन सचिव शरद नाईक, इरांन्रा जमादार, सचिन चव्हाण,संतोष पैकेकरी,संतोष बुंदाले, श्री. कुंभार व श्री. चव्हाण यांचे हस्ते संपन्न झाला.



**गुणानुक्रमे अंतिम निकाल (प्रथम तीन) : आठ वर्षाखालील:** नमन रंगरेज, श्रेया पैकेकरी, आयुष बडवणे, ऋषभ पमनानी, श्रेयस हक्के, अथर्व पाटील, श्लोक भोसले, लोक सुरवसे, आव्हान चंदनशिवे, सुरभी कडगंची.

**नऊ वर्षाखालील** : प्रथम मुदगी, नचिकेत तोंडले, नैतिक होटकर, हर्ष मुसळे, श्लोक सदाफुले, आदित्य जानगवळी, सुमित गंगापुरे, रुपेश बत्तीन. संदेश गायकवाड, आरव पवार.

**दहा वर्षाखालील** : श्रेयस इंगळे, विहान कोंगारी, शशांक जमादार, सृष्टी मुसळे, श्रेयस कंदीकटला,श्रीरंग पैकेकरी, प्रज्ञेश महाडकर, संमेक सावंत, प्रतीक हलमल्ली, शिवम सरवदे.

**तेरा वर्षाखालील** : आयुष जानगवळी, वेदांत मुसळे, प्रज्वल काशीद, विहान राठोड, सृष्टी तोंडले, आदित्य कसबे, श्रीयांश गाजुल, हॉकीप नागमाइनिंन, तेजल चीलगुंडे, सुभान शेख.

**सतरा वर्षा खालील** : हर्ष हलमल्ली, यशवंत उबाळे, सेमका होराम, वेद आगरकर, सनय वाघचवरे, श्रीपाद पाटील, सुप्रीत घनाते, थेमजान होराम, तन्मय कदम, नियान कंदीकटला.

**पंचवीस वर्षाखालील** : गणेश पवार, स्वराली हातवळणे, हेमंत भोसले, सागर पवार, अनिकेत गुळेद.

खुला : सौरव शाहू, स्वप्निल हदगल, प्रसन्न जगदाळे, देवदत्त पटवर्धन, साईराज घोडके, अरुज हराळकर, अभिजीत संगा, आशीश पॉल, सागर गांधी, चंद्रशेखर बसर्गीकर

**उत्तेजनार्थ** : फरहान दर्जी, ऋषिकेश बुवा, आरोही दलाल, शौर्य चंदनशिवे, भालचंद्र कांबळे, दिव्या जाधव, समर्थ हत्तुरे, आराध्या पुजारी, अजित अलुरे, अन्वित प्याटी.



# जिल्हा क्रीडा संकुलात खेळाडूंना सुविधा देणार

**प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात खेळाडूंसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचा विश्वास प्रभारी जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी व्यक्त केले. सोलापूर जिल्हा ॲमेचुअर स्पोर्ट्स कराटे असोसिएशनच्या वतीने सचिव भीमराव बाळगे व सहसचिव इक्बाल शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्ता वरखड, क्रीडाधकारी नदीम शेख, विश्वास गायकवाड, धनंजय धेंडे आदी उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# घरकुल बांधकामाला गती मिळणार जागेसाठी मिळणार एक लाख रुपये

## बेघरांना होणार फायदा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ नोव्हेंबर-**
देशातील बेघरांना निवारा मिळावा म्हणून शासनाकडून घरकुल योजनेला गती देण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक लाभार्थ्याच्या खात्यावर पहिला हप्ता रक्कम जमा करण्यात आले आहेत. शिवाय जागा नसणाऱ्या लाभार्थ्यांना जागा घेण्यासाठी पूर्वीच्या रक्कमेत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे घरासाठी जागा नसणाऱ्या लाभार्थ्यांना आता जागेसाठी पन्नास हजाराऐवजी एक लाख रूपये देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे गरीब व सामान्य घरकुल लाभार्थ्यांना फायदा होणार आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्वावलंबी बनवण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेतून घरकुल लाभार्थ्यांना जागा घेण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यात येत होती. त्यामध्ये आता वाढ करण्यात आली असून, त्या लाभार्थ्यांना एक लाख रुपये मिळणार आहे. त्यामुळे घरकुलसाठी जागा खरेदी करणे सोईस्कर होणार आहे.

या योजने अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना पूर्वी ५० हजारापर्यंत लाभदेण्यात येत होता. शासनाने ही मर्यादा आता एक लाखापर्यंत वाढवली आहे.

काही ठिकाणी रेडी रेकनर दर जास्त असल्याने ५० हजारात जागा घेणे लाभार्थ्यांना शक्य नव्हते. त्यामुळे त्याची रक्कम दुप्पट करण्यात आली आहे. दरम्यान, जिल्ह्यात मागील काही वर्षांत या योजनेतून हजारो घरकूल लाभार्थ्यांनी जागा घेऊन घरकुलांचे बांधकाम केले आहे.

मात्र, गेल्या काही वर्षात जागेचे दर वाढल्याने ५० हजार रुपयात जागा खरेदी होत नसल्याने त्या रक्कमेत वाढ करावी, अशी मागणी लाभार्थ्यांकडून सातत्याने होत होती. त्या मागणीचा विचार करुन शासनाने निधीत ५० हजारांनी वाढ केली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना आता जागा घेण्यासाठी एक लाख रुपये मिळणार आहे.

> घरकूल लाभाथ्यर्थ्यांना गावठाण, गायरानची सरकारी जमीन देण्यास काही ठिकाणी तांत्रिक अडचणी आहेत. त्यामुळे ज्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्यासाठी जागा नाही, अशा लाभार्थ्यांनी दीनदयाल उपाध्याय योजनेतून एक लाख रुपयांचे अनुदान मिळण्यासाठी पंचायत समिती येथे प्रस्ताव दाखल करावा.
> **-अमोल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर**

> **घरकुल बांधकाम करण्यास सहाय**
> अनेक गरीब व सामान्य घरकुल लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा नव्हते. त्यामुळे अनेक दिवसापासून घरकुल बांधकाम प्रलंबित आहे. मात्र शासनाने जागा घेण्याच्या रक्कमेत वाढ करून पन्नास हजारांऐवजी एक लाख रूपये अनुदान केल्याने जागा घेण्यास मदत होणार आहे. त्यामुळे घरकुल बांधकामांनाही गती मिळणार आहे.
> **-भीमाशंकर बबलेश्वर, सरपंच भंडारकवठे, तालुका दक्षिण सोलापूर**



# तीर्थक्षेत्र अरण विकासाला लवकरच गती देणार : मुख्यमंत्री फडणवीस

## संत सावता माळी भक्त परिवाराच्यावतीने मुख्यमंत्राचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१३ नोव्हेंबर-**
माढा तालुक्यातील संत शिरोमणी सावता महाराज यांच्या तीर्थक्षेत्र अरण येथे गत वर्षी देवेंद्र फडणवीस यांनी तीर्थक्षेत्र अरण विकासाची घोषणा केली, सदर विकासकाम ंचा विकास आराखडा तयार करून या कामासाठी कॅबिनेट मध्ये १५१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून तीर्थक्षेत्र अरण विकासाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण केली.

याकरिता त्यांचे संत सावता महाराज यांचे वंशज सावता महाराज वसेकर, प्रभु महाराज माळी, साखरचंद महाराज लोखंडे, व्याख्याते अमर हजारे यांनी वारकरी भाविक भक्त परिवाराच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनी तीर्थक्षेत्र अरण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही तसेच, तसेच निवडणुका संपल्यानंतर येथील विकासकामांचे उद्घाटन करणार असून, तिथे होत असलेल्या कामावर आणि येणाऱ्या अडचणीवर लक्ष आहे. तसेच येणाऱ्या काळात उत्तम व्यवस्था आणि वारकरी सेवेसाठी सरकार कटिबद्ध राहून अरण विकासाला गती देणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले असल्याचे प्रभू महाराज माळी यांनी सांगितले.

# मोबाईलमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांची गुणवत्ता ढासळतेय अन पालकांची चिंता वाढतेय



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १३ नोव्हेंबर-**
काही वर्षांपुर्वी खरेतर मोबाईल हा फक्त शहरात व श्रीमंत लोक विशेषत नोकरदार व व्यावसायिक लोक वापरत असत पण सध्या हेच मोबाईल ग्रामीण भागात सुद्धा एक हातातील खेळणेच झाले आहे .कारण सध्या कितीही गरीब कुटुंब असले तरी त्या कुटुंबात अँड्रॉइड मोबाईल नाही असे कुटुंब आढळणे खुपच दुरापास्त झाले आहे.कोरानाची महामारी यामध्ये शाळा, कॉलेज जवळपास दोन वर्षांच्या आसपास बंदच होती. यामुळे शाळा, कॉलेजचे काम काज ऑनलाईन सुरू होते यामुळे खरेतर ज्या गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांकडे मोबाईल नव्हते त्यांनी जिवाचा आटापिटा करीत काहीही करुन मुलाला शैक्षणिक कामासाठी मोबाईल घेतला पण सध्या ह्याच मोबाईलच्या अतिवापरामुळे खरेतर ग्रामीण भागातील मुलांना ह्या मोबाईलचे व्यसनच जडले आहे काही केल्या शाळा, कॉलेजमधील विद्यार्थी मोबाईल खालीच ठेवेनात यामुळे अभ्यासाकडे प्रचंड दुर्लक्ष झाले असुन मोबाईलवर वेगवेगळ्या गेम्स, रिलस, इनसटाग्रामचा वापर, वॉटसपसचा वापर, फेसबुकचा वापर यामुळे खरेतर खरेतर विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तक किंवा नोटस कमी पण मोबाईल जास्त अशी विदारक परिस्थिती सध्या ग्रामीण भागात दिसुन येत आहे.

आई वडीलांचा डोळा चुकवून विद्यार्थ्यां मोबाईलचा बेसुमार वापर करीत आहेत यामुळे प्रचंड गुणवत्ता ढासळत आहे. खरेतर विद्यार्थी ह्याच मोबाईलचा उपयोग अभ्यासक्रमासाठी करुन गुणवत्ता वाढीसाठी सुद्धा करु शकतात पण फायद्याऐवजी इतर कामासाठीच विद्यार्थी मोबाईलचा वापर करीत आहेत. बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अभ्यास करण्यासाठी किंवा दहावी सेमी इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मोबाईलवरून ऑनलाईन पद्धतीने अभ्यास करणे किंवा अडी अडचणी सोडविणे शक्य असताना. हेच बारावी व दहावीमधील विद्यार्थ्यांच मोबाईलचा अतिवापर करुन मोबाईलच्या आहारी जाऊन आपल्या आयुष्यातील.

महत्त्वाच्या टप्प्यातच `मोबाईलच्या आहारी जाऊन आपले नुकसान करून घेत आहेत. याम ध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थांच मोबाईलच्या आहारी जात आहेत यामुळे पालक प्रचंड चिंतेत असुन मोबाईलच्या वापरामुळे ढासळणारी गुणवत्ता हा म ोठा चिंतेचा विषय झाला आहे.याला पालकांनी वेळेतच आवर घालणे आवश्यक आहे. अन्यथा मोबाईलच्या अतिवापराने पुढील पिढीचे नुकसान कसे टाळायचे हा गहन प्रश्न पालकापुढे आहे.

# स्वावलंबी भारत अभियानाची अखिल भारतीय बैठक पुण्यात संपन्न



**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.१३ नोव्हेंबर-**
स्वावलंबी भारत अभियान चा विचार नुसतीच चर्चा किंवा धोरणाचा नाही, तो प्रत्यक्षात अम लात आणण्यासाठी भारतीय मजदूर संघाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम करण्याची आवश्यकता आहे असे भा. म. संघाचे अखिल भारतीय अध्यक्ष हिरण्मय पंड्या यांनी आपल्या उद्घाटन पर भाषणात प्रतिपादन केले. त्यांनी सांगितले की स्वदेशीचा विचार हा जीवनमूल्य आहे, आजच्या परिस्थितीत भारताला स्वरोजगार संपन्न बनवायचे असेल तर कठोरपणे यांचे पालन व प्रचार व प्रसिद्धी करण्याची गरज आहे. या वर्गाला देशातील १७ राज्यातून तसेच विविध उद्योगातील १८ महासंघाचे प्रतिनिधि उपस्थित होते.

स्वावलंबी भारत अभियान म्हणजे काय, त्यांची ध्येय धोरणे काय या विषयी स्वावलंबी भारत अभियांचे राष्ट्रीय सह समन्वयक जितेंद्र गुप्ता यांनी सोदाहरण विवेचन केले. संपूर्ण रोजगार युक्त भारत, स्वदेशीचा वापर व प्रसार तसेच आत्मनिर्भर भारत बनवण्यासाठी यांचा सर्वत्र विचार पसरवून विविध उद्योगात तरुणांना उभे करणे आवश्यक आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. स्वावलंबी भारत अभियान यासाठी कटिबद्ध असून देशभरात विविध ठिकाणी आपण उद्योजक मेळावे घेतो, तसेच तरुणांना प्रशिक्षण देखील देतो असे त्यांनी सांगितले.

या संदर्भात भारतीय मजदूर संघाच्या कार्यकर्त्यांनी नेमकेपणाने काय केले पाहिजे ? यावर चर्चा झाली. विविध प्रकारे यांचा प्रचार व जागरण समाजात करून तरुणांना यांचे महत्व कशा प्रकारे सांगता येईल यावर देखील या बैठकीत विचार करण्यात आला. सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री तसेच स्वावलंबी भारत अभियान चे क्षेत्रीय समन्वयक विनय खटावकर यांनी जागरण व प्रत्यक्ष कसे काम करावे या संबंधी मार्गदर्शन केले व प्रमुख मुद्याचे सविस्तर विविरण केले.

भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय सरचिटणीस रविंद्र हिमते यांनी या कामात मजदूर संघाच्या कार्यकर्त्यांनी छोटे छोटे प्रकल्प कसे राबवावेत यांची माहिती दिली, तसेच देशभर आपल्या कार्यकर्त्यांनी यात प्रत्यक्ष सहभाग नोंदविला पाहिजे हे स्पष्ट केले. भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष श्री. अनिल ढुमणे यांनी आभार प्रदर्शन केले,स्वावलंबी भारत अभियाचे अखिल भारतीय प्रभारी रविंद्र देशपांडे यांनी प्रास्ताविक करून उद्देश स्पष्ट केला व संपूर्ण वंदेमातरम चे सामूहिक गायन होऊन कार्यक्रम समाप्त झाला. विशेष म्हणजे या सर्व कार्यकर्त्यांनी यावेळी सामूहिक शपथ घेऊन स्वदेशीचा वापर व विचार सर्वपर्यंत पोहोचवू असा विश्वास दिला. भा. म. संघ पुणे जिल्ह्याने या बैठकीच्या सर्व व्यवस्था संभाळल्या होत्या. बाळासाहेब भुजबळ, उमेश विश्वाद, हरी सोवनी, उमेश विश्वाद, अर्जुन चव्हाण यांनी उपस्थित राहून हा कार्यक्रम यशवी केल्याची माहीती भारतीय मजदूर संघाचे प्रदेश उपाध्यक्ष सचिन मेंगाळे यांनी दिली.




# निमगाव हवेलीत आज निवृत्ती महाराज इंदोरीकरांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१३ नोव्हेंबर-**
करमाळा तालुक्यातील पूर्व भागातील निमगाव हवेली येथील ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यातील नीळ पाटील परिवारातील मार्गदर्शक ह भ प बाळासाहेब नीळ पाटील यांचा अमृत महोत्सव (अभिष्टचिंतन सोहळा) आयोजित करण्यात आला आहे.

यानिमित मौजे निमगाव हवेली (ता.करमाळा) येथे सुप्रसिद्ध कीर्तनकार व समाजप्रबोधनकर ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख-इंदोरीकर यांचे हरीकीर्तनाचा कार्यक्रम दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५ वाजता संपन्न होणार आहे.

तसेच सायं. ८ ते ११ सुप्रसिद्ध भजन सम्राट बाळासाहेब वाईकर गुरुजी, संगीत अलंकार शिवानंद स्वामी पुणे, ह.भ.प. सतीश महाराज सूर्यवंशी व तबला साथ ताल सम्राट शेखर दरवडे अहिल्यानगर यांचा सुगम संगीत भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

तरी निमगाव हवेली व पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी तसेच किर्तन, व भजन प्रेमी भाविकांनी या आनंदमयी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन अविनाश पाटील व डॉ.पद्मिनी पाटील यांनी केले आहे

# खर्डीत सोमवारी श्री सीताराम महाराज पुण्यतिथीनिमित्त भंडारा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ नोव्हेंबर -**
सोलापूर जिल्हातील ग्रामीण तीर्थक्षेत्र असणाऱ्या खर्डी (ता.पंढरपूर) येथे मंगळवार पासून पुण्यतिथी सोहळ्याचे नाम सप्ताह सुरू झाला आहे. येत्या दिनांक १७ नोव्हेंबर रोजी सद्गुरु श्री सिताराम महाराज पुण्यतिथी सोहळ्या निमित्त महाराजांच्या समाधीवर पुष्पवृष्टी केली जाणार आहे.

या नाम सप्ताहामध्ये सकाळी काकडाआरती, भजन, दुपारी आरती, महानैवेद्य असे स्वरूप असते. सायंकाळी सहा पासून रात्री दहा पर्यंत कीर्तन, प्रवचन, महाआरती असते. नाम सप्ताहासाठी हजारो भाविक श्री सिताराम महाराजांच्या मठामध्ये व गावांमध्ये अन्यत्र रहात असल्याने गावाला धार्मिक स्वरूप प्राप्त झाले आहे. दरम्यान समाधी मंदिर ट्रस्टचे मुख्य विश्वस्त हरी पांडुरंग कुलकर्णी अध्यक्ष दीपक रोंगे, भागवत (बापू) केसकर, विकास (वामन)कुलकर्णी, उमेश परिचारक विश्वस्तांसह आदींनी यात्रा पूर्व बैठक घेऊन नियोजन केले आहे.

गावचे सरपंच मनीषा सव्वाशे, उपसरपंच शरद रोंगे, ग्रामसेवक बी.व्ही.कुलकर्णी, बंडुलाल पठाण, अण्णा कावरे, प्रभू गायकवाड, हुसेन मुलाणी, आदी परिश्रम घेत आहेत.

> **यात्रेचा उत्सव चार दिवस चालणार**
> यंदाचा उत्सव हा अमावस्या व गुरुवारसह चार दिवस चालणार असल्याने गावात खेळण्याची दुकाने थाटली गेली आहेत. त्यामुळे बाळगोपाळांना आनंद घेता येणार आहे.

> **१७ नोव्हेंबर रोजी समाधीवर पुष्पवृष्टी**
> येत्या १७ नोव्हेंबर रोजी महाराजांच्या समाधीवर बारा वाजून वीस मिनिटांनी पुष्प वर्ष करण्यात येणार आहे.

> **४ डिसेंबरला गाणगापुरात पालखी**
> खर्डी येथील यात्रेत आजूबाजूच्या परराज्यातून देखील हजारो भाविक येत असतात. मंदिरावर आकर्षक रोषणाई केली आहे. दिनांक २१ नोव्हेंबर रोजी पालखी प्रस्थान होऊन ४ डिसेंबर रोजी गाणगापूर येथे पोहोचणार असल्याची माहिती पालखी सोहळा प्रमुख विकास कुलकर्णी यांनी दिली.

> **यात्रेसाठी पोलिस बंदोबस्तासह विशेष गाड्यांची सोय**
> यात्रा कालावधीसाठी विशेष गाड्यांची सोय पंढरपूर व सांगोला येथून केली असल्याची माहिती आगारप्रमुखांनी दिली. तसेच यात्रा कालावधीत चोख बंदोबस्त ठेवणार असल्याची माहिती तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक टी.आय.मुजावर, पोलीस पाटील बालाजी रोंगे यांनी दिली.

## महत्वाचे...

### सोलापूरच्या सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षकपदी अनिल बनसोडे



**बार्शी, दि.१३ नोव्हेंबर-**
कुर्डूवाडी नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी शिस्तप्रिय, कार्यतत्पर, मनमिळावू व लोकाभिमुख अधिकारी म्हणून ओळखले जाणारे अनिल बनसोडे यांची नुकतीच जिल्हा परिषद सोलापूर येथे सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक (उच्च माध्यमिक विभाग) या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. आपल्या कर्तव्यनिष्ठ, शिस्तबद्ध व प्रामाणिक कार्यशैलीमुळे अनिल बनसोडे यांनी शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिक्षकवर्ग, विद्यार्थी आणि सहकारी अधिकारी यांच्यात त्यांनी नेहमीच संवादाचे, सहकार्याचे आणि सकारात्मक ऊर्जेचे वातावरण निर्माण केले आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल विविध शिक्षक संघटना, शिक्षणप्रेमी, सहकारी अधिकारी व नागरिकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



### पंढरपूरमध्ये १६ लाखांची दारू जप्त; तालुका पोलिसांची मोठी कारवाई

**पंढरपूर, दि.१३ नोव्हेंबर -**
पंढरपूर तालुका पोलिसांनी नाकाबंदीवेळी संशयास्पद दोन वाहनांची तपासणी करताना त्यामधील १६ लाख १६ हजारांची ॲड्रियल कंपनीची दारू आणि दोन वाहने असा मुद्देमाल जप्त केला. याबाबत माहिती अशी की, आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या सूचनेनुसार १३ नोव्हेंबर रोजी पहाटे तालुका पोलिसांनी खर्डी चौकात नाकाबंदी केली. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक कविता मुजावर, पोलीस हवालदार सुजित उबाळे, विजयकुमार आवटी व अंमलदार नाकाबंदी करत असताना सांगोला रोडच्या दिशेने येणाऱ्या दोन गाड्या त्यामध्ये एक अशोक लेलँड व दुसरी एसी.एक्स कार संशयितरित्या नाकाबंदी ठिकाणापासून काही अंतरावर थांबल्या. बराच वेळ थांबल्यामुळे पोलिसांनी गाड्यांच्याजवळ जाऊन पाहणी केली. त्यातून दोघेजण पळून गेले व एका व्यक्तीला ताब्यात घेतले. पप्पू बनसोडे (रा. सांगोला) विकास तुकाराम होनमाने (रा. जुनोनी ता. सांगोला) असे त्यांची नावे आहेत. त्या दोघांनी किराणामाल असल्याचे सांगितल्यानंतर संपूर्ण तपासणी केली. त्यावेळी कारमध्ये बोगस नंबर प्लेट दिसल्यानंतर पोलिसांना जास्त संशय आला. अशोक लेलँडमध्ये ॲड्रियल व्हिस्की दारूचे एकूण १५० बॉक्स (एकूण सुमारे २ लाख १६ हजार ) व अशोक लेलँड (किंमत रुपये सात लाख) तसेच कार असा एकूण १६ लाख १६ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त करून तीन आरोपी विरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल दाखल केलेला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक श्री.कवितकर , विक्रम वडणे, पीएसआय भारत भोसले व मुंडे तसेच हवालदार सुजित उबाळे, पोलीस हवालदार ताजोदीन मुजावर, विनायक नलावडे तात्या गायकवाड, मंगेश रोकडे, विजयकुमार आवटी यांच्या पथकाने केली.





### कै. वि.गु. शिवदारे यांच्याजन्मशताब्दीनिमित्त हंकारे यांचे व्याख्यान संपन्न

**वळसंग, दि.१३ नोव्हेंबर-**
वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथे कै. वि.गु.शिवदारे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त बाप समजून घेताना या विषयावर प्रख्यात व्याख्यानकार वसंत हंकारे यांचे व्याख्यान संपन्न झाले. हा कार्यक्रम कै.वि. गु शिवदारे प्रतिष्ठान व श्रीशंकरलिंग हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे,श्री शंकरलिंग स्कूल कमिटीचे चेअरमन शिवशरण थळंगे, श्री शंकरलिंग देवस्थान ट्रस्टीचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, कमिटीचे विश्वस्त विश्वनाथ थळंगे, माजी सरपंच सुरेश माशाळे, खासिम अमलीचुंगे व प्रतिष्ठानचे विश्वस्त सूर्यकांत ईसापुरे, प्रमोद बिराजदार, कमिटीचे विश्वस्त शिवशरण प्याटी, सिद्धारूढ काळे, प्रकाश दूधगी, मुख्याध्यापक वीरेश थळंगे,पर्यवेक्षक शिवानंद घोडके,वीरेश बागलकोटी व गावातील आजी-माजी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्तावना सतीश ईसापुरे यांनी केली व आभार प्रदर्शन नरेंद्र गंभीरे यांनी केले.

## निधन वृत्त...

### श्रीमती सामलेटी



**सोलापूर, दि. १३ नोव्हेंबर-**
एमआयडीसीतील रोडवरील आदर्शनगर येथील श्रीमती बाळकृष्ण सामलेटी (वय ७४) यांचे गुरुवारी १३ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रस्त्यावरील पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पती, ३ मुली, सूना व नातवंडे असा परिवार आहे.

### प्रदीपसिंह चव्हाण



**सोलापूर, दि.१३ नोव्हेंबर-**
येथील प्रदीपसिंह गुलाबसिंह चव्हाण (वय ५८) यांचे गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. शुक्रवार, १४ नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजता जुना पुणे नाका स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि भाऊ-बहीण असा परिवार आहे. सरस्वती चौक नवरात्र महोत्सव मंडळाचे ते सदस्य होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दै. तरुण भारत धाराशिव नुतन कार्यालय शुभारंभ प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या...



दैनिक सोलापूर तरुण भारत धाराशिव जिल्हा आवृत्ती नुतन कार्यालय आरंभ प्रसंगी तरुण भारत कुटुंब प्रमुख दिलीप पेठे, श्री तुळजाभवानी मातेचे महंत वाकोजी बुवा, प्रकाशक दिलीप दुलंगे, जिल्हा संघचालक अॅड. रवींद्र कदम, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, डॉ. सुश्रुत डंबळ, डॉ. सतीश महामुनी, गणेश पुजारी, बापू जगदे, अब्दुल सय्यद, बाळासाहेब शामराज, उमेश गवते, वितरण व्यवस्थापक नागसेन शिवशरण, उमरगा तालुका प्रतिनिधी आकाश पोतदार, येरमाळ्याचे प्रतिनिधी सुधीर लोमटे, लोहारा तालुका प्रतिनिधी सुमित झिंगाडे, वाशी तालुका प्रतिनिधी सुधीर घोलप, खासमसवाडीचे सुशिल पाटील, कळंबचे तालुका प्रतिनिधी परवेज मुल्ला, कळंब शहर प्रतिनिधी अनिल गाडे, संतोष कांबळे आदी.



महंत वाकोजी बुवा यांचा तरुण भारत धाराशिव परिवाराच्या सत्कार करताना दिलीप पेठे साहेब. यावेळी राजाराम मस्के उपस्थित होते.



दिलीप पेठे साहेबांचा सत्कार करताना जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे, उपसंपादक विपीन वीर.



प्रकाशक दिलीप दुलंगे यांचा सत्कार करताना अनिल आगलावे, विपीन वीर.



जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांचा सत्कार करताना दिलीप पेठे, दिलीप दुलंगे, राजाराम मस्के.



डॉ. सुश्रुत डंबळ यांचा सत्कार करताना दिलीप पेठे, दिलीप दुलंगे, राजाराम मस्के आदी.



सामाजिक कार्यकर्त्या अर्चनाताई अंबुरे, रवींद्र अंबुरे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



धाराशिव जिल्हा संस्कार भारतीच्या वतीने जिल्हाध्यक्ष शामसुंदर भंसाली, अनिल ढगे, प्रभाकर चोराखळीकर, शेषनाथ वाघ, डॉ. सतीश महामुनी.



सरपंच परिषद पुणे महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्ष तथा शिवसेना (उबाठा) पक्ष धाराशिव महिला जिल्हाध्यक्ष जिनत सय्यद, सरपंच परिषद राज्य संघटक कोहिनुर सय्यद, स्वाभिमानी संघटना जिल्हाध्यक्ष तानाजी पाटील, दिपक मुळे, प्रल्हाद अडागळे, अजित धोतरकर यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



आरंभ मराठी वृत्तपत्राचे संपादक चंद्रसेन देशमुख, कार्यकारी संपादक सज्जन यादव, तुळजापूर तालुका प्रतिनिधी सूरज बागल यांनी दिलीप पेठे साहेबांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



राष्ट्रवादी (शरद पवार गटाचे) पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



पुजारीनगर फाऊंडेशन तुळजापूर अध्यक्ष तथा युवा उद्योजक गणेश पुजारी यांनी दिलीप पेठे साहेबांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हाप्रतिनिधी अनिल आगलावे, युवा उद्योजक बापू घोंगते, पत्रकार बापू जगदे उपस्थित होते.



आरळी बुद्रुक सरपंच किरण व्हरकट, माजी उपसरपंच पापालाल सय्यद यांनी दिलीप पेठे साहेबांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



आयुष्मान भारत आघाडी जिल्हा प्रमुख धैर्यशील दरेकर, तुळजापूर तालुका किसान आघाडी संयोजक संदीप गंगणे, उद्योजक राजाभाऊ धरणे, पत्रकार सचिन ताकमोघे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या



शिवराज्याभिषेक समितीच्या वतीने जिल्हाध्यक्ष अमोल सिरसट, सचिन गायकवाड, संतोष आंबेकर, संतोष घोरपटे, हनुमंत काकटे, अनिल आगलावे, नागसेन शिवशरण



यशवंतरावं चव्हाण महाविद्यालय तुळजापूर ग्रंथपाल डॉ. अभिजित बाबरे, अजय कांबळे यांनी शुभेच्छा दिल्या.



मराठवाडा साहित्य परिषद शाखा तुळजापूर तथा माजी नगरसेवक अमर हंगरगेकर यांनी शुभेच्छा दिल्या.



भाजप प्रदेश सदस्य गुलचंद व्यवहारे, शिवसेना (शिंदे) पक्षाचे जिल्हा सह सम्पर्क प्रमुख अमरराजे परमेश्वर, उद्योजक अनंत रसाळ, प्रदीप कदम, डॉ. सतीश महामुनी, सुमित झिंगाडे यांनी शुभेच्छा दिल्या.



मुख्याध्यापक तथा शिक्षक नेते बशीर तांबोळी यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



श्री श्री रविशंकर स्कुलचे प्रा. रजनीकांत जगताप, येवती येथील युवा उद्योजक विशाल शिंदे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



जेष्ठ पत्रकार तथा मराठवाडा नेता वृत्तपत्राचे जिल्हा प्रतिनिधी प्रशांत कावरे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



कै. विठोबा पारवे वाचनालय आरळी बुद्रुकचे ग्रंथपाल शिवानंद गवळी यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## रब्बी अनुदान वितरणात गोंधळ; डीसीसी बँकेच्या व्यवहारांमुळे शेतकरी हैराण

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ दि.१३ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामाचे अनुदान शासनाकडून जाहीर करून वितरित करण्यात आले असले तरी अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शेतकऱ्यांची खाती स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इंडिया पोस्ट बँकेत असतानाही अनुदानाची रक्कम डीसीसी जिल्हा बँकेकडे वर्ग करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्हा बँकेचे व्यवहार बऱ्याच दिवसांपासून बंद असल्याने अनेक शेतकऱ्यांची खाती निष्क्रिय किंवा बंद झाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान अडकून पडले असून त्यांना प्रत्यक्ष रक्कम मिळण्यात अडथळे येत आहेत. याशिवाय, डीसीसी बँक 'मिनिमम बॅलन्स'च्या नावाखाली शेतकऱ्यांकडून शेकडो रुपये कपात करत असल्याची तक्रार समोर आली आहे. या परिस्थितीमुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली असून, शासनाने आणि बँक प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांना अनुदान थेट त्यांच्या मूळ खात्यात जमा करावे, अशी मागणी होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### नळदुर्गमध्ये समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचे प्रथम आगमन

**नळदुर्ग, दि.१३ नोव्हेंबर -**

नळदुर्ग शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच श्रीक्षेत्र सज्जनगड येथील समर्थ रामदास स्वामींच्या पवित्र पादुकांचे आगमन झाले. दि.१२ नोव्हेंबर रोजी झालेल्या या ऐतिहासिक प्रसंगी शहरातील नागरिकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. ब्राह्मण गल्लीतील श्री राम मंदिरात रामदासी परिवाराकडून पादुकांचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर वाजत-गाजत शहरातून मिरवणूक काढण्यात आली. सावरकर चौक, संभाजी महाराज चौक, चावडी चौक, भवानी चौक मार्गे श्री राम मंदिरात मिरवणुकीचा समारोप झाला. प्रत्येक चौकात नागरिकांनी पादुकांचे स्वागत करून दर्शन घेतले. कार्यक्रमानंतर उपस्थित भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या मिरवणुकीत माजी नगरसेवक, विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार आणि महिला भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

### भाजपचे सरपंच संजय शिंदे बावी पंचायत समिती गटातून इच्छुक

**वाशी, दि.१३ नोव्हेंबर -**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्याने वाशी तालुक्यात राजकीय हालचालींना वेग



आला आहे. विविध पक्षांकडून इच्छुक उमेदवारांची चर्चा सुरू असून, महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये युतीचा गुंता अद्याप सुटलेला नाही. याच पार्श्वभूमीवर वाशी तालुक्यातील बावी पंचायत समिती गणा मधून भाजपकडून बावी गावचे सरपंच संजय शिंदे हे पंचायत समिती सदस्यपदासाठी इच्छुक असल्याची चर्चा आहे. पक्षाच्या अंतर्गत वर्तुळात आणि कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या नावावर जोरदार चर्चा सुरू असून, स्थानिक पातळीवर त्यांचा प्रभाव व कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क लक्षात घेता त्यांचा दावा मजबूत मानला जात आहे. महायुतीमध्ये तोडगा न निघाल्यास या ठिकाणी स्पर्धा चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### जळकोट जि.प. गटात आश्विनी नवगिरे यांची इच्छुकता

**नळदुर्ग, दि.१३ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट जिल्हा परिषद गटातील आगामी निवडणुकीची तयारी वेग घेत आहे.



या गटातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून आश्विनी प्रशांत नवगिरे यांनी इच्छुकता दर्शविल्याने स्थानिक राजकारणात चर्चेला उधाण आले आहे. जळकोटचे उपसरपंच प्रशांत नवगिरे यांच्या नेतृत्वाखाली विकासकामांवर भर देत लोकसेवेचा विश्वास निर्माण करण्यात आला असून, त्यांच्या जनसंपर्कामुळे नवगिरे दाम्पत्य लोकप्रिय ठरले आहे. महिला आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर नवगिरे यांची इच्छुकता महत्त्वाची ठरत असून, स्थानिक शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

### न.पा.च्या प्रभाग क्र. १० मधून अनिता रणे यांची भाजपकडून उमेदवारीची मागणी

**नळदुर्ग, दि.१३ नोव्हेंबर -**

नळदुर्ग नगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्र. १० मधून अनिता जनार्धन रणे यांनी भाजपकडून उमेदवारीची मागणी केली आहे.



या निवडणुकीसाठी आपण पूर्ण तयारी केली असल्याचे त्यांनी सांगितले. अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव असलेल्या या प्रभागात रणे कुटुंबाचा राजकीय व सामाजिक वारसा आहे. कै. शंकरराव रणे हे सलग २५ वर्षे नगरसेवक होते, तर कै. जनार्धन रणे हे १० वर्षे नगरसेवक होते. अनिता रणे व त्यांचा मुलगा विश्वास रणे हे सामाजिक कार्य, स्वस्त धान्य दुकान आणि बचत गटाच्या माध्यमातून जनतेशी जोडलेले आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपने आपल्याला उमेदवारी द्यावी, अशी मागणी अनिता रणे यांनी पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.

### नळदुर्ग मनसे शहराध्यक्षपदी सुरज चव्हाण

**नळदुर्ग, दि.१३ नोव्हेंबर -**

नळदुर्ग शहर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अध्यक्षपदी सुरज चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि नेते अमित ठाकरे, बाळा नांदगावकर, दिलीप धोत्रे, संतोष नागरगोजे, जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव व जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तुळजापूर तालुका अध्यक्ष मल्लिनाथ कुंभार यांनी ही नियुक्ती जाहीर केली.

# तेरखेडा जि.प. गटात चव्हाण-खामकरांची तगडी फिल्डिंग; घोलप शांत!

## सोशल मीडियावर रणसंग्राम तापला

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.१३ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा जिल्हा परिषद गटात निवडणुकीचे तापमान चांगलेच वाढले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका जवळ आल्याने प्रत्येक इच्छुक उमेदवार गावागावात जनसंपर्क राबवत असून, सोशल मीडियावर समर्थकांमध्ये राजकीय रणसंग्राम पेटला आहे.

या सर्वसाधारण गटात शिवसेना (शिंदे गट) कडून तिन्ही इच्छुक संदेश (विकी) चव्हाण, बिभीषण खामकर आणि बाबासाहेब घोलप यांची नावे चर्चेत आहेत. चव्हाण यांचा युवकांमध्ये मजबूत संपर्क असून, विधानसभा निवडणुकीत आमदार तानाजी सावंत यांना तेरखेडा गटातून सर्वाधिक लीड



मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. रोजगार निर्मितीतील पुढाकार आणि मातोश्री ग्रामपंचायतीतील सदस्यपदामुळे त्यांची ओळख अधिक बळकट झाली आहे. तर खामकर हे अनुभवी व दिग्गज नेते. यापूर्वी जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले असून, सरपंच आणि विविध पदांवर काम करत गावागावात मजबूत पकड निर्माण केली आहे. दुसरीकडे घोलप सध्या शांत असले तरी त्यांच्या हालचालींवर सगळ्यांचे लक्ष आहे. त्यांच्या पत्नी रूपाली घोलप या वाशी पंचायत समितीच्या माजी सभापती राहिल्या असून, घोलप यांची शांत खेळी गेम चेंजर ठरू शकते, अशी चर्चा आहे. तिन्ही इच्छुकांमुळे शिंदे सेनेत तिकीट वाटपाचे समीकरण गुंतागुंतीचे झाले आहे. कोणावर शिक्कामोर्तब होते आणि तिकीट न मिळाल्यास कोण बंडखोरी करतो, यावर तेरखेडा गटातील निवडणुकीचे भविष्य अवलंबून राहणार आहे.

सध्या तेरखेड्याच्या राजकारणात एकच चर्चा रंगली आहे. घोलप शांत, पण नजरा सगळ्यांच्या त्यांच्यावरच! असे चित्र सध्या पहावयास मिळत आहे.

तरुण भारत राजकिय दंगल

## उमरगा नगराध्यक्ष पदासाठी भाजपाचे हर्षवर्धन चालुक्य यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ नोव्हेंबर -**

आगामी उमरगा नगरपरिषद निवडणूक २०२५ साठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष पदासाठी युवा नेते हर्षवर्धन भैय्या शिवाजीराव चालुक्य यांनी गुरुवार, दि.१३ नोव्हेंबर रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

हर्षवर्धन चालुक्य यांनी आपला अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार गोविंद येरमे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आणि नगरपरिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या समक्ष सादर केला.

याप्रसंगी भाजपाचे उमरगा-लोहारा विधानसभा प्रमुख राहुल पाटील सास्तूरकर, धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती अभयराजे चालुक्य, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष कैलास शिंदे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस माधव पवार, माजी तालुकाध्यक्ष शहाजी पाटील, माजी नगराध्यक्ष हंसराज गायकवाड, माजी नगरसेवक गोविंद घोडके, विष्णू बिराजदार, अमर वरवटे आदी मान्यवरांसह अनेक उमरगा तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजाभवानीचे मुख्य क्षेत्रपाल काळभैरवनाथाचा जन्मोत्सव साजरा





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ नोव्हेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी नगरीतील श्री तुळजाभवानी मातेचे मुख्य क्षेत्रपाल व रक्षक असणाऱ्या कालभैरवाचा जन्मोत्सव बुधवारी मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

नवंग्रहांसह तंत्रविद्येचे आदीपत्य, सृष्टीची न्यायदेवता व काळावर प्रभुत्व असणाऱ्या या देवतेचा जन्मोत्सवात पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची दर्शनाची गर्दी झाली होती. सकाळी सात वाजता भैरवाच्या पारंपरिक तेलाभिषेक व त्यानंतर नित्योपचार पूजा व आरती संपन्न झाली. मंदिर परिसरात श्री काळभैरवाष्टक पठणासह हवन, होम व भैरव यज्ञ पार पडला.

या सोहळ्यात भैरव चंडी पाठ आणि भैरव नैवेद्य सेवा संपन्नतेसह महाआरतीने होमहवन व भैरव यज्ञ या विधिंची सांगता करण्यात आली. मंदिर परिसरात रांगोळी रेखाटन आणि दीपप्रज्वलनाने वातावरण उजळून निघाले होते.

पूर्वापार प्रथेप्रमाणे भैरवांना गांजाची चिलीम अर्पण करण्यात आली हा सर्व धार्मिक विधीची सेवा कालभैरवाचे मुख्य नागनाथ पुजारी यांनी बजावली.

भव्य यज्ञातील होम-हवनाचे मानकरी म्हणून श्री व सौ. लिंबाजी पुजारी यांनी विधीपूर्वक मान स्वीकारला. त्यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारांसह भैरव यज्ञ, चंडी पाठ आणि होम पूर्ण करण्यात आला.

## नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकी आधीच राजकीय खिचडी!

### नेते-कार्यकर्त्यांच्या पक्षांतराने गोंधळाचे वातावरण...

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१३ नोव्हेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक अवघ्या २० दिवसांवर येऊन ठेपली असतानाच शहरातील राजकीय समीकरणे पूर्णपणे खिचडी झाली आहेत. एका पक्षातून दुसऱ्या पक्षात नेते-कार्यकर्त्यांच्या उड्यांमुळे नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी कोण कोणत्या पक्षाकडून रिंगणात उतरणार हे अजूनही स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे शहरात गोंधळाचे आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भाजपचे माजी नगरसेवक संजय बताले यांनी भाजपला सोडून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला असला, तरी नुकत्याच झालेल्या महायुतीच्या निर्णयानुसार भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनी एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे बताले आणि त्यांच्या समर्थकांची मोठी गोची झाली असून, तरीही बताले यांनी




राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लढविण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे नेते अशोक जगदाळे यांनी पक्षाला सोडचिट्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने नळदुर्गच्या राजकारणात मोठी खळबळ माजली आहे. त्यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे माजी नगराध्यक्ष शहेबाज काझी यांची नगराध्यक्षपदासाठीची आतापर्यंतची तयारी धोक्यात आली असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

दुसरीकडे भाजपनेही अद्याप आपला उमेदवार जाहीर केलेला नाही. इतर पक्ष कोणता उमेदवार देतो हे पाहूनच भाजप आपला उमेदवार ठरवेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ चारच दिवस शिल्लक असताना सर्वच पक्षांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे.

दरम्यान, मनसेचे शहराध्यक्ष अलीम शेख यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला असून, शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. या घडामोडींमुळे निवडणूक जवळ येत असतानाही नळदुर्गचे राजकीय वातावरण अद्याप शांत असून मतदारही गोंधळात पडले आहेत.

एकूणच, नगराध्यक्षपदासाठी अनेक नवे चेहरे मैदानात उतरतील, अशी शक्यता निर्माण झाली असून, नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक यंदा अत्यंत चुरशीची होणार आहे.

## भाजप नगराध्यक्ष उमेदवाराची माळ कोणाच्या गळ्यात?

### भाजपमध्ये उमेदवारीसाठी चुरस; काँग्रेसकडून मात्र सर्वानुमते एकच नाव निश्चित!

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.१३ नोव्हेंबर -**

तुळजापूर नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपमध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी चांगलीच रस्सीखेच सुरू झाली आहे. शहरातील अनेक इच्छुकांनी पक्षश्रेष्ठीकडे उमेदवारीसाठी अर्ज केले असून उमेदवाराची माळ कोणाच्या गळ्यात पडणार? याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर भाजप कार्यकर्त्यांमध्ये माजी नगरसेवक विनोद गंगणे यांचे नाव सर्वाधिक चर्चेत होते. मात्र पक्षातीलच काही वरिष्ठ नेत्यांनी नगराध्यक्ष पदासाठी आपली दावेदारी सादर केल्याने परिस्थिती गुंतागुंतीची झाली आहे.




भाजपकडून उमेदवारीची मागणी करणाऱ्यांमध्ये माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंदे, माजी नगरसेवक विनोद गंगणे, सचिन रोचकरी, सज्जनराव साळुंके, सचिन पाटील, नारायण नन्नवरे आणि बाळासाहेब शामराज यांचा समावेश आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींना आता उमेदवार ठरविण्याची कठीण वेळ आली आहे.

दुसरीकडे, काँग्रेसकडून मात्र सर्वानुमते उमेदवार ठरले असल्याचे समजते. सुरुवातीला अमोल कुतवळ यांचे नाव चर्चेत होते; मात्र त्यांच्या समजूतदार भूमिकेमुळे अखेर माजी उपनगराध्यक्ष अमर मगर यांच्या नावावर महाविकास आघाडीने शिक्कामोर्तब केले आहे.

दरम्यान, महंत इच्छागिरी महाराज यांनीही तुळजापूरच्या सर्वांगीण विकासासाठी आणि व्यसनमुक्तीसाठी भाजपकडे उमेदवारीची मागणी केली असल्याचे समोर आले आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील, महंत इच्छागिरी महाराज आणि महंत मावजीनाथ महाराज यांच्यात झालेल्या बैठकीनंतर शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे.

१७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असताना, १४ नोव्हेंबरपर्यंत केवळ एकच अर्ज दाखल झाल्याचे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्वच पक्षांत हालचाली वेगाने सुरू आहेत.

आता भाजपकडून एबी फॉर्म कोणाला मिळणार आणि नगराध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, हे १७ नोव्हेंबरनंतर स्पष्ट होईल. दोन डिसेंबर रोजी मतदान होणार असून ३ डिसेंबरला मतमोजणीनंतर तुळजापूरचा नवा नगराध्यक्ष कोण ठरणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुरूम नगराध्यक्षपदाच्या निवडणूकीत भाजपातच रंगणार रंगत

### मुरूम नगराध्यक्ष पदासाठी भाजपचे श्रीकांत मिणियार अर्जदार दाखल... नव्या- जुन्या गटात चुरस...!




**तभा वृत्तसेवा / महेश निंबरगे**
**मुरूम, दि.१३ नोव्हेंबर -**

मुरूम नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षात नवा आणि जुना गट असे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. गुरुवारी भाजपाचे जिल्हा उद्योग आघाडीचे अध्यक्ष श्रीकांत मिणियार यांनी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे आता भाजपच्या नव्या गटातून नगराध्यक्ष पदासाठी कोण उमेदवार असेल? याकडे मुरूमवासीयांचे लक्ष लागले आहे.

नगरपरिषदेच्या १० प्रभागांतून २० नगरसेवक निवडले जाणार आहेत. गुरुवारपर्यंत नगरसेवकपदासाठी एकही अर्ज दाखल झाला नसला तरी इच्छुक उमेदवारांकडून कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू आहे. खुल्या गटातील नगराध्यक्ष पदासाठी मात्र काँग्रेस वगळता भाजप, शिंदे गट, अजित पवार गट आणि उबाठा गट तयारीत आहेत.

मुरूममध्ये भाजपने मागील निवडणुकीत चांगले यश मिळवले असून, त्या वेळी श्रीकांत (राजू)



मिणियार यांनी काँग्रेसमधून भाजपात प्रवेश करून पक्ष मजबूत केला होता. त्यांच्या कार्याचा अहवाल पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचविण्यात आला आहे. त्यातच माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या भाजप प्रवेशानंतर पक्षाचे बळ अधिक वाढले आहे.

मात्र, भाजपमधील जुन्या आणि नव्या गटात अजूनही एकोपा झाला नसल्याने नगराध्यक्षपदासाठी तणावाचे वातावरण आहे. गुरुवारी श्रीकांत मिणियार यांनी अर्ज दाखल करताच राजकीय चर्चांना उधाण आले. दरम्यान, भाजपच्या नव्या गटाचे नेतृत्व बापुराव पाटील यांच्याकडे आहे. काँग्रेसमध्ये असताना त्यांनी नगरपरिषदेवर सत्ता आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे यावेळी भाजपाकडून नगराध्यक्षपदासाठी उमेदवार ठरविण्याची जबाबदारी त्यांच्यावर असू शकते, अशी चर्चा सुरू आहे. सध्या पाटील यांचे समर्थक नगरसेवकपदासाठी कागदपत्रांची धावपळ करत आहेत, तर नगराध्यक्षपदाचा चेहरा अद्याप पडद्याआड आहे. त्यामुळे भाजपाच्या नव्या गटाचा उमेदवार कोण असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, उबाठा गट, शिंदे गट, अजित पवार गट आणि काँग्रेस यांच्याकडूनही निवडणुकीची जोरदार तयारी सुरू आहे.

### बसवेश्वर मंदिर सुशोभीकरणाच्या कामासाठी तत्काळ निविदा काढण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१३ नोव्हेंबर -**

लोहारा शहरातील श्री महात्मा बसवेश्वर मंदिराच्या सुशोभीकरणासाठी मंजूर एक कोटी रुपयांच्या निधीची निविदा प्रक्रिया तात्काळ राबवावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष आयुब शेख यांनी केली आहे.

दि.११ नोव्हेंबर रोजी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, या कामासाठीचे प्रशासकीय मान्यता आणि सुधारित अंदाजपत्रक तयार असून, केवळ निविदा प्रक्रिया प्रलंबित आहे. शेख यांनी पुढे म्हटले आहे की, दहा ते पंधरा दिवसांत निविदा प्रक्रिया सुरू न झाल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# औसा नगरपालिकेसाठी मित्रपक्षातच मोर्चेबांधणी

**त.भा. वृत्तसेवा/सुधीर गंगणे**

**औसा, १३ नोव्हेंबर :** राज्याच्या सत्तेत महाविकास आघाडी व महायुतीतून सत्तांतर करणाऱ्या पक्षातील नेतेमंडळीनी दि.२ डिसेंबर रोजी होत असलेल्या औसा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपा, अजित पवार राष्ट्रवादी काग्रेस, काँग्रेस व शिवसेना पक्षांच्या वतीने स्वबळावर निवडणुक लढाविण्यासाठी मोर्चे बांधणी सुरु असून पक्षांतरानंतरही सर्वच पक्षातून तुल्यबळ उमेदवारांचा शोध सुरु आहे. भाजप, राष्ट्रवादीने यामध्ये आघाडी घेतली असली तरी इच्छुकांची उमेदवारी मिळण्यासाठी आजही धाकधुक सुरु आहे.

या निवडणुकीसाठी गेल्या पाच वर्षापासून इच्छुक उमेदवारांनी कंबर कसली असली तरी या निवडणुकीसाठी राज्य सरकारमधील सत्तांतरामुळे आपला नंबर कसा लावाला, लागणार. यासाठी इच्छुकांनी गेल्या दोन वर्षापासून फिल्डींग लावत लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका पार पाडल्या.

केंद्र व राज्यातील सत्तेतील समीकरणामुळे व चार वर्षापासून कांहीना कांही कारणामुळे लांबत असलेल्या निवडणुकीमुळे कांही इच्छुकांनी या निवडणुका नाद सोडला होता. परंतू निवडणुका जाहीर होताच २०१६ च्या निवडणुकीत १२ जागा जिंकुन निर्विवाद वर्चस्व मिळवून एकहाती शहरातील सत्तेची सुत्रे हाती घेतलेले डॉ. अफसर शेख





**चौथ्या दिवशीही निरंक**

औसा नगरपालिकेच्या होवू घातलेल्या ११प्रभागातील निवडणुकीसाठी निवडणुक प्रक्रिया सुरु असून आज चौथ्या दिवशी पर्यत एकही उमेदवारांनी अर्ज दाखल केला नाही. यामुळे सलग चौथ्या दिवशी उमेदवारांचा रकाना निरंक आहे. अशी माहिती निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार घनशाम अडसुळ यांनी सांगितले.

यांनी विद्यमान आ. अभिमन्यू पवार यांचा एकत्रितपणे लढण्याचा प्रस्ताव नाकारुन देशमुख यांच्यानंतर जिल्ह्यात दुसऱ्यांदा राजकीय दंड थोपटले. आणि मोर्चेबांधणी करीत इच्छुकांच्या गर्दीत थेट मतदारांपर्यंत पोहंचण्याचा सपाटा सुरु ठेवला.

या निवडणुकीत भाजपाने काँग्रेस व राष्ट्रवादीला टक्कर देत सहा जागा मिळवत पालिकेत दुसरा क्रमांक पटकाविला. हे आता आणि आजघडीला विसरुन चालणार नाही. यावेळी काँग्रेसने दोन जागा मिळवल्या होत्या.

सत्तेतील पक्षांना आणि विशेष करुन मित्र पक्षांना या निवडणुकीसाठी डावलून डॉ. अफसर शेख यांनी तयारी सुरु केली. मित्रपक्षातील राष्ट्रवादीच्या असहकार्यामुळे आ. अभिमन्यू पवार यांनी पण तयारी सुरु केली आणि सहा वर्षाच्या कार्यकाळातील नगरपालिकेची पहिली निवडणुक असूनही अल्पावधीत शहरातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची मोट बांधून तयारीसह आघाडी घेतली.

पालिकेच्या गेल्या तीन निवडणुकीतील यश पाहता राष्ट्रवादी काँग्रेसकडे उमेदवारीसाठी अनेक इच्छुकांनी उमेदवारीची आस लावली. मात्र मतदारांची जात निहाय संख्या आणि पक्षातील आपल्या मर्जीतील उमेदवारांना संधी देत अनेकांना जाग्यावरच थांबावे लागले. तर भाजपात शेकडो कार्यकर्त्यांनी ऐण निवडणुक काळात पक्षप्रवेश करीत उमेदवारी मागतली. व अनेक तरुणांनी विजय मिळविण्यासाठी दंड थोपटले. यामुळे भाजपाकडे कार्यकर्त्यांची आजघडीला मोठी फौज दिसत आहे.

आ. अभिमन्यू पवार यांना नगरपालिकेची निवडणुक नवखी असली तरी २०१९ मध्ये माजी मंत्री बसवराज पाटील यांना पराभुत करीत विधानसभा निवडणुकीत विजय मिळवला होता.

यानंतर २०१४ मध्ये झालेल्या निवडणुकीत माजी आ. दिनकर माने यांच्यावर लक्षणीय मतांनी आघाडी घेत आपलेच पुर्वीचे रेकार्ड मोडीत सलग दुसऱ्यांदा विजय मिळवला आहेआणि नगरपालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय सुरु असलेली तयारी पाहता या निवडणुकीत आ. अभिमन्यू पवार यांना हलक्यात घेणे विरोधकांना परवडणारे नाही, असे आज तरी दिसून येत आहे.



# दावणगावच्या कन्यांचा मिरवणूक काढून सत्कार

## उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदेंच्या हस्ते सन्मान

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ नोव्हेंबर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत यश मिळवलेल्या दावणगावच्या दोन कन्यांचा ग्रामस्थांच्या वतीने घोड्यावर बसवून भव्य मिरवणूक काढून सत्कार करण्यात आला. या कन्यांनी आपल्या यशाने गावाचे नाव उज्ज्वल केले असून, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत विक्रीकर आयुक्त पदी निवड झालेल्या प्रणिता मदन भंडे व एमबीबीएस एम डी झालेल्या डॉ. अक्षता प्रकाश साखरे या दोघींचा सत्कार ग्रामस्थांनी घोड्यावर बसून वाजत गाजत मिरवणूक काढून केला. चक्रधर कालिदास भंडे या पुणे या गावातील यशस्वी उद्योजकाचा सत्कारही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते धनाजी मुळे, प्रा.डॉ. शिवाजी मुळे, ज्ञानेश्वर पाटील, शिक्षक नेते शिवाजीराव साखरे-वाघ सतीश भंडे यांची समयोचित भाषणे झाली.

प्रास्ताविक शिक्षक नेते किशनराव बिरादार यांनी केले. आभार रफिक बागवान यांनी मानले. दावणगाव येथील संत सावतामाळी विद्यालयातही प्रणिता भंडे व अक्षता साखरे या दोघींचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष बालाजीराव फुले, सचिव तानाजी फुले, प्राचार्य शिवहार रोडगे, चेअरमन विश्वनाथ भंडे यांनी पुढाकार घेतला.

# ज्ञानेश्वर महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १३ नोव्हेंबर :** सदगुरू ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५ व्या पुण्यतिथी सोहळा निमित्त रोटरी क्लब लातूर, दी पुना ब्लांइटमेन्स असोसिएशन, एच. व्ही. देसाईआय इन्स्टिट्यूट व शंकरसेठ साबळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोतीबिंदू तपासणी आणि मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे दि. १ ते ४ डिसेंबर असे चार दिवशीय शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

औसा येथील गोपाळपुर येथे सदगुरू ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त परमपुज्य चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांची भागवत कथा, चक्री भजन, कीर्तन. काशीपीठाचे जगदगुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य व राष्ट्रयोगी गोविंददेव गिरी महाराज यांची धर्मसभा दि. २८ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या काळात दैनंदिन होणार आहे.

या सोहळ्यानिमित्त होर्णाय़ा नेत्ररोग तपासणी व शस्त्रक्रियेसाठी औसा तालुक्यासह रुग्णांनी सुरेंद्र सुराणा व जगन्नाथ मामडगे यांच्याकडे रुग्णांनी नोंदणी करून या शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, मेघराज बरबडे, सुरेंद्र सुराणा, राजगोपाल मुंदडा, श्रीरंग महाराज यांनी केले आहे.

# समर्थांचा बलोपासनेचा मंत्र राष्ट्रीयत्वासाठी पूरक : आ. बनसोडे

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ नोव्हेंबर :** समर्थांनी दिलेला बलोपासनेचा मंत्र व राष्ट्रीय जागरणासाठी केलेले प्रयत्न हे राष्ट्रीय कार्यासाठी पूरक ठरले असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी केले. मलकापूर येथील श्री समर्थ रामदास स्वामी मठ संस्थांनच्या सभामंडपाचे भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. रामदास स्वामीजींचे वंशज व रामदासी संस्थान साताराचे अध्यक्ष हभप बाळासाहेब स्वामी, ज्योत्स्नाताई कोल्हटकर, शंकरलिंग मठाचे मठाधिश सुखदेव स्वामी, मलकापूरचे सरपंच गुरुनाथ बिरादार प्रल्हादबुवा रामदासी, उद्धव महाराज हैबतपूरे, समीर लिमये हे यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामी महाराजांच्या पादुकांचे आगमन व उपस्थितीत



मलकापूर येथील रामदास स्वामी मठाच्या सभागृहाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम आ. संजय बनसोडे व राम भक्तांच्या

झाला. हभप अतुल रामदासी यांनी प्रास्ताविक केले. अनिकेत रामदासी यांनी संकल्पित असलेल्या बांधकामाविषयी माहिती दिली.

राष्ट्र हा विषय कायम आपल्या अग्रस्थानी असला पाहिजे. रामदास

**रामकार्यात सहकार्य करा : सुखदेव स्वामी**

उदगीर येथे रामदास स्वामींच्या या मठाच्या भव्य दिव्य बांधकामासाठी उदगीरकरांनी व समाजातील सर्व घटकांनी सहकार्य करावे असे आवाहन सुखदेव स्वामी महाराज यांनी याप्रसंगी बोलताना केले. हे कार्य रामाचे कार्य असून या कार्याला मदत म्हणजे राम सेवा आहे असे सुखदेव महाराज म्हणाले.

स्वामींनी राष्ट्रासाठी राष्ट्रीय विचार घेऊन बलशाली मातृभूमीसाठी बलशाली नागरिक निर्माण करण्यासाठी आपले योगदान दिले. मनाचे श्लोक, दासबोध या ग्रंथातून त्यांनी दिलेली शिकवण मानवाने कसे जगावे याचा बोध आहे. रामदास स्वामींच्या प्रेरणेतून प्रल्हाद बुवा रामदासी व त्यांचा परिवार ज्या समर्पित भावनेने काम करतो आहे ते कार्य व समर्पण वंदनीय असल्याचे आमदार बनसोडे पुढे बोलताना म्हणाले.

या उपक्रमासाठी आपण १५ लाख रुपये आमदार निधीची रक्कम देणार असल्याचे सांगून या कामासाठी सतत सहकार्य करू व मदत करू असे आश्वासन आमदार बनसोडे यांनी यावेळी बोलताना दिले. संपूर्ण महाराष्ट्र आणि इतर राज्यातील मठाधिपती या कार्यक्रमासाठी उपस्थित होते, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य महेश तोडकर यांच्यासह रामदास भक्तांनी परिश्रम घेतले.

# बाबासाहेब वाघमारेंना राष्ट्रीय भारतभूषण पुरस्कार जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १३ नोव्हेंबर :** विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाराष्ट्रासह गोव्यातील कर्तृत्ववान व्यक्तींना पुणे येथील साऊ ज्योती फाऊंडेशन व रमाई आंबेडकर संस्थेच्या वतीने राष्ट्रीय भारतभुषण पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यात अहमदपूर येथील लोकराजा माध्यमिक विद्यालय येथे सहशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या बाबासाहेब वाघमारे यांना त्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रीय भारत भुषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कार सोहळ्याचे वितरण भारत इतिहास संशोधन मंडळ सदाशिव पेठ, पुणे येथे दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी विविध क्षेत्रांतील नामवंत मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.



या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन साऊ ज्योती फाऊंडेशन व रमाई आंबेडकर संस्थेचे सचिन हळदे, विकास उबाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

राष्ट्रीय भारत भुषण पुरस्कार जाहीर झालेले बाबासाहेब वाघमारे हे स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा अहमदपूर चे सचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पदाधिकारी, संकल्प बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक सचिव आशा विविध पदांवर कार्यरत असुन त्यांना जाहीर करण्यात आलेल्या पुरस्काराबद्दल स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष के. पी. पाटील व पदाधिकारी, बोधिसत्व फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र कांबळे, प्रा. बालाजी आचार्य, राजाराम पाटील, शिवाजी गायकवाड, त्रिशरण मोहगावकर, कैलास गायकवाड, भगवान ससाणे, रमेश कांबळे, संतोष गायकवाड, रवि निंबाळकर, सुजित कांबळे सह सर्व पत्रकार, शिक्षक, मित्र परिवारांकडून अभिनंदन करण्यात आले आहे.

# स्टार प्रचारकपदी आ. बनसोडेंची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ नोव्हेंबर :** महाराष्ट्रात होवु घातलेल्या नगर परिषद व नगर पंचायतीच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने स्टार प्रचारकांची नियुक्ती करण्यात आली असून यामध्ये पक्षासाठी सर्वस्व झोकून देऊन काम करणारे व सामान्य जनतेचे नेते म्हणून ओळख असणारे माजी मंत्री तथा उदगीर- जळकोट मतदार संघाचे आ. संजय बनसोडे यांची महाराष्ट्राच्या स्टार प्रचारकपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी केली आहे.



राज्यात सध्या नगर परिषद व नगर पंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून यासाठी त्या - त्या भागात जाऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ध्येय धोरणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करा असे आदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी दिले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार जास्तीत जास्त निवडून आणण्यासाठी प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांनी महाराष्ट्रात स्टार प्रचारकांची निवड केली आहे. यामध्ये आ. संजय बनसोडे यांची निवड झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# भोपणीकर परिवाराकडून आकाश म्हेत्रे यांचा सत्कार



**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १३ नोव्हेंबर :** तालुक्यातील बोरोळ येथील म्हेत्रे आकाश नामदेव यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षेत घवघवीत यश संपादन करून वर्ग-१ पदाला गवसणी घातली आहे, आकाश यांच्या आईवडिलांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून मोलमजुरी करून त्यांना शिक्षण दिले. सोबतच हे यश मिळवण्यामध्ये त्यांना त्यांच्या मोठ्या भावांचाही सदैव पाठिंबा राहिला.

सध्या ते राज्यकर निरीक्षक म्हणून माझगाव, मुंबई येथे कार्यरत आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेतून झालेलं असून महाविद्यालयीन शिक्षण विवेक वर्धीनी विद्यालय, देवणी येथे झालं आहे. त्यांचा स्पर्धा परीक्षांचा प्रवासही अतिशय प्रेरणादायी राहिलेला आहे. तब्बल ३१ वेळा वेगवेगळ्या परीक्षांमध्ये अपयश येऊनही न खचता अविरतपणे त्यांनी प्रयत्न चालू ठेवले आणि अखेर राजपत्रित अधिकारीपद मिळवलं. या यशाबद्दल आकाश म्हेत्रे आणि अश्विनी गंगाधर कोयले ही बीएएमएसला अहिल्यानगर येथे लागल्याने भोपणीकर परिवाराकडुन दोघांचे पण सत्कार करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते गजानन भोपणीकर, देवणी नगर पंचायतीचे सदस्य प्रा.अनिल इंगोले, कै. रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत जावळे पाटील, उपप्राचार्य शिवाजी सोनटक्के, गावातील जेष्ठ उद्योजक कालीदास देवणे, उद्योजक दत्ता हुरुचनाळे, शालेय समितीचे अध्यक्ष सत्यदेव गरड, लक्ष्मण बिरादार, श्रीकांत बिरादार, ओम पवळे, सचिन मलखेडे सह अतिंची उपस्थिती होती.

# बोंबळीत दोन एकर ऊस जळून खाक; लाखोचे नुकसान

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, १३ नोव्हेंबर :** वलांडी : देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्द येथे गुरुवारी सकाळी लागलेल्या आगीत शेतकरी देहराज विलास भोसले यांच्या शेतातील तब्बल दोन एकर ऊस जळून खाक झाला. या आगीत ऊसाबरोबरच ठिबक संच, शेती उपयोगी अवजारे व इतर साहित्यही जळून खाक झाले असून, शेतकऱ्यांचे अंदाजे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भोसले यांच्या सर्वे क्र. २/१ या गट क्रमांकात ऊस पिकाची लागवड करण्यात आली होती. गुरुवारी सकाळच्या सुमारास शेतात अचानक आग लागली. ही आग काही वेळातच प्रचंड भडकली आणि दोन एकरांतील ऊस पूर्णपणे जळून राख झाला. शेतकऱ्यांनी स्वतःच्या परीने आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.

यावर्षी अतिवृष्टीमुळे आधीच शेतकऱ्यांचे अर्थकारण बिघडलेले असताना आता आगीमुळे झालेले हे नुकसान शेतकऱ्यांसाठी मोठा धक्का ठरले आहे. शेतकऱ्यांनी सरकार व संबंधित साखर कारखान्याकडे मागणी केली आहे की, जळालेला ऊस तात्काळ कारखान्याकडून उचलावा व प्रशासनाने त्वरीत पंचनामा करून मदत जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.



# शाळांनी मूल्यवर्धन कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी : वाकडे

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १३ नोव्हेंबर :** मूल्यशिक्षणाचा सकारात्मक विचार प्रत्येक शाळेमध्ये होणे आवश्यक असून यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यात मूल्यवर्धन उपक्रम रुजवविला पाहिजे.त्याचबरोबर तालुक्यातील सर्व शाळांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाची काटेकोर अमलबजावणी करावी असे प्रतिपादन चाकूरच्या गटशिक्षणाधिकारी मंदोदरी वाकडे यांनी केले.

महाळंग्रा येथील डी. बी. ग्रुपमध्ये महाराष्ट्र शासन व शांतीलाल मुथा फाउंडेशन पुणे यांच्यावतीने आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड व गट साधन केंद्र पंचायत समिती चाकूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय मूल्यवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी डी.बी.पब्लिक स्कूलचे प्राचार्य शशिकांत चिल्लरगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. श्रीहरी वेदपाठक, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन बाळासाहेब येळापुरे, केंद्रप्रमुख ज्ञानोबा यादव, प्रशिक्षण समन्वयक रविंद्र चिमनदरे,जिल्हा सुलभक प्रकाश भालके यांची प्रमुख उपस्थिती होती.

चाकूर तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी मूल्यवर्धन प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या उद्घाटन कार्यक्रमास गट शिक्षणाधिकारी मंदोदरी वाकडे यांच्या समवेत शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड येथील अधिव्याख्याते डॉ. घनश्याम पौळ, डी. बी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयदीप यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षणात प्रदीप ढगे, रणजीत घुमे, मारुती वागलगावे, अनिल सुवर्णकार, दत्तात्रय बरदाळे, सत्तार शेख, देविदास माने, अनिल रोहिणेकर, इरबा गोटमुकले, सचिन जाधव, भीमाशंकर स्वामी, राजकुमार जक्कलवाड, विजय राऊत, घनश्याम स्वामी, विक्रम मुंडे यांनी प्रशिक्षण दिले. समारोपप्रसंगी प्रा.श्रीहरी वेदपाठक, बाळासाहेब येळापुरे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रकाश भालके यांनी केले. सूत्रसंचालन देविदास माने यांनी तर आभार प्रदर्शन रविंद्र चिमणदरे यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त...



### शिवाजी महाविद्यालय उमरगा जिल्हा 'जनरल चॅम्पियन'

**उमरगा, दि.१३ नोव्हेंबर -**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील विद्यार्थ्यांनी धाराशिव येथे पार पडलेल्या मैदानी क्रीडा स्पर्धेत एकूण १८ पदकांसह 'जनरल चॅम्पियनशिप' पटकावली. या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व पदक देऊन गौरव केला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करण्याचे आव्हान केले. या कार्यक्रमास डॉ. विलास इंगळे, प्रा. विजय पवार, डॉ. राजू सूर्यवंशी, प्रा. गोविंद गायकवाड, कॅ.डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, प्रा. शैलेश महामुनी आदी मान्यवर उपस्थित होते. विजेत्यांमध्ये नामदेव भोसले, प्रथमेश पुजारी, सिद्धू झंपले, किरण सास्तुरे, आकाश बनसोडे, प्रशांत हाके, सानिया शेख, राधा जमादार, राधिका मम्माळे, राजनंदिनी सूर्यवंशी यांसह अनेक खेळाडूंनी विविध प्रकारात चमकदार कामगिरी केली. संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे व उपाध्यक्ष अश्लेष मोरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

### मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांची विभागीय स्तरावर निवड

**उमरगा, दि.१३ नोव्हेंबर -**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्पर्धेत



जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. गटशिक्षण कार्यालय, उमरगा येथे झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत त्यांनी 'इको क्लब'चे सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या कामगिरीमुळे डिसेंबर महिन्यात जालना येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, शिक्षणतज्ज्ञ सदानंद शिवदे पाटील, अशोक पतगे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, विस्तार अधिकारी जोशी, केंद्रप्रमुख शिला मुदगडे तसेच सर्व शिक्षकांनी मुख्याध्यापक मोरे यांचे अभिनंदन केले.



### भावसार समाजाच्या अध्यक्षपदी लक्ष्मीकांत सरवदे

**तुळजापूर, दि.१३ नोव्हेंबर -**

येथील भावसार समाजाची बुधवार रोजी भावसार सांस्कृतिक मंगल कार्यालय येथे झालेल्या बैठकीत एकमताने लक्ष्मीकांत (बबलू) प्रतापराव सरवदे यांची निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष म्हणून अँड. शुभम रत्नाकरराव खोले तर सचिव पदी वैभव मुरलीधर लिमकर यांची नियुक्ती करण्यात आली. समाज एकजूट करण्यासाठी पाच सदस्यांची पंच कमिटीची स्थापना करण्यात आली. यामध्ये धनंजय हिबारे शिरीष काठारे, राजाभाऊ लोखंडे, प्रताप आकुडे, शशिकांत खुरुद यांच्यावर जबाबदारी देण्यात आली. यावेळेस नूतन अध्यक्ष लक्ष्मीकांत सरवदे यांचा सत्कार व त्यांना पदभार मावळते अध्यक्ष संजय खुरुद व उपाध्यक्ष सतीश आकुडे यांनी दिला. यावेळेस नंदकुमार लांडे, अंबादास भस्मे, महेश खुरुद, तुषार सुत्रावे, शेळके आधी सह मोठ्या संख्येने भावसार बांधव उपस्थित होते.

### भुममध्ये दुचाकीवर ठेवलेले एक लाख रुपये आणि कागदपत्रे चोरी

**भूम, दि.१३ नोव्हेंबर -**

तालुक्यातील येसवंडी येथील अशोक मारुती वाघमोडे (वय ५०) यांच्याकडून अज्ञात चोरट्याने तब्बल एक लाख रुपये रोख आणि महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेल्याची घटना भुम शहरात घडली. दि.११ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.४५ ते ४.२० या दरम्यान वाघमोडे हे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेतून एक लाख रुपये काढून मोटरसायकलवरून जात असताना, वरद हॉटेलजवळ अज्ञात व्यक्तीने मोटरसायकलवरील कव्हरमधून रक्कम, चेकबुक, पासबुक, एटीएम कार्ड, आधार व पॅनकार्ड चोरले. या प्रकरणी वाघमोडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून भा.दं.वि. कलम ३७९ (चोरी) अन्वये भुम पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## धाराशिव जिल्ह्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत कुष्ठरोग शोध अभियान

**जनतेने सहकार्य करावे जिल्हा प्रशासनाचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत देशभरातील कुष्ठरोगाचा प्रसार 'शून्यावर' आणण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.या अनुषंगाने समाजात लपून राहिलेल्या नव्या कुष्ठरुग्णांचा शोध घेऊन त्यांना बहुविध औषधोपचार (एम.डी.टी.) सुरू करणे आणि रोगप्रसाराची साखळी खंडित करणे हा एकमेव प्रभावी पर्याय असल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले आहे.

या उद्देशाने जिल्ह्यात दि.१७ नोव्हेंबर २०२५ ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत 'कुष्ठरोग शोध अभियान' राबविण्यात येणार आहे.या मोहिमेत आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्त्या व प्रशिक्षित पुरुष स्वयंसेवक यांच्या सहकार्याने ग्रामीण भागात संपूर्ण लोकसंख्येचे तसेच शहरी भागातील अतिजोखमीच्या क्षेत्रांतील घराघरात सर्वेक्षण करण्यात येणार आहे.



या सर्वेक्षणामध्ये प्रत्येक कुटुंबातील स्त्रियांची तपासणी आशा कार्यकर्त्या तर पुरुषांची तपासणी पुरुष स्वयंसेवक करतील.या तपासणीदरम्यान आढळणाऱ्या संशयित रुग्णांची नोंद घेण्यात येईल. त्यानंतर उपकेंद्र स्तरावर समुदाय आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र/ग्रामिण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालयस्तरावर वैद्यकीय अधिकारी तसेच जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयस्तरावर त्वचारोग तज्ज्ञ यांच्यामार्फत संशयितांची तपासणी करून रोगनिदान निश्चित करण्यात येईल.

निदान झालेल्या सर्व नव्या रुग्णांना तात्काळ बहुविध औषधोपचार सुरू करण्यात येतील.

लवकर निदान आणि नियमित पूर्ण उपचार केल्यास कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो,असे वैद्यकीय अधिष्ठात्यांनी सांगितले. या मोहिमेचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी आणि व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तालुकास्तरावर तहसीलदार आणि गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांच्या बैठका घेऊन अभियानाची कार्यवाही यशस्वीपणे पार पाडण्यासाठी नियोजन करण्यात येणार आहे.

संपूर्ण जिल्ह्यात ३ लक्ष ९ हजार ५०० घरांचे सर्वेक्षण करण्यात येणार असून, १५ लक्ष ४७ हजार ५०१ लोकसंख्येची प्रत्यक्ष तपासणी होणार आहे. यासाठी १,२०२ सर्वेक्षण पथके तयार करण्यात आली आहे. त्यांचे पर्यवेक्षण २४० पर्यवेक्षकांमार्फत केले जाणार आहे. प्रत्येक पथक ग्रामीण भागात दररोज २० ते २५ आणि शहरी भागात ३० घरांचे सर्वेक्षण करेल. या मोहिमेच्या कालावधीत जिल्हास्तर, विभागीय आणि राज्यस्तरावरील अधिकारी, कर्मचारी जिल्ह्याला भेट देऊन अभियानाची पाहणी करणार आहेत.

## रब्बी हंगामासाठी पिक विमा भरण्याची अंतिम मुदत जाहीर

**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

रब्बी हंगामात नैसर्गिक आपत्ती, किड व रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत शेतकरी नोंदणीसाठी राष्ट्रीय विमा संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे.

चालू रब्बी हंगामात कर्जदार व बिगरकर्जदार शेतकऱ्यांना पिक विम्याचा हप्ता भरण्याची अंतिम मुदत पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे. रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) : ३० नोव्हेंबर, गहू (बागायत), हरभरा व रब्बी कांदा : १५ डिसेंबर, उन्हाळी भुईमूग : ३१ मार्च २०२६ आहे. ही योजना कर्जदार तसेच बिगरकर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक असून, कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास त्यांनी अधिसूचित पिकांसाठी नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधीपर्यंत संबंधित बँकेस विमा हप्ता कपात न करण्याबाबत घोषणापत्र देणे आवश्यक आहे.

## तुळजापूर-अपसिंगा रोडवरील खड्डेमय रस्त्याने नागरिक त्रस्त

**तात्काळ दुरुस्तीची मागणी; समाजसेवक जयकुमार पांढरे यांच्यासह नागरिकांचे निवेदन...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ नोव्हेंबर -**

तुळजापूर ते अपसिंगा दरम्यानच्या रस्त्याची दुरवस्था होऊन तो खड्ड्यांनी भरला आहे. या खड्डेमय रस्त्यामुळे वाहनधारक आणि प्रवाशांचे हाल होत असून नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी समाजसेवक जयकुमार नागनाथ पांढरे आणि आपसिंगा रोड परिसरातील नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या मार्गावर टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजामाता हायस्कूल, शिक्षक कॉलनी, वंदे मातरम् नगर आणि आपसिंगा गाव अशी नवी वसाहत असून दररोज शाळकरी मुले, रिक्षा, मॅजिक आणि शेकडो वाहनांची वाहतूक होते. मात्र, रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याने वाहनांचे नुकसान तर होत आहेच, पण नागरिकांना प्रवास करताना त्रास सहन करावा लागत आहे.

निवेदनात संबंधित रस्त्याची तात्काळ पाहणी करून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर प्रवीण शेंडगे, पल्लवी शेंडगे, सपना पांढरे, विशाल राठोड, मसाजी पांडागळे, गोविंद गायकवाड, अमित मोरे, आशिष लोखंडे, चैतन पांडागळे, कैलास काळे, सिद्धार्थ ढाले, विक्की गुंड यांच्यासह स्थानिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अणदूर बसस्थानकाची स्वच्छता आणि सुविधा पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१३ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळांतर्गत हिंदूहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्वच्छ बसस्थानक तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आज सोलापूर विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, तुळजापूर आगार व्यवस्थापक रामचंद्र शिंदे, तसेच कामगार प्रतिनिधी परशुराम नकाते यांनी अणदूर बसस्थानकाला भेट देऊन सविस्तर पाहणी केली.

परीक्षणादरम्यान बसस्थानकाची स्वच्छता, पुरुष व महिला स्वच्छतागृहांची स्थिती, वाहतूक नियंत्रण कक्ष, प्रवासी व विद्यार्थी लाभ योजना तसेच प्रवासी सेवांविषयी माहिती घेण्यात आली. यावेळी समिती प्रमुखांनी बसस्थानकाची संरक्षक भिंत, प्रवासी सेवांमध्ये सुधारणा, विद्यार्थी



सुरक्षितता आणि एस.टी. फेऱ्या वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा केली.

तुळजापूर आगार व्यवस्थापक रामचंद्र शिंदे आणि परिवहन समिती सदस्य सिद्धेश्वर मसुते यांनी समिती प्रमुख गोंजारी यांचे स्वागत केले.

या पाहणीवेळी वाहतूक निरीक्षक सुरज पायाळ, गायकवाड, चंद्रकांत हागलगुंडे, वाहतूक नियंत्रक राजकुमार चव्हाण, जवाहर विद्यालय प्रतिनिधी, परिवहन समिती सदस्य सिद्धेश्वर मसुते, प्रवासी सुरेश तोडकरी, राजकुमार आलुरे, तसेच स्वच्छता कर्मचारी भिमराव गायकवाड उपस्थित होते.

## छायाचित्र व्हायरल करण्याची धमकी देत महिलेवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

तालुक्यातील एका गावातील ३२ वर्षीय महिलेवर गावातील एका तरुणाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.२७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास पीडित महिला घरी असताना आरोपी तरुणाने तिच्या घरात घुसून अंघोळ करतानाचे छायाचित्र व्हायरल करण्याची धमकी देत



तिच्यावर अत्याचार केला, अशी फिर्याद पीडितेने दिली आहे.

या तक्रारीनंतर पोलीसांनी भा.दं.वि. कलम ३७६ (१), ३५४ (२) (३), ५०६ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३ (२) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. याबाबत पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## धाराशिव : अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

तुळजापूर रोडवर झालेल्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला असून एक जखमी झाला आहे. ही दुर्घटना दि. ९ नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली.

जखमीचे नाव राहुल नारायण कांबळे (वय ३८) तर मृताचे नाव बाळु बन्सी कांबळे (वय ४२, रा. घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि. बीड, ह.मु. खोरे गल्ली लातुर) असे आहे. हे दोघे मोटरसायकल (क्र. एमएच २५ बी.डी. ६६२८) वरून जात असताना अज्ञात वाहनाने पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत बाळु कांबळे गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाले, तर राहुल कांबळे यांना किरकोळ व गंभीर दुखापत झाली आहे.

या प्रकरणी उषा बालाजी कांबळे (वय ४०, रा. घाटनांदुर ता. अंबाजोगाई, ह.मु. खोरे गल्ली लातुर) यांनी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

## भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी पोलीस भरतीपूर्व मार्गदर्शन मेळावा

**आ. अभिमन्यु पवार, आ. प्रविण स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार...**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ नोव्हेंबर -**

३० सप्टेंबर १९९३ रोजी लातूर-धाराशिव जिल्ह्यात झालेल्या महाभयंकर भूकंपात हजारो निरपराध नागरिकांचा जीव गेला होता. या दुर्दैवी घटनेनंतर भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आणि त्यांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी तत्कालीन राज्य सरकारने शासकीय नोकऱ्यांमध्ये भूकंपग्रस्तांना आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

या निर्णयानंतरच्या कालावधीत आरक्षण प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण झाल्या. मात्र, भूकंपग्रस्त कृती समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि जनजागृतीमुळे त्या अडचणींवर



यशस्वीरित्या मात करण्यात आली. आज या आरक्षणाच्या माध्यमातून लातूर-धाराशिव जिल्ह्यातील अनेक युवक राज्याच्या विविध भागात शासकीय सेवेत कार्यरत आहेत.

दरम्यान, राज्य सरकारने जाहीर केलेल्या पोलीस शिपाई भरतीमध्ये उमेदवारांना केवळ एका जिल्ह्यासाठी अर्ज करता येणार आहे. त्यामुळे लातूर-धाराशिव जिल्ह्यातील भूकंपग्रस्त उमेदवारांना कोणत्या जिल्ह्यासाठी अर्ज करावा आणि कोणत्या ठिकाणी संधी अधिक आहेत, याबाबत मार्गदर्शन व्हावे, या उद्देशाने भूकंपग्रस्त कृती समितीच्या वतीने पोलीस भरतीपूर्व मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

हा मेळावा दि. १५ नोव्हेंबर २०२५, शनिवार सकाळी १० वाजता पार पडणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते होणार असून, लोहारा-उमरगा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुरेश दाजी बिराजदार (अध्यक्ष, भाऊसाहेब बिराजदार सहकारी



साखर कारखाना, समुद्राळ) भूषविणार आहेत, तर प्रा. विद्याधर कांदेपाटील (संचालक, राजमुद्रा अकॅडमी, लातूर) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहतील.

या मेळाव्यासाठी भूकंपग्रस्त भागातील सर्व सरपंच, उपसरपंच तसेच स्थानिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, पोलीस भरतीसाठी तयारी करणाऱ्या सर्व भूकंपग्रस्त उमेदवारांना या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन भूकंपग्रस्त कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष अमर बिराजदार यांनी केले आहे.

## धाराशिवमध्ये १७ व १८ नोव्हेंबर रोजी त्रिजिल्हास्तरीय 'इन्स्पायर अवॉर्ड' प्रदर्शन

**धाराशिव, लातूर व नांदेड जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची नाविन्यपूर्ण प्रकल्प मांडणी**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

सन २०२३-२४ व २०२४-२५ या दोन शैक्षणिक वर्षांतील धाराशिव, लातूर व नांदेड जिल्ह्यांचे जिल्हास्तरीय 'इन्स्पायर अवॉर्ड' प्रदर्शन यावर्षी धाराशिव जिल्ह्यात आयोजित करण्यात आले आहे.

या प्रदर्शनासाठी दिलेल्या सूचनांनुसार, हे त्रिजिल्हास्तरीय इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शन दि.१७ व १८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत ज्ञान प्रबोधिनी, हराळी, ता. लोहारा (ता. लोहारा, जि. धाराशिव ) येथे संपन्न होणार आहे.

या प्रदर्शनात एकूण १९९ विद्यार्थी, १९९ पालक, तसेच व्यवस्थापनाशी संबंधित ५० प्रतिनिधी सहभागी होणार असून, याशिवाय प्रदर्शन पाहण्यासाठी जिल्ह्यातील सुमारे १००० विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.

प्रदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात येईल.

शिक्षण क्षेत्रातील सृजनशीलतेला चालना देणाऱ्या या उपक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांनी केले आहे.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिलासा; शेती पुनर्वसनासाठी मनरेगातून ५ लाखांपर्यंत अनुदान

**सिंचन विहिर दुरुस्तीकरिता ३० हजार रुपयांपर्यंत मदत; शेतकऱ्यांना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

सन २०२५-२६ या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर शासन व मनरेगा विभागाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विशेष पुनर्वसन उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) पुढीलप्रमाणे आर्थिक मदत देण्यात येणार आहे. खरडून गेलेल्या शेतीजमिनींच्या पुनर्वसनासाठी प्रति हेक्टर ३ लाख रुपये, तसेच जास्तीत जास्त २ हेक्टरपर्यंत ५ लाख रुपये इतके अनुदान देण्यात येणार आहे.

खचलेल्या किंवा बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीकरिता प्रति विहीर ३० हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यात येणार आहे.



या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीजमिनी व सिंचन साधनांची पूर्वस्थिती पुनर्संचयित करण्यास मदत होईल. परिणामी, आगामी हंगामात शेती पुन्हा सक्षम व उत्पादनक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की,त्यांनी आपले प्रस्ताव संबंधित गटविकास अधिकारी (पंचायत समिती) यांचेकडे सादर करावेत. तपासणी व मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

## पशुपालनाला कृषीचा दर्जा :पशुपालकांना वीजदर, कर व व्याजात सवलतींचा लाभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ नोव्हेंबर -**

पशुपालन व्यवसायाला आता कृषी व्यवसायाचा समकक्ष दर्जा देण्यात आला असून, या निर्णयामुळे लघु आणि मध्यम स्वरूपाच्या पशुपालकांना कृषीच्या धर्तीवर विविध सवलतींचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे पशुपालकांच्या उत्पादन खर्चात घट होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी या निर्णयासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. परिणामी शासनाने पशुपालनाला कृषी व्यवसायाचा दर्जा मंजूर केला आहे. या अंतर्गत पशुपालकांना वीज सवलत, ग्रामपंचायत करातील सवलत,तसेच कर्जावरील व्याज सवलत मिळणार आहे.

या निर्णयामुळे पशुपालकांच्या खर्चात बचत होऊन त्यांना आर्थिक दिलासा मिळेल, असे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी सांगितले.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नंदिनी पडिलेंना नारीशक्ती समाजरत्न पुरस्कार जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ नोव्हेंबर :** लातूरच्या योग व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय असे कार्य करत असलेल्या नंदिनी पडिले यांना अत्यंत प्रतिष्ठित मानला जाणारा सावित्रीबाई फुले महाराष्ट्र नारीशक्ती समाजरत्न पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. १६ नोव्हेंबर रोजी हा पुरस्कार नंदिनी पडिले यांना प्रदान करण्यात येणार आहे.

त्यांना सावित्रीबाई फुले महाराष्ट्र नारीशक्ती पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. सामाजिक कार्यात अनेक संस्थांसोबत त्या कार्यरत असल्यामुळे सह्याद्री देवराई, सनराईज योगा स्टुडिओ, हरीती वाचक चळवळ, दक्ष नागरिक, नारी प्रबोधन मंच, लातूर वृक्ष चळवळ, योग आणि फिटनेस सेंटरसह अनेक संस्थांनी देखील त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.





# ‘शेड्युल्ड ड्रग्ज’ची विक्री डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय करू नका : जिल्हाधिकारी

### केमिस्ट-ड्रगिस्ट असोसिएशन पदाधिकाऱ्यांची बैठक | व्यसनासाठी औषधांचा वापर रोखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ नोव्हेंबर :** डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय प्रवर्गीय औषधे अर्थात शेड्युल्ड ड्रग्जची विक्री केली जावू नये. तसेच अशा औषधे विक्रीची माहिती औषध विक्रेत्यांनी जतन करून ठेवणे आवश्यक असून लातूर जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी या नियमांचे पालन करावे. प्रवर्गीय औषधांचा वापर व्यसनासाठी केला जावू शकत असल्याने सर्वांनी आवश्यक खबरदारी घ्यावी. आपल्या लातूर जिल्ह्यातील युवा पिढीला व्यसनाधीन बनण्यापासून रोखण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज असून केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनने यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनच्या पदाधिकारी बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके,



उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक केशव राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, अन्न व औषध प्रशासनचे सहायक आयुक्त प्रमोद काकडे, बळीराम मरेवाड यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी, केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

युवा पिढी अंमली पदार्थांच्या आहारी गेल्यास समाजाला दूरगामी परिणामांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून काम करायला हवे. प्रवर्गीय औषधांची विक्री करताना नियमांचे पालन न करणाऱ्या औषधे विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यासोबतच व्यसनाधिनता कमी करण्यासाठी प्रबोधनही केले जाणार आहे. लातूर शहरातील हॉस्टेल चालक, ट्युशन क्लासेसचे

> **औषधांचा नशेसाठी वापर होणे, ही बाब चिंताजनक आहे. त्यामुळे सर्व औषध विक्रेत्यांनी अतिशय संवेदनशीलपणे आणि जबाबदारीने काम करण्याची गरज आहे. लातूर जिल्ह्यातील युवा पिढीमधील व्यसनाधिनता कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत औषध विक्रेत्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून प्रवर्गीय औषधांची विक्री डॉक्टरांच्या चिट्ठीशिवाय न करण्याचा संकल्प करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.**

संचालक, महाविद्यालये यांनाही या मोहिमेत सहभागी करून घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

युवकांना व्यसनाधीन बनविण्यासाठी प्रवर्गीय औषधांचा वापर केला जात आहे. त्यामुळे डॉक्टरांच्या चिट्ठीशिवाय अशी औषधे विकणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. तसेच डॉक्टरांच्या चिट्ठीशिवाय अशी औषधे देण्यासाठी कोणीही दबाव टाकत असेल तर विक्रेत्यांनी त्याची माहिती पोलीस प्रशासनाला द्यावी. तसेच अशी औषधे अनधिकृतपणे विकणाऱ्यांची माहितीही प्रशासनाला द्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यावेळी म्हणाले.

युवा वर्गातील व्यसनाधिनता कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन करीत असलेल्या प्रयत्नांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याचा निर्धार लातूर केमिस्ट व ड्रगिस्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला. डॉक्टरांची चिट्ठी असल्याशिवाय कोणताही विक्रेता प्रवर्गीय औषधांची विक्री करणार नाही, असे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.



## महाआरोग्य शिबीराच्या माध्यमातून आरोग्य जपा

### माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ नोव्हेंबर :** लातूर येथील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिने डॉ.एम.सी.मोदी यांच्यावतीने माजी मंत्री शिवराज पाटील चाकूरकर, अरून नेहरू, तत्कालीन माजी मुख्यमंत्री कै.शिवाजीराव पाटील निलंगेकर, डॉ.एम.सी.मोदी यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या ऐतिहासिक नेत्र तपासणी शिबीरात १४ हजार जणाच्या तपासण्या करण्यात आला तर ११०० जणावर यशस्वी नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आताही उदगीरचे डॉ.तानाजी मोरे यांच्या पुढकारातून आपल्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी नेत्रतपासणी शिबीर घेण्यात येत असून या शिबीरातून अनेक रूग्णांना दृष्टी देण्याचे काम आपण केलेले आहे. त्याच धर्तीवर आताही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हे महाआरोग्य शिबीर घेण्यात येत आहे. अशा महाआरोग्य शिबीराचे माध्यमातून लातूरकरांचे आरोग्य जपण्याचे काम आपण करावे. असे प्रतिपादन माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर केले.

यावेळी ते भारतीय जनता पार्टीचे लातूर शहर जिल्ह्याच्या पुढाकारातून व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, वि.दे. शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, विवेकांनद वै.प्रतिष्ठान व संशोधन केंद्र लातूर, लातूर शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्र विद्यालय मैदानावर घेण्यात आलेल्या देवाभाऊ महाआरोग्य शिबीराच्या शुभारंभप्रसंगी बोलत होते.

यावेळी या शिबीराला भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, लातूर शहर महानगरपालिका निवडणूक प्रमुख डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपा शहर जिल्ह्याच्या महामंत्री रागिणीताई यादव, संजय गिर,भाजपाचे शहर जिल्हा सचिव निखील गायकवाड, डॉ.मेघराज चवंडा, डॉ.रमण सलगर, महिला मोर्चा शहर जिल्हाध्यक्षा शितलताई मालू, माजी स्थायी समिती सभापती दीपक मठपती, विनय जाकते, माजी नगरसेवक बालाजी शेळके, माजी नगरसेवक गोरोबा गाडेकर, लातूर जिल्हा वकील मंडळाचे सचिव ॲड.गणेश गोजमगुंडे, शशिकांत हांडे, बाळू शिंदे, राजेश पवार, सिध्देश्वर उकीरडे, महादेव पिटले, आफ्रीन खान, संतोष जाधव, लताताई घायाळ, शितलताई कुलकर्णी, प्रितम पुंडलिक, आकाश पिटले, शिवाजी कामले आदी मान्यवर उपस्थित होते.

## निवडणूक विजयासाठी एकदिलाने काम करा : आ. संभाजी निलंगेकर



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ नोव्हेंबर :** केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून लातूर शहरासह जिल्ह्याच्या विकासाला मोठ्या प्रमाणात निधी मिळत असून कामांना गती मिळालेली आहे. मात्र विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधीने आपले कर्तव्य विसरत सरकारवर खापर फोडण्याचे काम केले आहे त्यामुळे विरोधकांच्या अकार्यक्षमतेचा पंचनामा करत आगामी मनपा निवडणूक जिंकण्यासाठी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करत पक्षाचा झेंडा फडकावा असे आवहान जिल्हा निवडणूक प्रभारी तथा माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले आहे.

आगामी मनपा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी येथील डॉ. भालचंद्र ब्लड बँकेत बैठक आयोजित केली होती. या बैठकीत माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, निवडणूक प्रमुख अर्चनाताई पाटील चाकूरकर, शहर सरचिटणीस संजय गीर, रागिणी यादव, निखील गायकवाड, प्रविण कस्तुरे आदींची उपस्थिती होती.

लातूर शहरासह जिल्ह्याचा विकास करत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी पक्ष पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी काम केल्याचे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र व राज्य सरकार निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही देऊन आ. निलंगेकर यांनी विरोधकांच्या अकार्यक्षमतेचा पाढा वाचून दाखवला. विरोधकांकडून विकासाचे किंवा जनतेच्या हिताचे कोणतेच काम झाले नाही याची आठवण करून देत विरोधी असलेल्या लोकप्रतिनिधीना आपल्या कर्तव्याचा विसर पडला असल्याचे सांगितले. मात्र आपली अकार्यक्षमता लपवण्यासाठी त्यांच्याकडून सरकारवर खापर फोडण्याचे काम सुरु असून त्यांनी लोकांमध्ये संभ्रम निर्माण केल्याचे सांगितले. विरोधकांच्या या अकार्यक्षमतेचा पंचनामा करण्यासाठी पक्ष कार्यकर्त्यांनी आत एकदिलाने काम करत शहरातील विविध ठिकाणी पंचनामा सभा आयोजित करावी असे आवाहन आ. निलंगेकर यांनी केले. यावेळी अजित पाटील कव्हेकर, डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी मनोगत व्यक्त केले. बैठकीचे सूत्रसंचलन जिल्हा सरचिटणीस प्रविण कस्तुरे यांनी तर आभार प्रदर्शन निखील गायकवाड यांनी केले.

## जिल्ह्यात १३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालत

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ नोव्हेंबर :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच लातूर जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात १३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, परकाम्य संलेख अधिनियम कलम १३८ धनादेश अनादरीत प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, कामगार तथा औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे, बँकेशी संबंधीत प्रलंबित प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. तसेच बँक तथा वित्तीय संस्थांची वाद दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये पक्षकारांना आपली बाजू मांडण्यासाठी संधी मिळते. तसेच दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड पक्षकारांच्या आपसी संमतीने होते. लोक अदालतमध्ये प्रकरण आपसी संमतीने निकाली निघाल्यास पक्षकारांचा वेळ व पैसा वाचतो. लोक अदालतीमध्ये दोन्ही पक्षकारांच्या संमतीने प्रकरण निकाली निघाल्यावर न्यायालयीन शुल्क तथा कोर्ट फिस परत मिळते. त्यामुळे पक्षकार व विधीज्ञ यांनी १३ डिसेंबर २०२५ रोजीचे राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय जे. भारूका, सचिव एन. गिरवलकर यांनी केले आहे.

## आ. कराड यांच्या हस्ते सांगवी येथे विकासकामांचे लोकार्पण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ नोव्हेंबर :** ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थीचा ओढा शहरातील शाळेकडे दिवसेंदिवस वाढत असल्याने अनेक जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने कमी होताना दिसत आहे. तेव्हा ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी आत्मपरीक्षण करून गावातले विद्यार्थी गावातच शिकले पाहिजेत यासाठी दर्जेदार शिक्षण देऊन गुणवत्तेचा विश्वास संपादन करावा, भौतिक सुविधा पुरविण्यास आम्ही तयार आहोत असे प्रतिपादन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील सांगवी येथील ३६ लक्ष रुपये खर्चाच्या जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीसह आमदार निधीतील सभामंडप, सोलार लाईट, पेवर ब्लॉक रस्ता व इतर ९३ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचे लोकार्पण लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते




गुरुवारी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय जाधव हे होते तर याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख अँड. बळवंतराव जाधव, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, दशरथ सरवदे, विष्णू गोरे, अमर चव्हाण, नरेश चपटे, सांगवीच्या सरपंच पार्वती बनसोडे, उपसरपंच डॉ. परमेश्वर जाधव, विविध गावचे सरपंच सुनील चेवले, रमेश खाडप, रवींद्र नागरगोजे, रमेश कटके यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पंधरा वर्षे निवडून गेलेल्या काँग्रेस आमदारांनी सांगवी गावात विकासाचे कोणतेही कामे केली नाहीत. विधानसभा निवडणुकीत शब्द दिल्याप्रमाणे विविध विकास कामांना मोठ्या प्रमाणात निधी दिला असे सांगून जनतेला विकास हवा आहे. होत असलेल्या विकास कामामुळे सांगवी गावात परिवर्तन दिसून येत आहे या पुढील काळातही जे शक्य आहे अशा सर्व कामांना निधी मिळवून देऊ हक्काने मागा निश्चितपणे देऊ असेही बोलून दाखवले.

विधानसभा निवडणुकीत रमेशआप्पाचा जामीनदार होण्याचा घेतलेला निर्णय योग्य होता हे त्यांच्या कामातून सिद्ध झाले असल्याचे सांगून शिवसेनेचे अँड बळवंतराव जाधव म्हणाले की, सांगवी गावची नाडी डॉक्टरच्या हातात असल्याने गावचे आरोग्य आणि विकास सुधारत आहे असेही त्यांनी बोलून दाखवले.

# आज ‘विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना’चा लोकार्पण सोहळा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ नोव्हेंबर :** विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या ‘विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन’ या वास्तूचा लोकर्पण सोहळा शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.१५ वा. लातूर जिल्ह्यातील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्र्वर (रूई) या ठिकाणी होणार आहे. अशी माहिती या वास्तूचे संकल्पक, संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी दिली.

या सोहळ्याला सन्माननीय प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांचे सुपूत्र व माजी खासदार सुनील शास्त्री असतील. अध्यक्षस्थानी संत वृत्तीचे शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर असतील. प्रमुख पाहुणे म्हणून माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर तसेच माजी केंद्रीय मंत्री व जम्मू काश्मीर राजघराण्याचे वारसदार डॉ.करण सिंह शुभाशीर्वाद देण्यासाठी असतील.

सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना आणि पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या सोहळ्यासाठी रोमन कॅथोलिक



चर्चचे माजी बिशप फादर फेलिक्स मचाडो, मौलाना आझाद नॅशनल उर्दू युनिव्हर्सिटीचे माजी कुलपती डॉ. फिरोज बख्त अहमद व अमेरिका येथील चिंतक व अभ्यासक मायकेल गनेल हे विशेष सन्माननीय पाहुणे असतील.

तसेच सन्माननीय पाहुणे म्हणून भंते राहुल बोधी, महंत रामदास, योगी अमरनाथ, श्रीमती कमलाताई गवई, महाराज परमवीर सिंह, डॉ. मेहेर मास्टर मूस, डॉ. एडिसन सामराज, डॉ. प्रकाश महानवार, इझीकेल मळेकर, मौलाना अन्सारी चतुर्वेदी, डॉ. बिनी सरीन, डॉ. संजय देशमुख, डॉ. लेसन आझादी, वाहिदमियाँ चिस्ती, सौ. पुष्पाताई बोंडे, आचार्य रतनलाल सोनग्रा व सरदार मानजितसिंह खालसा हे उपस्थित म्हणून राहणार आहेत.

महाराष्ट्राच्या मराठवाड्यातील रामेश्र्वर (रूई) हे गांव यज्ञभूमी म्हणून परिचित आहे. याच गावातील हिंदू मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन जवळपास २७५ वर्षापूर्वी उद्ध्वस्त केलेल्या श्रीराम मंदिराच्या जागी सुंदर अशा मकराना मार्बलमध्ये श्रीराम मंदिर व सुमारे ६३ वर्षापूर्वी उध्वस्त करण्यात आलेली जामा मस्जिद व ख्वाजा जैनुद्दिन चिश्ती दर्गा यांची पुनर्बांधणी करण्यात आली आहे. तसेच या ठिकाणी विश्वधर्मी राम रहिम मानवता सेतूची उभारणी, तथागत भगवान गौतम बुद्ध विहार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती भवनाची उभारणी करण्यात आली आहे. अशा विविध ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक स्वरूपाच्या उपक्रमांमुळे रामेश्वर रूई खऱ्या अर्थाने मानवता तीर्थ आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या मनातील आदर्श गाव म्हणून उदयास आले आहे. याचाच पुढचा टप्पा म्हणजे विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन या वास्तूचा लोकर्पण सोहळा आहे.

भारताची विश्वात्मक संस्कृती, परंपरा आणि तत्वज्ञानाचा अनुभव देणाऱ्या या दिव्य वास्तूच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहण्याची विनंती आमदार रमेश कराड, रामेश्वर (रूई) चे सरपंच सचिन कराड, माईर्स एमआयटीचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड, अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड, माईर्स एमआयटीचे विश्वस्त हभप तुळशीराम दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, माईर्स एमआयटीचे विश्वस्त प्रा. प्रकाश जोशी, डॉ. विरेंद्र घैसास, राजेश कराड व समस्त विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर रूई ग्रामस्थांनी केले आहे.